समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ।।

मासिक
माळी आवाज

संस्थापक / संपादक - स्व. विजयकुमार नारायण लडकत
वार्षिक वर्गणी रु. २००/-
वर्ष २०, अंक ४-५, एकूण पृष्ठे ९२
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ (मासिक)
Mali Aawaj | Pune | Vol. 20 | Issue No. 15-16 | October_November 2026 (Monthly) | Pages 92



शुभ दीपावली !

जशी दिव्यांची जोडी
घराला उजळून टाकते,
तसेच तुमच्या आयुष्यातही
एक सुंदर जोडीदार
येऊन तुमचे सहजीवन
प्रकाशमय होवो.

ज्ञानज्योती

मासिक माळी आवाजतर्फे
आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!!

स्थापना १९८८ ®

विश्वासाचं नांव

सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त संस्था

३८ वर्षाची विश्वसनीय परंपरा असलेली संस्था

ज्योती

सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगांव.

ज्योती सर्कल, मेनरोड, कोपरगांव ४२३६०१ फोन नं.- ०२४२३-२२१०५५

शाखा - कोपरगाव, शिर्डी, सुरेगांव (कोळपेवाडी), कोल्हार, राहुरी, श्रीरामपुर, येवला, अहमदनगर,पुणे

पुणेकरांच्या सेवेसाठी पुण्यात शाखा सुविधा

पत्ता - अमित समृध्दी बिल्डींग ३ मजला, अभ्युदय बँकेच्यावर, बालगंधर्व चौक, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४,संपर्क- ०२०-२९९८५५३५, शाखाधिकारी नरके मॅडम मो.९९२१७३२६२५



अॅड.श्री.रविकाका बोरावके

चेअरमन



✲आर्थिक स्थिती✲

- ✲ ठेवी - ४३४ कोटी
- ✲ कर्ज - २८८ कोटी
- ✲ गुंतवणूक - १७८ कोटी
- ✲ स्वनिधी - ३२ कोटी
- ✲ नफा - ४ कोटी ५० लाख
- ✲ एकुण व्यवसाय - ७२२ कोटी
- ✲ कायम मालमत्ता - २.४० कोटी
- ✲ नेट एन.पी.ए. - ०.०० %
- ✲ सी. डी. रेशो - ६५ %
- ✲ ऑडिट वर्ग - सतत अ
- ✲ विनम्र व तत्पर सेवा

सोने तारण कर्ज, लॉकर्स सुविधा, NEFT / RTGS सुविधा, SMS सुविधा,मोबाईल कलेक्शन, सुलभ कर्ज वितरण सुविधा, ज्योती मोबाईल बँकींग, ई चलन सुविधा,कोअर बँकिग सुविधा

TGGT
THE GOLDEN GLOBE
TRAVELS
Travel • Grow • Thrive Together

प्रवास फक्त सुट्टी नाही, तर आयुष्य समृद्ध करणारा अनुभव आहे !

तुमच्या प्रत्येक प्रवासासाठी
नियोजित, सुरक्षित आणि अविस्मरणीय अनुभव.

तुमच्या विश्वासू प्रवास साथीदार

ग्रुप सहली
नव्या लोकांसोबत नव्या ठिकाणांचा अनुभव

कौटुंबिक सहली
कुटुंबासोबत आनंदी क्षण

हनीमून पॅकेजेस
रोमँटिक प्रवासासाठी विशेष नियोजन

महिला विशेष सहली
सुरक्षित, आनंदी आणि प्रेरणादायी प्रवास

कॉर्पोरेट व स्टुडंट ट्रॅव्हल
टीम-बिल्डिंग, शिक्षण आणि शैक्षणिक सहली

धार्मिक यात्रा
आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अनुभव

देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय सहली
भारत आणि जगभरातील अद्भुत स्थळांचा अनुभव

अप्रतिम भारताच्या अनुभव
निसर्ग, संस्कृती, अध्यात्म आणि साहस यांचा अनोखा संगम


केरळ
बॅकवॉटर्स, बीच आणि निसर्गसौंदर्य


तामिळनाडू
मंदिरे, संस्कृती आणि परंपरा


हिमाचल व स्पीती
डोंगर, साहस आणि अद्भुत नैसर्गिक सौंदर्य


गोवा
बीच, मस्ती आणि विलक्षणता


राजस्थान
राजेशाही वारसा आणि वाळवंटांचे सौंदर्य

जगभरातील अद्भुत सफर
नवीन संस्कृती, नवीन ठिकाणे, अविस्मरणीय अनुभव


दुबई & अबू धाबी
आधुनिकता, लक्झरी आणि अनोखे अनुभव


सिंगापुर
आधुनिक आकर्षणे आणि फॅमिली फ्रेन्ली अनुभव


थायलंड
निसर्ग, संस्कृती आणि आनंददायी सहली


व्हिएतनाम
निसर्ग, संस्कृती आणि अद्वितीय अनुभव


बाली
आध्यात्मिकता, समुद्रकिनारा आणि साहस

आमच्या विशेष सेवा

- विमान तिकीट बुकिंग
- हॉटेल आरक्षण
- कार रेंटल व स्थानिय ट्रान्सफर
- कस्टमाइज्ड इटिनरी
- व्हिसा सहाय्य
- प्रवास विमा
- टूर मॅनेजर व ऑन-ग्राउंड सपोर्ट
- MICE व गट ट्रॅव्हल सोल्युशन्स


कुटुंबांसाठी


महिला गटांसाठी


जोडप्यांसाठी


विद्यार्थी व कॉर्पोरेटसाठी


धार्मिक व आध्यात्मिक सहलीसाठी

आमच्यासोबत प्रवास का करावा ?

- विक्षासार्ह नियोजन
- अनुभवी मार्गदर्शक
- आरामदायी निवास
- उत्तम नियोजन
- संपूर्ण प्रवासात सहाय्य
- अविस्मरणीय अनुभव

TGGT
THE GOLDEN GLOBE
TRAVELS
Travel • Grow • Thrive Together

Chaitraali Jadhav
Founder & Owner

+91 8511146663
contact@goldenglobetravels.in
thegoldenglobetravels.com

thegoldenglobetravels




❖ आमचे प्रेरणास्थान ❖

स्व. श्री.
विजयकुमार नारायण लडकत

शुभ दीपावली

ढोले पाटील कुटुंबीयांकडून दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..



KAPILA
Business Hotel

कपिला बिझनेस हॉटेल

१७४, ढोले पाटील रस्ता, पुणे १

Kapila Business Hotel

174, Dhole Patil Road,
Pune - 411 001

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा...!



नंदन रासकर
१३ ऑक्टोबर



१५ ऑक्टोबर
मा. उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब
अध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद



संतोष लडकत
३ ऑक्टोबर



रंजना जाधव
२८ ऑक्टोबर



नितीन रासकर
१० ऑक्टोबर



तुषार गद्रे
१८ ऑक्टोबर



केतन करपे
१ ऑक्टोबर



पार्थांश साडेकर
१० ऑक्टोबर



प्रभाकर पाटील
१० ऑक्टोबर



सुनिता भगत
४ नोव्हेंबर



जयश्री बनकर
७ नोव्हेंबर



शीला गिते
१० नोव्हेंबर



साची जाधव
२० नोव्हेंबर



रागिणी लडकत
२१ नोव्हेंबर



विक्रांत लडकत
२१ नोव्हेंबर



स्नेहा बुनगे
२८ नोव्हेंबर

❖ माळी आवाज संपादकीय व प्रतिनिधी मंडळ ❖


रागिणी लडकत


शिला गिते


रंजना जाधव


शुभांगी शिंदे


कल्पना करपे


चंद्रकला पाथरे


उज्ज्वला कुमोद



अंजली भुजबळ


बीना बुनगे


राजेश बुनगे


वसंतराव नेवसे


प्रा. आदेश बनकर


दिलीप धामणे


लक्ष्मण बादाडे


प्रसन्नकुमार शिंदे

• मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ •

माळी आवाज

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

संपादिका

रागिणी विजयकुमार लडकत
फोन
८७६७५ ८१९०६
९१५८३ ३३७५८

प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

योगेश काकडे
गणेशनगर, धायरी, सिंहगड रोड,
पुणे ४१. मो. ९८८१३०३५९४

मुखपृष्ठ

कु. मृणाल कैलास जाधव

आधारस्तंभ

सौ. बीना राजेश बुनगे
विक्रांत विजयकुमार लडकत

पुणे विभाग

प्रा. आदेश बनकर
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

सौ. कल्पना करपे
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

अंजली भुजबळ
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

लातूर विभाग

प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

सातारा विभाग

सौ. शीला गिते
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

श्री. वसंतराव नेवसे
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे, मु. पो. वाई,
जि. सातारा, मो. ८१४९०१३८६५

औरंगाबाद विभाग

सौ. चंद्रकला पाथरे
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद. मो. : ९४२०२४२१६५

वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

नाशिक विभाग

सौ. उज्ज्वला कमोद
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

सोलापूर विभाग

श्री. प्रसन्नकुमार शिंदे
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

ठाणे कल्याण विभाग

सौ. शुभांगी शिंदे
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

सौ. रंजना जाधव
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू)
मो ९१६७७७३५६६
वेळ : दु. १२ ते ४

मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-

वधू-वर सूचक केंद्र कार्यालय

१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर नं. २ शेजारी,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७. फोन - ०२०-२४२८१११०
• कार्यालयीन वेळ •
मंगळ. ते शनि. - संध्या. ४ ते ७
रवि. सकाळी - ११ ते २ (सोमवार सुट्टी)

अनुक्रमणिका

१.	संपादकीय	– –	१०
२.	जैसे कर्म तैसे फळ	बीना राजेश बुनगे	१२
३.	देव माझा विठू सावळा (कविता)	राम गायकवाड	१५
४.	फास (कविता)	परशुराम लडकत	१५
६.	आठवणीतले आजोळ की आजोळातील आठवणी?	रागिणी विजयकुमार लडकत	१६
७.	रिटायरमेंट	शेखर गायकवाड	१८
८.	बळी पिकवितो मोती	शुभांगी धारमाळकर	१९
९.	पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा	कु. अनुश्री अशोक बरळ	२०
१०.	पथ्य – औषधांपेक्षा मोठं औषध	डॉ. लिना बोरुडे	२१
११.	संत साहित्यातील श्री गणेश	माधुरी विधाटे	२३
१२	दैव परिक्षा	शुभांगी धारमाळकर	२६
१३.	हे बंध रेशमाचे	भारती सावंत	२७
१४.	तुझ्या सावलीत (कविता)	भारती सावंत	२८
१५.	'स्क्रीन, स्ट्रेस आणि सोशल मीडिया: जनरेशन झेड	डॉ. धनंजय मानकर	२९
१६.	सरपंच	डॉ. माणिक बनकर	३२
१७.	ब्रेन रॉट सिंड्रोम	डॉ. कारभारी खरात	३५
१८.	लहान मुलांची सुरक्षितता : प्रेमाइतकीच सजगता महत्त्वाची!	प्रा. विजय नवले	३८
१९.	ऐक (कविता)	कल्पना दुधाळ	४३
२०.	उतार वयातले विस्मरण... शाप नव्हे वरदान !	प्रल्हाद दुधाळ	४४
२१.	पुनरज्जीवन (कविता)	कल्पना दुधाळ	४५
२३.	सावित्रीबाई आणि सत्यशोधक समाज कार्य	शीला गिते	४६
२३.	अस्वस्थ (कविता)	डॉ. ज्योती कदम	४७
२४.	माणसातली आर्द्रता हरवतेय...!	डॉ. अभिनय दरवडे	४८
२५.	माझी माणसे	भारती सावंत	५०
२६.	बदलती खेडी, बदलता देश	गोविंद बभुता मोरे	५१
२७.	सावित्रीमाई (कविता)	डॉ. माणिक बनकर	५८
२८.	झुरळाख्यान	सुरेशचंद्र वाघ	५९
२९.	तिढा	बापू त्र्यंबक माळी सर	६६
३०.	कौतुकाचे मोल	डॉ. दत्ता कोहिनकर	७४
३१.	वधू-वर यादी	– –	७५ ते ७९
३२.	क्लासिफाईड	– –	८८ ते ९१

संपादकीय



रागिणी विजयकुमार लडकत
मो.: ८७६७५८१९०६

सर्वांना सस्नेह नमस्कार !

मासिक माळी आवाजचा ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ या महिन्याचा जोड अंक आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे. आमच्या सर्व सभासदांना, जाहिरातदारांना, हितचिंतकांना, लेखकांना, वाचकांना आणि आमच्यावर प्रेम करणाऱ्या आमच्या असंख्य स्नेहयांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

नेहमीप्रमाणेच विविध विषयांनी नटलेल्या या अंकाचे आपण निश्चितच स्वागत कराल असा मला विश्वास आहे. या अंकासाठी विषयानुरुप अनेक बांधवांकडून साहित्य मागविले होते. आमच्या विनंतीला मान देऊन सर्व साहित्यिकांनी आम्हाला सहकार्य केले. त्यांचे साहित्य त्यांनी वेळेत आमच्यापर्यंत पोहचवले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद ! आपला हा अंक विविधरंगी साहित्य प्रकारांनी सुशोभित केलेला आहे. या अंकामध्ये कथा, कविता, ललित लेख, प्रवासवर्णन, व्यंगचित्र, जाहिराती, पाककृती आदि विषयांचा समावेश केला आहे. दिवळी अंक हा निश्चितच वाचनीय आहे. अंक वाचल्यानंतर आपलला अभिप्राय नक्की आम्हाला कळवा. आपल्या अभिप्रायाचे स्वागत करु. कारण आपला अभिप्राय ही आमची ऊर्जा आहे. आपले प्रोत्साहन आमची काम करण्याची उमेद, कल्पकता आणि मनोधैर्य वाढवते.

तरुण मुलं-मली वयात आल्यानंतर त्यांच्या विवाहाचा प्रश्न सर्वच पालकांना भेडसावत असतो. सध्याच्या काळात मुलं-मुली दोघेही उच्चशिक्षित आहेत. चांगल्या पगारावर नोकरीला आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत. परंतु विवाह ठरविताना आपण अतिचिकित्सक असू नये. तसेच अपेक्षांच्रूा बाबतीत लवचिकता ठेवावी असे मला वाटते. तसेच जोडीदाराच्या बाबतीत काही अपेक्षा असतील तर त्यांची पालकांसोबत मनमोकळेपणाने चर्चा करावी.

जोडीदर निवडीसाठी ज्योतिषशास्त्राच्या सल्ल्याबरोबर डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक तपासण्या करुन वधू-वरांनी शरीर कुंडलीही तयार करवून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर विवाहपूर्व समुपदेशनही आत्यंतिक महत्त्वाचे आहे. आधुनिक काळाची ही गरज आहे.

महात्मा फुले यांनी समाजाला सत्यशोधक विवाहच्या रुपाने एक फार मोठी पर्यायी विवाह पध्दत बहाल केली आहे. विवाहातील निरर्थक खर्चांना फाटा देऊन आवश्यक विवाहविधी यामध्ये त्यांनी सांगितले आहेत. आपण ही विवाह पध्दत समजून घेणे आवश्यक आहे.

यावर्षी 'एल निनो'च्या प्रभावामुळे दुष्काळाचे सावट दिवाळीवर आहे. अपुऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके करपली आहेत. यंदाचा हिवाळा आपल्याला गारवा देणार नाही असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे महागाईचा भडकाही सर्वांना चटके देत आहे. विविध वैधानिक

मागण्यांसाठी जनआंदोलन सगळीकडे होत आहेत. त्याचे पडसाद जनमाणसावर नक्कीच पडत आहेत. या अस्थिर वातावरणातून बाहेर पडून देशात स्थिरता निर्माण व्हावी, वरुण राजाने आपल्यावर कृपा करावी हीच परमात्म्याकडे मागणी करणे इष्ट ठरेल.

संस्थापक, संपादक स्व. विजयकुमार नारायणराव लडकत यांच्या अथक परिश्रमातून माळी आवाजची घौडदोड दमदारपणे चालू होती. त्यांचे सप्टेंबर २०२० मध्ये कोरानाने निधन झाले. त्याचे हे कार्य पुढे चालू ठेवणे हीच त्यांना आदरांजली ठरेल हा विचार घेऊनच माळी आवाज परिवार दर महिन्याला सभासदांच्या हाती मासिक देत आहे.

माळी आवाजतर्फे यापूर्वी दरवर्षी अनेक उपक्रम राबविले जात. समाजातील दहावी, बारावी, पदवीधर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समाजातील विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य केलेल्या समाजबांधवांचा सत्कार, विधवा परित्यकत्या महिलांसाठी हळदीकुंकू, वधू-वर परिचय मेळावे असे अनेक उपक्रम माळी आवाजच्या वतीने गेली अनेक वर्षे आम्ही राबवित होतो.

स्व. विजयकुमार लडकत यांनी लावलेल्या या रोपट्याच्या शाखा महाराष्ट्रभर पसरल्या आहेत. पुणे, नाशिक, हिंगोली, औरंगाबाद, बारामती, ठाणे, अहमदनगर, वाई, सातारा, लातूर अशा अनेक विभागातून संचालक मंडळ व प्रतिनिधी मंडळ कार्यरत आहे.

'ज्ञानज्योती' हा विशेष दिवाळी अंक आपल्या हाती ठेवताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. खूप विचार करुन या अंकास 'ज्ञानज्योती' हे नाव देण्याचे आम्ही ठरविले. हे नाव अत्यंत अर्थपूर्ण, प्रेरणादायी आणि तेजस्वी असून यातून ज्ञान, विचार, सुसंस्कार आणि तेजोमय प्रकाश यांचा मिलाफ दिसून येतो.

ज्ञान म्हणजे माहिती, विवेक, शिक्षण, प्रगल्भ विचार, मानवी जीवनाला समृध्द करणारा एक अमूल्य ठेवा. ज्ञान माणासाला केवळ सुशिक्षित बनवत नाही तर सुसंस्कृत, विचारी, आत्मनिर्भर बनवते. मानवामध्ये कल्पनाशक्ती, व्यापक विचार व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करते. हीच ज्ञानसंपत्ती आम्ही या अंकातून आपणापर्यंत पोहचत आहोत.

'ज्योती' म्हणजे प्रकाश, तेज, शब्दांतून ज्ञानाची विचारांची ज्योत याचबरोबर क्रांतिसूर्य थोर समाजसुधारक ज्योतीराव फुले यांच्या कार्याचा नावाचा स्पर्शही या 'ज्ञानज्योती' शब्दाला होताना दिसतो. दिवाळीच्या दीपप्रकाशाप्रमाणे हा अंक वाचकांच्या मनात ज्ञानाचा, सकारात्मकतेचा आणि नवविचारांचा प्रकाश निर्माण करेल हीच आशा मनी ठेवून 'ज्ञानज्योती' अंक आपल्या हातात आम्ही देत आहोत.

या अंकाच्या मुखपृष्ठावर अनुष्का अर्जुन जगताप सकल रसिकजनांना, वाचकांना दीपावलीच्या शुभेच्छा देतानाचे मुखपृष्ठ या अंकाची शोभा वाढवते.

मुखपृष्ठाचे डिझाईन करताना आणि लेखांना अनुसरुन चित्रांचा योग्य ठिकाणी समावेश करताना माझी नणंद बीनाताई बुनगे, बहिण रंजनाताई जाधव, मुलगी देविका लडकत, मुलगा विक्रांत, डिटीपीचे काम पाहणारे श्री. योगेश काकडे या सर्वांचे मी आभार मानते. तसेच वेळेत दिवाळी विशेषांकाचे प्रिंटींग करुन देणारे शिवानी प्रिंटींगचे श्री. दीपक ढोले आणि मासिक आवाजचे सर्व प्रतिनिधी, संचालक मंडळ आणि सर्व साहित्यिकवृंदाचे मी मनापासून आभार मानते.

मासिक माळी परिवारातर्फे सर्वांना पुन्हा एकदा दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा ! आपल्या जीवनात ही दीपावली सुख, शांती, आनंद, आरोग्य, सफलता, समृध्दी, स्नेह आणि सन्मान घेऊन येवो, हीच प्रभुचरणी प्रार्थना !



जैसे कर्म तैसे फळ

बीना राजेश बुनगे
माध्यमिक शिक्षिका – सेवासदन संस्था, पुणे
धायरी, पुणे – ४१.
मो.: ९८८१५८५०४०

लहानपणापासून आई वडिलांनी मनावर संस्कार करताना हेच सांगितले की, नेहमी चांगले कर्म करावे, प्रामाणिकपणे वागावे. सत्याने चालावे. जेवढी आपल्याला शक्य आहे तेवढी इतरांना मदत करावी. आमच्या घरी दररोज सायंकाळी एक गाय नित्यनेमाने येत असे, आईने सांगितल्याप्रमाणे आम्ही तिला दररोज हळदी-कुंकु लावून चपाती किंवा भाकरी खाऊ घालायचो, 'गोसेवा महान सेवा' हे आमच्यावर बिंबवले गेले होते, भूतदयेचे संस्कार नकळत अजाणत्या वयात झालेले होते. घरामध्ये सकाळी सहा वाजल्यापासून ते रात्री साडेअकरा वाजेपर्यंत आकाशवाणी आपले अनमोल योगदान सर्वांनाच देत होती. अभंग, मराठी-हिंदी गीते, बातम्या मार्गदर्शनपर माहिती या साऱ्याचा परिपाक म्हणजे आमची आकाशवाणी. रेडिओवर प्रल्हाद शिंदे याचे एक गाणे सतत लागायचे –

जगी जीवनाचे सार घ्यावे जाणूनी सत्वर
जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर ।।

या गाण्याचा अर्थ लहानपणी एवढा नाही कळला परंतु, पुढे जीवन जगताना मात्र याची अनुभूती येत गेली. गाण्यातील गांभीर्य व वास्तव समजू लागले. आयुष्याचा खरा अर्थ स्पष्ट होत गेला.

भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीत सांगितले आहे – 'गहनो कर्मणो गतिः'

कर्माची गति फार गहन आहे. रहस्यमय आहे, आपले जीवन खूप गूढ आणि गुंताणुतीचे आहे.

परमेश्वराने मनुष्याला जन्माला घालताना सारखेच अवयव सगळ्यांना दिले. परंतु, रंग, रुप, स्वभाव, बुध्दी, वृत्ती यात मात्र विविधता दिली. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणेच 'व्यक्ती तितक्या त्याला लाभलेल्या परिस्थिती' असे म्हणता येईल.

येथे श्रीकृष्णाचा मित्र भक्त सुदामा याचे बोल मार्मिक ठरतील. तो म्हणतो –

कर्माची गति खरोखर अति गहन ।
आम्ही दोघे एकाच गुरुचे शिष्य ।।
पण तो श्रीकृष्ण झाला पृथ्वीपति ।
माझ्या घरात खायला नाही माती ।।

यावरून आपले जीवन गूढ, रहस्यमय आहे याची प्रचिती आपल्याला येते. एक माणूस दुःखी, तर दुसरा सुखी. एक गरीब तर दुसरा श्रीमंत. असे का ? एवढेच नाही तर धूर्त, लबाड, स्वार्थी माणूस सुखी जीवन जगत असतो तर प्रामाणिक, सदाचारी, नम्र माणूस दुःखी जीवन भोगत असतो. हा विरोधाभास का? समाजामध्ये मूठभर लोक श्रीमंत तर ढीगभर लोक गरीब, एका बाजूला बंगल्यांची आलिशान सोसायटी दिसते तर त्याच्या समोरच ढीगभर झोपड्यांची गर्दी दिसते.

भगवद्गीतेत, अध्यात्मात, पौराणिक ग्रंथात याचे उत्तर खूप सुंदर रितीने दिले आहे. कर्माच्या सिध्दांतानुसार माणसाने जसे कर्म केले तसेच फळ त्याला मिळते. म्हणजेच चांगले कर्म म्हणजेच सत्कर्म केल्यास चांगले फळ आणि वाईट कर्म म्हणजेच दुष्कर्म

केल्यास वाईट फळ मिळते.

अर्थातच काही लोकांचा हा प्रश्न येथे असेल की हा नियम कोणी केला? चांगले वा वाईट फळ येथे कोण देते? तर हा कर्माचा नियम, कर्माचा कायदा करणारा ब्रह्मांडातील नियंता 'परमात्मा' आहे असे अध्यात्म सांगते. सूर्य दररोज उगवतो व मावळतो. वारे वाहतात. पाऊस पडतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतु नेमाने येतात. हा सृष्टीचा, विश्वाचा कारभार पाहणारा नियंता म्हणजेच परमेश्वर होय की ज्याच्या हातात संपूर्ण ब्रह्मांडाचा रिमोट कंट्रोल आहे.

आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत जे जे काम करतो ते ते कर्म होय. चांगली कर्मे, वाईट कर्मे ही आपल्या खात्यात जमा होतात. योग्य वेळ आली की त्याचे चांगले, वाईट फळ आपल्याला मिळते. हे संचित कर्म होय.

श्रीरामचंद्राचे पिता राजा दशरथ यांनाही कर्मसिध्दांतानुसार पुत्र विरहामुळे मृत्युला कवटाळावे लागले. श्रीरामचंद्रहालाही वनवास चुकला नाही. श्रीरामचंद्र भगवंताचा अवतार म्हणून तेथे कोणतीही सवलत किंवा दयामाया त्यांना मिळाली नाही. तद्वत राजा धृतराष्ट्राचे शंभर पुत्र युध्दात मारले गेले. त्यावेळी माझ्या संपूर्ण आयुष्यात मी कोणालाही दुखावले नाही मग शंभर पुत्रांचा शोक करण्याचे माझ्या नशिबी का यावे असा प्रश्न धृतराष्ट्राने श्रीकृष्णाला केला. त्यावेळी श्रीकृष्णाने दिव्य दृष्टीने धृतराष्ट्राला त्याच्या पन्नास जन्म मागे नेले आणि त्याला दाखवले की तो तेव्हा एक पारधी होता. पक्षी पकडण्यासाठी त्याने एका वृक्षाला आग लावली. या आगीच्या धगीत अनेक पक्षी होरपळून मृत्युमुखी पडले, कित्येक पक्षी जखमी झाले. आंधळे झाले तर बरेचसे पळून गेले. त्याचे हे संचित दुष्कर्म पक्व होऊन धृतराष्ट्राला फळ देण्यास तयार झाले. राजा आंधळा जन्माला आणि शंभर पुत्र त्याचे युध्दात मारले गेले. कर्मसिध्दांतानुसार प्रत्येकाला चांगली, वाईट फळे भोगावीच लागतात.

'प्रारब्ध कर्म' हा संचित कर्माचा तो भाग असतो जो आपल्याला या जन्मात अनुभवायचा असतो. मागील जन्माच्या कर्मानुसार सर्व प्रारब्ध कर्म पूरेपूर भोगल्यानंतरच आपल्याला मोक्ष प्राप्ती होते. काही व्यक्ती ऐन यौवनात हृदयविकार, अपघात किंवा काही आजारांनी मृत्युमुखी पडतात. तर काही वृध्द व्यक्ती अर्धांगवायुने बिछान्यावर कित्येक वर्ष पडून असतात. ती वैतागतात आपल्याच परावलंबी या अवस्थेवर. घरातील लोकही त्यांना कंटाळतात. ही व्यक्ती देवाजवळ मरणे दे म्हणून याचना करते पण जोवर प्रारब्ध भोगून पूर्ण होत नाही तोपर्यंत त्याला मरण येत नाही.

थोडक्यात काय आपण जशी कर्मे करतो तशी त्याची फळे आपल्याबरोबर येतात. म्हणून वाईट कर्म करण्यापूर्वी माणसाने शंभर वेळा विचार करावा. कारण त्याचे फळ आज ना उद्या भोगावेच लागते.

समाजामध्ये आपण पाहतो की काही लोक हे अगदी आयते बसूनही गडगंज पैसा कमावतात. लक्ष्मी त्यांच्या पायाशी लोळण घेत असते. ते ऐषारामी जीवन जगतात तर याउलट काही लोक खूप कष्ट करतात. घाम गाळतात परंतु त्यांच्या पदरी पुरेसा पैसाही पडत नाही. आयुष्यभर त्यांना पैशाशी तडजोड करत जगावे लागते. पैशाअभावी अनेक चिंता त्यांना सतावतात. याचे कारण एकच ते म्हणजे आपल्या प्रारब्धानुसार आपण सुख-दुख अनुभवतो. दुसरे कोणीही आपल्यावर आलेल्या परिस्थितीचे कारण असत नाहीत.

'जैसे कर्म तैसे फळ' हा सद्विचार आपल्याला

जबाबदार बनवण्यासाठी आहे. आपण कायम हे लक्षात ठेवले पाहिजे की हा निसर्ग, ब्रह्मांड कोणाचेच कर्ज ठेवत नाही .त्याची परतफेडही आपल्याला करावीच लागते.

कर्माचे हे चक्र मोठे
इथे काही नाही खोटे
गोड फळ सत्कर्म देई
दुःखाचे ओझे दुष्कर्म वाही

भगवद्गीतेतील कर्मसिध्दांत आपल्याला जीवनात योग्य दिशा दाखवणारा आणि मनाला शांती देणारा महान असा विचार आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचना'

हा विचार आपल्याला हेच सांगतो की, तुझा अधिकार हा फक्त कर्म करण्यावर आहे. त्याच्या फळावर म्हणजेच परिणामावर कधीही नाही. त्यामुळे फळाची अपेक्षा ठेवून कर्म करु नकोस. त्याचप्रमाणे फळ मिळणार असेल तरच मी कर्म करीन, अशी भावना माणसाने ठेवू नये. कर्तव्यबुध्दीने प्रामाणिकपणे आपल्या अंतरात्म्याच्या समाधानासाठी कर्म करावे. आपली सुखदुःखे आपल्या नशिबावर, प्रारब्धावर सोडावीत. आपली नियत साफ ठेवावी. कारण कर्मापेक्षा त्यामागील तुमची भावना जास्त महत्वाची आहे.

'भगवान के घर देर है अंधेर नही' अशी म्हण बहुश्रुत आहे. कोट्यावधी रुपयांची फसवणूक करुन पळून जाणारा देशद्रोही नीरव मोदी, मेहूल चोक्सी जामतारा आणि मेवात मधील सायबर गुन्हेगार टोळ्या, अवैध वाळू माफिया, अंमली पदार्थांची तस्करी करणारे ड्रग माफिया, मसूद अझहर सारखे दहशतवादी, अनेक घोटाळे करणारे राजकारणी, प्रसिध्द तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांनी दिलेली देणगी हडपणारे पुजारी आणि ट्रस्टी, बलात्कार करणारे नराधम, अनेक कार्यालयातून पोसले जाणारे भ्रष्टाचारी हे सारे दुष्कर्माचे धनी आहेत. प्रारब्धानुसार योग्य वेळ आल्यावर प्रत्येकालाच त्यांच्या दुष्कृत्याची परतफेड करावीच लागते. केलेल्या कृत्याची कित्येक जास्त पटीने वाईट फळे भोगावीच लागतात.

कलिंगच्या युध्दातील रक्तपात पाहून सम्राट अशोकाने हिंसा सोडली आणि समाजपयोगी अनेक कामे केली. त्याच्या या हृदयपरिवर्तनामुळे त्याचे 'सम्राट अशोक' हे स्थान जनमानसात निर्माण झाले. भक्त प्रल्हादालाही त्याच्या ईश्वर भक्तीमुळे जीवदान मिळून राजपद प्राप्त झाले. 'जैसे कर्म तैसे फळ' याची प्रचिती यातून मिळते. डॉ. आमटे दांम्पत्याने हेमालकसामध्ये चालवलेले दुर्गम आदिवासींसाठीचे आरोग्य सेवाकार्य, सिंधूताई सपकाळ यांचे शेकडो अनाथ मुलांमुलींसाठीचे समाजपयोगी प्रेरणादायी कार्य, हजारो टन प्लास्टिक कचरा हाताने गोळा करुन मुंबईच्या समुद्रकिनाऱ्याला स्वर्ग बनवणारे अफरोज शाह, ब्रह्मपुत्रा नदीच्या वाळवंटी बेटावर तब्बल ४० वर्षे झाडे लावून मोलाई जंगल उभे करणारे 'जाधव पायेंग', गडचिरोली भागात तसेच ग्रामीण भागात आरोग्यसेवा, संशोधन व सामाजिक कार्यासाठी प्रसिध्द असणारे डॉ. अभय बंग आणि राणी बंग, विस्थापित आणि वंचित लोकांसाठी कार्य करणाऱ्या मेधा पाटकर, कुष्ठरोग्यांची सेवा करणारे बाबा आमटे असे अनेक सत्कर्मी हे आपल्या कार्याची पावती देतात आणि मानवजातीचे भले करतात. आपल्या कार्याने हे जगात अमर होऊन राहतात. लोकांचा आदर्श होतात. हे सत्कर्माचे फळ आपोआप त्यांना प्राप्त होते.

म्हणूनच आपण कायम हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतेही कर्म करताना त्याचे चांगले व वाईट हे भोग मला भोगायचे आहेत. त्याप्रमाणे आपल्या हातून

सत्कर्मच घडेल याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ज्यावेळी वाईट परिस्थिती आपल्यावर येईल तेव्हा हे माझ्या कर्माचे भोग आहेत हे लक्षात ठेऊन त्या परिस्थितीला आपण तोंड द्यावे. या परमात्म्याकडे कायम एकच मागणी करावी. 'मला ताकद दे, हिम्मत दे, चांगले आरोग्य दे, चांगले विचार दे जेणेकरुन मी सत्कर्मच करेन'.

देव माझा विठू सावळा

देव माझा विठू सावळा
या काळजाचा ठेवा
पायी चालत दिंडीत
पंढरीच्या वाटेवर लागे
पांडुरंगाला भक्ताचां लळा
कटेवरी दोन्ही कर उभा
भुवैकुंठीचा राणा
मुखी रामकृष्ण हरी बोला
ज्ञानदेव, तुकाराम, सोपान, मुक्ताबाई,
चोखामेळा, कान्होपात्रा, सखुबाई, जनाबाई
सावतामाळी, सेना, नरहरी सोनार ही नामदेव कुर्मामेळा
सारी लेकुरे विठ्ठलाची
नाही भेद, उच्च नीच जातीचा अहंकार ना संपत्तीचा,
खरं तर विठ्ठल हाच
आम्हा बहुजनांचा देव
संतांच्या पाऊलखुणा पाहून
चालावे , स्नान करावं
चंद्रभागा पवित्र तीर्थक्षेत्र
भगवी पताका खांद्यावर..
जय हरी माऊली
आपण मायेची सावली..
वारीतील वैष्णवांना
काव्य सुमनांजली
अर्पण करीतो हा दास

– श्री. राम गायकवाड
पुणे

फास

बाप कुदळतो रानं
फोड हातावर येतो
धारं घामाची अंगाला
गंध मातीला लागतो...

येतो रानाला वापसा
बाप पेरणी करतो
लेकराच्या मुखातला
घास जमिनीला देतो...

आई काढते गवतं
अंगी फाटके लुगडे
फाटलेल्या लुगड्याला
नशिबाची हो ठिगळे...

पीक येता काढणीला
बाप करतो राखणं
आई पाहते दुरून
रूप शेताचं देखनं...

लागे पिकाला वनवा
पीकं झाले राखं राखं
बाप पळतो कडनं
काळजातं होते आग...

मुखातला लेकरांच्या
नेला नशिबाने घासं
माझ्या बापाच्या गळ्याला
लागे करजाचा फास...

– श्री. परशुराम लडकत
(कवी प्रशांत)
मो.: ८१४९४७४९६१



आठवणीतले आजोळ की आजोळातील आठवणी ?

रागिणी विजयकुमार लडकत
मो.: ८७६७५८१९०६

आली आली उन्हाळ्याची सुट्टी मामाकडे जायची वेळ झाली. उन्हाळी सुट्टी आणि मामाचे गाव याचे नाते काही औरच असते. लहानपणी कधी शाळेला सुट्टी लागते आणि मामाकडे जातोय असे व्हायचे. माझे आजोळ पुण्याजवळ खडकवासला या गावी होते, असे आता म्हणावे लागेल कारण आता तिथे मोठा नांदेड सिटी हा गृह प्रकल्प उभा राहतोय. त्यामुळे मामाचे घर आणि तिथल्या आठवणी आता फक्त मनातच राहिल्यात. मामाचे घर तसे मोठे होते. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब असायची तसेच मामाचे २० ते २५ लोकांचे खटल्याचे घर होते. मला सख्खे व चुलत मिळून सात मामा पाच मावशी व त्यांची मुले असे मिळून ३०-३५ जण आजोळी हजर असायचे. माझे मोठे मामा मला न्यायला गावी यायचे किंवा आई सोडायला यायची. येताना खूप आनंद व्हायचा कारण बाकीचे मावस भावंड सर्वजण माझ्या आधीच हजर असायचे. मामाकडे गेल्यावर त्यांना भेटायला मिळणार काय काय मज्जा करायची याची आखणी आधीच व्हायची.


मामाचे घर ऐसपैस होते पुढे अंगण व अंगणात गावठी गुलाब व मोगऱ्याचे झाड होते. मोगऱ्याला खूप फुले व कळ्या यायच्या. आमचे एकच काम फुले तोडून गजरा करायचा. घर शेतात असल्यामुळे घरासमोर मोठे आंब्याचे झाड व सात-आठ फणसाची झाडे होते. फणसाच्या झाडाला बुंद्यापासून फणसे लगडलेली असायची मग काय मस्तपैकी मामा फणस कापायचा आम्ही गोल करून त्या भोवती बसायचो. मामा हाताला व सुरीला तेल लावून फणस कापायचे. त्यामुळे गरे व्यवस्थित काढता यायचे. गरे काढले की डिश घेऊन तयारच असायचो गरे फस्त करून लगेच खेळायला पळायचे. आंबा, चिंच, जांभूळ याची भरपूर झाडे होते. पेरूचा खूप मोठा बाग होता. झाडावर चढून पेरू तोडून खायचे याची मज्जाच वेगळी होती. आंबा झाडावरून उतरायला मामा बरोबर आमची टोळी जायची व आंबा घरी आणल्यावर त्याची अडी घातली जायची पण आम्हाला आंबे कधी पिकतील आणि त्याचा स्वाद कधी एकदाचा घेतोय असे व्हायचे.


त्यासाठी आम्ही जिथे आंबे पिकण्यासाठी ठेवले जात असायचे तिथे सतत ये र झाऱ्या घालायचं आंबे पिकलेत का नाही हे चापसून पहायचो पण मामा आम्हाला कधी सांगत असे तर कधी ओरडत असेल असे सारखे सारखे आंब्याला हात लावायचा नाही नाहीतर ते लवकर पिकणार नाहीत. आंबे पिकले की मामा पाटी भरून आंबे काढायचा आणि म्हणायचा, 'खा आता काय खायचं तेवढे आंबे'. मग काय दिवसभर आंबेच आंबे खायचो. येता जाता आंबा खायचं आता उन्हाळा आला की मामाच्या गावाच्या आंब्याची खूप आठवण येते. मामाच्या घराच्या मागील बाजूस गुरांचा गोठा होता. त्यात गाई म्हशी त्यांची वासरे होती. सकाळ संध्याकाळी धार काढली जायची आजोबांचा एक नियम होता सकाळी लहान मुलांना उठल्यावर एक ग्लास निरस दूध



किचन ओट्यावर भरपूर फुलपात्रे ग्लास दूध भरून मामी ठेवत असे सगळेजण एकेक भांडे उचलून दूध पीत असु ताज्या दुधाची चव आजही विसरता येत नाही आताच्या दुधात ती चव शोधून ही सापडत नाही.

आम्ही दिवसभर उन्हातानात खूप खेळायचो मग आजी आम्हाला ओरडायची म्हणायची, 'पोरांनो उन्हात नका खेळू सावलीला बसून खेळा कारण दुपारी खूप ऊन असायचं मग आम्ही सर्वजण सावलीला बसून चल्लससाठ. कॅरम पत्ते खेळत असू आजी त्यांच्या लहानपणीच्या गमती जमती व गोष्टी पण सांगायची त्या ऐकण्यात आम्ही मग्न व्हायचे. दुपारची वेळ गेली की सांज वेळेला आम्ही मग लगोरी लपंडाव लंगडी बॅट बॉल असे वेगवेगळे खेळ खेळायचे आणि माझा सर्वात आवडीचा खेळ म्हणजे सायकलच्या टायरमध्ये काठी घालून पळवत नेणे यामध्ये आमची रेस लागायची. कोणाचा पहिला नंबर येतोय माझ्या मुलांना माझ्या बालपणीच्या गमतीजमती सांगताना मला म्हणतात, 'तुमचं लहानपण किती छान गेलं आम्हाला आत्ता असे काहीच खेळ नाहीत'. हे खेळ खेळताना मज्जा करताना सुट्टीचे दिवस कधी संपायचे ते कळतच नसे सुट्टी संपत आली की मनात हुरहुर लागत असे की वाटत असे अजून थोडी सुट्टी असती तर किती छान झालं असतं. असं कितीही वाटत असलं तरी घरी जावेच लागणारच होते आई-बाबा मला घेण्यासाठी येण्याचा आनंद आणि मामाचं घर सोडून जायचं दुःख हे मनात आणि चेहऱ्यावर स्पष्ट दिसायचा. घरी जायच्या आदल्या दिवशी आई-बाबा आम्हाला घरी नेण्यासाठी मामाच्या घरी आले आजी मामाने आई बाबांचा उत्तम पाहून विचार केला आजीने आईसाठी कुरड्या, पापड्या, शेवया असा वानवळा भरला आणि माझ्यासाठी खाऊ दिला आणि सकाळी लवकर आवरून निघालो. मला घरी जाऊ वाटत नव्हते हे माझ्या चेहऱ्यावर दिसत होते हे आजी व मामाने ओळखले मग आजीने मला मिठीत घेऊन तोंडावर मायेने हात फिरवत म्हणाली पुढच्या वर्षी शाळेला सुट्टी लागल्या लागल्या लगेच ये चांगला अभ्यास कर आईला त्रास देऊ नकोस असं हळुवार आवाजात म्हणाली आम्ही जाताना आजीचे डोळे पाणावले हे माझ्या आईला जाणवले. आई आजीतला म्हणाली नको ग काळजी करू तू फक्त तुझी काळजी घे आणि आम्ही टाटा बाय-बाय करून आमच्या घरी निघालो.





रिटायरमेंट

लेखन – शेखर गायकवाड
ई–मेल– shekharsatbara@gmail.com

एखाद्या सरकारी नोकरी मिळवण्याचा जेवढा आनंद नोकरीच्या पहिल्या दिवशी असतो तेवढेच दुःख नोकरी संपल्यावर असते. बदली, बढती आणि रिटारयरमेंट या तीन शब्दात सुध्दा सरकारी नोकरीचे वर्णन केले जाते.

त्यापैकी रिटायरमेंट हा एक महत्त्वाचा व अविभाज्य टप्पा आहे. रिटायरमेंटची चाहूल चांगली ४–५ वर्षे आधीच सुरु होते. 'आता थोडे दिवस नोकरीचे राहिले आहेत.' असे वारंवार घरच्यांच्या बोलण्यात येऊ लागले. रिटायरमेंटच्या अगोदर गावाजवळ बदली करुन घेण्यासाठी अर्जफोटे करण्यास सुरुवात होते. रिटायर होणाऱ्यास अचानक नातेवाईकांची व भावकीची गरज वाटू लागते. लग्नाचा मुलगा किंवा मुलगी असल्यास त्यासाठी स्थळे शोधण्यास सुरुवात होते. जो तो नातेवाईक भेटला की 'साहेब अजुन किती नोकरी राहिली?' असा प्रश्न विचारुन सरकारी माणूस गावी परत नक्की जमीन करायला येणार नाही ना याची चाचपणी करायला सुरुवात करतो. एवढेच नाहीतर 'तुमच्याकडे पाहून अजून पाच–दहा वर्षे राहिली असतील !' असे उद्‌गार पण काढतो ! सरकारी माणसाची गावाजवळ बदलीची गरज व निकड पाहून वरिष्ठ आणि बदली करणारे हे त्या सरकरी नोकराच्या सोयीचे पोस्टींग देणे कसे अवघड आहे हे त्याला सांगून बदलीचा भाव वाढवून घेतात !

प्रत्यक्ष रिटायरमेंटच्या ६ महिने अगोदर असताना पेन्शन पेपर्स करायला सुरुवात होते. त्यावेळी पहिल्यांदा कर्मचाऱ्याला समजते की, आपण काढलेली रजा, अर्जित रजा, वेतनवाढी, वेतननिश्चिती, पडताळणी, दांड्या, अनधिकृत गैरहजेरी, कराच्या वजावटी या कशाचाचमेळ लागत नाहीये ! शासकीय कामात काटेकोर असणाऱ्या बहुसंख्य अधिकाऱ्यांची सुध्दा सर्व्हीस पुस्तके अद्‌यावत नसतात. त्यात घेतलेले ॲडव्हान्स, भत्ते, वाहनकर्ज, गृहकर्ज, व्याज भरलेल्या रकमा व दिनांक यांचा मेळ जमवेपर्यंत रिटायरमेंटचा दिवस उजाडतो.

चांगले काम केले असते तर कार्यालयात निरोप समारंभ आयोजित करतात. रिटायरमेंटच्या वेळी झालेल्या भाषणांतून व्यक्तीमत्व उलगडते. समारोपाच्या भाषणात सहकारी चांगलेच बोलतात. बहुसंख्य कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सतत ३०–३५ वर्षे चाकोरीबध्द जगल्यामुळे एक शिस्त आलेली असते. रिटायरमेंटमुळे अचानक ती शिस्त गळून पडते ! दुसऱ्या दिवशी सकाळी सवयीप्रमाणे ९.३०–९.४५ ला काही रिटायर्ड लोक ऑफिसला जाण्याची तयारी करुन बसतात. पुढे कुठे जायचे हे माहित नसतानाच ! चांगले मित्र किंवा छंद नसलेल्या अनेक लोकांच्या बाबतीत पूर्ण वेळ नोकरी एके नोकरी केल्यानंतर अचानक पोकळी निर्माण होते ! तर काहीजण रिटायर झालो आहोत हे विसरुन चक्क ऑफिसला जातात. पहिले एक दोन दिवस ऑफिस स्टाफ त्यांना 'या, बसा! चहा प्या! '

त्यानंतर मात्र त्यांच्यावर विनाकारण ऑफिसला येतात असा आरोप येतो. काहीजण चक्क ऑफिस मधली दुसऱ्यांशी कामे करुन देण्याचे दलालीचे काम सुरु करताना रिटायरमेंट नंतर सरकारी कामाचे ओझे नाहीसे झाल्यामुळे काही कर्मचारी अचानक ताजेतवाणे दिसू लागतात, तर काही कर्मचारी अचानक पारदर्शी होऊन दिसेनासे होतात. एक सरकारी अधिकारी हाताखालील लोकांना फार त्रास द्यायचा. तो एकदा मुंबईच्या लोकल स्टेशनवर उभा असताना त्याच्या कार्यालयाचे लोक त्याला पाहून तोंड फिरवून ओळख न दाखवता दुसरीकडे गेले. तेव्हा त्याला जाणवले की, 'आपण असे न दिसायला अचानक पारदर्शक झालो की काय?' काही अधिकारी जे आयुष्यभर कार्यालयात कडक शिस्तीने वागत असतात ते रिटायर होताना त्यांचे कुटुंबीय चिंतेत पडतात. निदान ८-१० तास कार्यालयात शिस्त लावणारा माणूस पूर्णवेळ घरी राहील्यावर त्यांच्यासाठी नवीनच संकट उभे राहते.

रिटायर झाल्यावर खऱ्या अर्थाने साहेबांची बायको त्यांची बॉस बनते ! एका अधिकाऱ्याने त्याच्या कार्यालयातील स्टफला रिटायर होताना भाषणातून एकच सल्ला दिला, 'उद्यापासून बायको हिच बॉस, तुम्ही जेवायला सुध्दा बसताना नेहमीच्या खुर्चीत बसू नका. ती पत्नीला दया. घरी गेल्या-गेल्या पत्नीच्या पाया पडला तर जीवन अधिक सुखी होईल' !

काही लोक प्रशासनात काम करतानाच प्रचंड लोकाभिमुख काम करतात आणि रिटायरमेंटनंतर कधी धार्मिक किंवा सामाजिक कामाला वाहून घेतात किंवा गावी जाऊन शेती करतात. रिटायरमेंटला काही जण शांतीपर्व असेही म्हणतात..!



बळी पिकवितो मोती

बैल जोड नांगराला
धारा घामाच्या सोबती
हात मातीत राबती
बळी पिकवितो मोती

उन्हा पावसाची नसे
त्याला कधीच रे भीती
चिंता ती काळ्या आईची
बळी पिकवितो मोती

काळ्या मातीतून कशी
डोले हिरवी ही शेती
साऱ्या जगाचा पोशिंदा
बळी पिकवितो मोती

दाणे कणसाला येता
रान खुशीत डोलती
हर्ष मनी साठवुनी
बळी पिकवितो मोती

होता कष्टाचे रे चीज
भरे धान्याची ही पोती
सुख आले दारी आज
बळी पिकवितो मोती

– शुभांगी धारमाळकर

पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा



लेखन – कुमारी अनुश्री अशोक बरळ
इयत्ता पाचवी
सरस्वती विद्यालय, कोरेगाव, जि. सातारा

''पर्यावरण आहे अनमोल देणगी
सावध रहा उडेल ठिणगी
पर्यावरणाच्या साथीने साधा प्रगती
तुमच्या जीवना येई गती''

आपण पृथ्वीवर राहातो. ही धरणीमाय आपल्या जीवन देते. तिच्यामुळे आपले आयुष्य सुखकर होते. परंतु मानव आपल्या धरणीमायेची अजिबात फिकीर न करता पर्यावरणाचा संहार करत चालला आहे. याचे अतिशय महाभयानक परिणाम मानव जातीला भोगावे लागणार आहेत.

''वृक्ष संगती सदा घडो
मंजूळ पक्षीगान कानी पडो
कलंक प्रदूषणाचा झडो
वृक्षतोड सर्वथा ना आवडो''

पर्यावरणाचे संवर्धन करण्यात झाडे खूपच महत्वाची भूमिका बजावतात. झाडे भरपूर लावली पाहिजेत. त्या सर्व झाडांची व्यवस्थित काळजी घेतली तर त्यांचे महान वृक्षात रुपांतर होईल. पक्ष्यांना छान आसरा मिळेल. त्यांची पिल्ले सुरक्षित जीवन जगतील.

आपल्याला आपले स्वतःचे जीवन उद्ध्वस्त करायचे नसेल तर आपण आपल्या पर्यावरणबाबत जागरुक होणे ही सध्याच्या काळाजी गरज आहे.

''माकडा माकडा हूप हूप
झाडे लावा खूप खूप
थांबेल जमीनीची धूप धूप
पालटेल पृथ्वीचे रुप रुप''

खरचं, आपल्या धरणीमातेचे रुपडे पालटायचे असेल तर भरपूर प्रमाणात सगळीकडे माळरानावर,डोंगरावर, ओसाड भागात भरपूर झाडे लावणे आपल्याला गरजेचे आहे.

''काम करा मोलाचे
पर्यावरणाला संवर्धनाचे
प्रदूषणाला आळा घालण्याचे
पाणी जपून वापरण्याचे''

पाणी अनमोल आहे. ते जपून वापरले पाहिजे. प्रदूषण कमी करण्यासाठी वाहनांचा आवश्यक तेवढाच वापर करावा. पर्यावरण वाचवणे ही प्रत्येकाने आपली जबाबदारी आहे असे मानून काम करावे म्हणजे पर्यावरण सुरक्षित राहील.

यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

म्हणूनच मला असे वाटते की आपण सर्वांनी आपले पर्यावरण वाचवण्यासाठी उपाय करावेत.

''आओ मिलकर पेड लगायें
हरियाली का संदेश फैलाये
पेड, पौधे को मत करो नष्ट
सांस लेने में होगा कष्ट''

आपण पर्यावरण प्रदूषण पाण्याचे योग्य नियोजन व वापर, जमिनीची धूप थांबवणे, पावसाचे पाणी साठवणे व वापरणे प्राण्यांना, पक्ष्यांना जीवन देणे अशा गोष्टी केल्या तर पर्यावरण वाचेल आणि आपणही सुखी होऊ. स्वच्छ शुध्द हवा मानवी आरोग्यास चांगली असते. तसेच पाणी स्वच्छ असेल तर रोगराई टाळता येते म्हणून या सर्व गोष्टींची काळजी घेऊन आपण पर्यावरण वाचवूया.



पथ्य – औषधांपेक्षा मोठं औषध

डॉ. लीना बोरुडे
आयुर्वेदाचार्य, पंचकर्म व वैद्यक, योग तज्ञ.
मो. ९५११८०५२९८

बापरे आयुष्यभर पथ्य पाळायचे वाचूनच भीती वाटली का??

अहो पथ्य म्हणजे अगदी फक्त उकडलेलं जेवण घेणे असे नाही तर आपला आजार, आपली प्रकृती, आपला देश, काल हे सर्व पाहून वैद्यांनी सुचवलेला आहार घेणे. त्यामुळे जास्त दिवस औषध घ्यावे लागत नाही.

बऱ्याचदा जेव्हा आम्ही पेशंटला पथ्यपालन सांगतो तेव्हा त्यांच्या भुवया उंचावतात त्यांना वाटतं आयुर्वेदात खूप सारे पथ्य आहेत त्यामुळे काय खायचे हा प्रश्न पडतो पण जर तुम्ही नीट लक्ष देऊन पाहिले तर खूप सारे पदार्थ खाता येण्यासारखे असतात पण आपल्याच चुकीच्या सवयी आपल्याला नडतात आणि त्यामुळे आपल्याला त्रास होतो. खरंतर योग्य आहार हेच औषध आहे.

जेव्हा पेशंटला सांगितले जाते की अमुक एक गोष्ट खाऊ नको तेव्हा ते काय करतात, थोडसं खाल्लं मी, एकदाच घेतलं किंवा अशी काहीतरी कारणं देतात आणि अपथ्य करतात.

आपण अनेकदा विचारतो –

मी औषध घेतोय, मग बरं का वाटत नाही?

पण एक प्रश्न आपण स्वतःला विचारतो का मी पथ्य पाळतोय का?

तुमचा अग्नि तुमच्याशी बोलतो आहेः

कल्पना करा :

तुमच्या शरीरातील जठराग्नि हलक्या आवाजात सांगतोय

'मी थकलो आहे.
मला विश्रांती द्या.
मला वेळेवर अन्न द्या.
मला योग्य अन्न द्या.'

पण आपण काय करतो?

सकाळी उशिरा उठतो.
दुपारी काहीही चालेल म्हणून खातो.
संध्याकाळी पार्टी.
रात्री उशीरा जड जेवण.
आणि मग म्हणतो –
'गॅस का होतोय? पोट का फुगतंय?'

आयुर्वेद काय सांगतो?

आजार अचानक होत नाही.
तो हळूहळू सवयींमधून तयार होतो.

आजचा lifestyle –

उशिरापर्यंत जागरण
अनियमित आहार
पॅकेज्ड फूड
सतत स्नॅक्स

यातूनच Heart disease, PCOD, Diabetes, Obesity यांसारखे Lifestyle disorders जन्म घेतात.

पहिलं औषध काय?

Lifestyle सुधारणा.

पालेभाज्या की फळभाज्या?

आजकाल 'ग्रीन खा' असा ट्रेंड आहे.

पण प्रत्येक हिरवी गोष्ट पचेलच असं नाही. मोठ्या पानांच्या भाज्या – तंतुमय, काही वेळा जड कच्च्या भाज्या सॅलड शक्यतो टाळावे. बीट वाफवून घ्यावे.
पावसाळ्यात लवकर खराब, फवारणीचा मुद्दा लक्षात घ्यावा तर दुधी, पडवळसारख्या फळभाज्या हलकी, मृदू तंतू, सहज पचनास मदत करणाऱ्या भाज्या खाव्यात.

<u>आयुर्वेद नेहमी एकच सांगतो –</u>
प्रमाण, प्रकृती, भूक आणि ऋतू यानुसार खा.
निरोगी राहायचे तरः
सकाळी ५.३०–६ ला उठा, रात्री १० पर्यंत झोपा
रात्रीचे जेवण ६–७ मध्ये. सूर्यास्तानंतर जड अन्न टाळा.

<u>रात्रीचे आदर्श जेवण :</u>
ज्वारीची भाकरी + फळभाजी + मुगाचे वरण + गाईचे तूप, मुगाची खिचडी/उकडलेल्या भाज्या/भाज्यांचे घरी बनवलेले सुप्स . सुप बनवताना दुधाचा वापर नको (रेडिमेड सुप नको)/भाजणीचे थालिपीठ इ.

<u>कडधान्यांचा विचार :</u>
मूग – हलका, संतुलित
इतर कडधान्ये – वात वाढवणारी, जड दररोज सर्व काही खाणे म्हणजे संतुलन नव्हे. पॅकेज्ड फूड अगदी क्वचित तेही दुपारी.

<u>आपल्या मातीतलं अन्न :</u>
तीळ, ज्वारी, बाजरी, नाचणी –
ही आपल्यासाठीच उगवलेली. नवीन ट्रेंडपेक्षा आपल्या भूमीवर विश्वास ठेवा.

तुम्हाला आयुष्यभर औषध घ्यायचे आहे का?
की थोडे नियम पाळून औषधांपासून मुक्त व्हायचे आहे?
पथ्य हे शिक्षा नाही. ते शरीराशी केलेली मैत्री आहे. औषधं आजार बरी करतात. पथ्य आयुष्य निरोगी ठेवते. त्यामुळे सातत्याने पथ्य पाळायचे व आपले आरोग्य जपायचे.



तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



शुभ दिपावली

निर्मला अशोक कुदळे
सी–१४, कापरे गार्डन,
सनसिटी रोड, आनंदनगर,
पुणे ४११०५१.
मो.: ७५८८१६८१००



संत साहित्यातील श्री गणेश

लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९

मराठी संत साहित्यात विविध संतांनी बुद्धीदात्या गणेशाची विविध रूपे रेखाटली आहेत. श्री गणेशाचे स्तवन हा अभंग साहित्याचा महत्वपूर्ण भाग आहे.

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून श्री गणेशाचे ओमकार रूप वर्णिले आहे.

'ओमकार प्रधान रुप गणेशाचे,
हे तिन्ही देवांचे जन्मस्थान
अकार तो ब्रम्हा, उकार तो विष्णू,
मकार महेशु जाणियेला
ऐसे तिन्ही देव, जेथोनी उत्पन्न,
तो हा गजानन मायबाप
तुका म्हणे ऐसे आहे वेदवाणी,
पहावे पुराणी व्यासाचिया'

सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळी जो पहिला नादमंत्र निर्माण झाला तो म्हणजे 'ओमकार' होय. अकार, उकार, मकार या तीन मात्रांनी ओमकार सिद्ध होतो. यातील अ कार म्हणजे विश्वनिर्मितीचे अधिकारी ब्रह्मदेव, उकार मात्रा म्हणजे श्रीहरी आणि सृष्टीचे पालनकर्ते श्री शिवशंकर म्हणजे उदर होय. ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव मूळ गणेश तत्त्वापासून निर्माण झाले आहेत.

त्यांनी गाथेमध्ये श्रीगणेशाची मानस पूजा सुंदर शब्दात मांडली आहे,

'धरोनिया फरश करी, भक्तजनांची विघ्ने वारी
ऐसा गजानना महाराजा, त्याचे चरणी लाहो माझा
शेंदूर शमी बहु प्रिय त्याला, तुरा दुर्वांचा शोभला
उंदीर असे जयाचे वाहन, माथा जडित मुकुट पूर्ण
नाग यज्ञोपवीत रुळे, शुभ्र वस्त्रे शोभित साजरे
भाव मोदक हारा भरी, तुका भावे पूजा करी'

अशी श्रीगणेशाच्या चरणी भावगंधीत शब्दपुष्पे अर्पिली आहेत.

श्री गणेश सकल कलांचा अधिपती आहे. संत तुकाराम नर्तन करणाऱ्या गणेशाचे संकीर्तन करताना म्हणतात,

'श्री गणराया लवकर येई, भेटी सकळांशी देई
नाचत आले हो गणपती, पायी घागऱ्या वाजती'

या क्षेपक अभंगात 'विठ्ठल गणपती दुजा नाही' असा उल्लेख आहे. हा अभंग भारुड व लळिताच्या प्रारंभी म्हणत असताना गणपती ऋद्धी–सिद्धीसह रंगमंचावर अवतरतात आणि बुद्धीदात्या, विघ्नहर्त्या गणपतीचे पूजन करून कलाविष्काराला प्रारंभ होतो. तसेच संत तुकाराम श्रीगणेशांना गुरूराजा असे संबोधतात.

'नमिला गणपती माऊली सारजा,
आता गुरूराजा दंडवत
गुरुराया चरणी मस्तक ठेविले
आपल्या स्तुतीला द्यावी मती
गुरुराया तुज ऐसा नाही सखा,
कृपा करोनी रंका धरी हाती
तुका म्हणे माता पिता गुरू बंधू,
तूच कृपासिंधू गणराया'

अशा प्रकारे तुकाराम महाराजांनी माता, पिता, गुरू, बंधू अशा रुपात या मंगलमूर्ती गणेशाचे दर्शन घडवले आहे. आणि ज्ञानप्राप्तीसाठी तसेच भौतिक व आधिभौतिक पातळीवरील अरिष्टे दूर करण्यासाठी श्री गणेशाचे चिंतन करण्याचा उपदेश केला आहे.

श्री संत नामदेव काय म्हणतात ते पाहूयात. स्वसंवैद्य आत्मरूप गणपतीशी तद्रुपता अनुभवणे म्हणजे अद्वयभावे त्याला नमन करणे होय.

म्हणूनच संत नामदेव

'नमन हाचि अनुभव । नमन हाचि मुख्य भाव ।
नमन हाचि पैं देव । देवाधिदेव तू पावसी ।'

असे सांगून गाथेतील मंगलाचरणात गणेशाचे वर्णन भक्तीयुक्त अंतःकरणाने पुढील प्रमाणे करतात,

'प्रथम नमन करू गणनाथा ।
उमा शंकराचिया सुता ।।
चरणावरी ठेवू माथा । साष्टांगी आता दंडवत ।।
प्रथम नमु गजवदनु । गौरीहराचा नंदनु ।।
सकल सुरवरांचा वंदनु । मूषकवाहनु नमियेला ।।
त्रिपुरावधी गणाधिपती । हरें पूजिला भावेंभक्ती ।।
एके बाणें त्रिपूर पाडिला क्षिती ।
तै पशुपती तोषला ।।
ऐसे नमन करुनी सकळां ।
हरिकथा बोले बोबड्या बोला ।।
अज्ञान म्हणोनि आपल्या बाळा ।
चालवी सकळां नामा म्हणे ।।

प्रस्तुत चरणातील मूषकवाहन स्वरुपाविषयी संत नामदेव सांगतात,

'मुंगीचे गळां तुळईचा लोढणा ।
विष्णुदास नामा बोलिला खुणा ।।'

मुंगी म्हणजे जीव व तुळईचा लोढणा म्हणजे शरीर होय. ज्या न्यायाने इवलीशी मुंगी विशाल शरीर सहज वाहून नेऊ शकते. त्याच न्यायाने गणपतीच्या कृपेने सामर्थ्य प्राप्त झालेला उंदीर, जड देहधारी गणपतीला सहज वाहून नेऊ शकतो. ही खूण म्हणजे आत्मस्वरूपाचे पवित्र ज्ञान होय. या नामस्मरणातूनच पारमार्थिक अनुभव घेण्याची इच्छा तीव्र होऊन श्री गणपतीच्या चराचर व्यापक दर्शनाने ती पूर्ण होऊन अक्षय सुखाची प्राप्ती होते.

संत एकनाथांनीही एकनाथी भागवताच्या प्रत्येक अध्यायाचा प्रारंभ 'अथ श्री गणेशाय नमः' असा करुन प्रथम अध्यायातील गणेश स्तवनासाठी पंधरा ओव्या रचल्या आहेत.

'नमन श्री एकदंता । एक पणे तूचि आता ।।
एकी दाविसी अनेकता । परि एकात्मता न मोडे

अशा श्री गणेशाला उद्देशून संत एकनाथ म्हणतात,

'साच निरपेक्ष जो निःशंक ।
याचे तूचि वाढविसी सुख ।।
देऊनि हर्षाचे मोदक ।
निववसी देख निजहस्ते ।।

म्हणजेच ईश्वर भेटीत आपले खरे कल्याण आहे, अशा दृढ श्रद्धेमुळे जो निःशंक असतो, तोच खरा ज्ञानी भक्त होय. त्याला ईश्वरप्राप्ती शिवाय अन्य लाभाची अभिलाषा नसते. अशा भक्तांना गणपती स्वहस्ते आत्मानंदरूपी हर्षाचे मोदक देऊन सुख-समाधान व शांती प्रदान करतो.

'ओम नमो सद्गुरु निर्गुणा । पार नाहीं तव गुणा ।।
बसोनी माझिया रसना । हरी गुण वर्णवी ।।'

या चरणातून गुरूतत्व हे गणेशाचे रूप आहे, या तत्त्वाचा बोध करून घेतला तर बुद्धीला आणि अभ्यासाला चालना मिळते अशी श्री गणेश उपासनेची महती आहे.

श्री मोरया गोसावी म्हणतात,

'पाहता त्रिभुवनी हो दुजा न देखो नयनी ।
एका मोरयांवाचूनी हो मोक्षदाता ।
अहो, येई तू मोरया हो त्रयलोक वीसावया ।
जडजीव तारावया हो तूचि एक ।'

पुढे ते आळवणी करतात,

'अहो फरशु, अंकुश कटी बा घेऊनिया झडकर ।
आपुले ब्रीद साच करी हो गणराज ।'

संत कवी शेख महंमद यांनी योगसंग्राम ग्रंथात श्री गणेशाला नमन करून लेखनास प्रारंभ केला आहे,

'नमिला अविनाश गणेश । खाणी वाणीचा प्रकाश ।
शास्त्रां न कळे ज्याचा अभ्यास ।
वोळखा हो असोनी नाही जाला ।।

असोनी नाही जाला म्हणजे गणेशाच्या अनादित्वामुळे तो अखंड आहेच, त्याला होणे नाही. त्याच्यामध्ये शिवशक्ती सामावल्या आहेत.

श्री चिंतामणी महाराजांचे
'मन माझे वेधले गणराजी । वृत्ति बैसली तुझे पायी'
हे पद भक्तगण भक्तीभावाने म्हणतात.

संत तुलसीदासांनी रामचरित मानसमध्ये

'गाईये गणपती गणपती गणबंधन ।
शंकर- सुवन भवानी नंदन । '
अशी गणेशस्तुती केली आहे.

दत्तसंप्रदायातील थोर विभूती श्रीमद् श्री वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी श्री गणेशाचे स्तवन पुढील ओव्यात केले आहे,

'ज्ञान कर्मेंद्रिय प्राणागण । यांचे करी जो संरक्षण ।
त्या गणपतीचे वंदू चरण । मंगलाचरण हे आमुचे ।
ज्याला म्हणती अंबेचा सुत।कलियुगी जो गंधर्व स्थित।
जो वरदाभय हस्त । स्मरणे समस्त विघ्नहर्ता ।

समर्थ रामदास स्वामींनी मनाचे श्लोक लिहिताना
'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ।'

असे श्रीगणेशाला वंदन करून सगुण-निर्गुणाचा समन्वय साधला आहे. समर्थांनी दासबोधात गणेशाचे सगुण रूप साकारले आहे,

'सदा महोन्मत बाहुबळें डुलत ।
लहनाळले आरक्त त्रिलोचन ।
शुंडादंडे सरळें अभिनव आवाळे ।
गळती गंडस्थळे दर्पे सुगंधी ।'

अशा सगुणसुंदर गणेशाला आळवताना समर्थ म्हणतात, आमच्या बुद्धीवर साठलेली अज्ञानाची पुटे तू झाडून टाकतोस. माणसाला भ्रांती झाली की तो देह म्हणजेच मी असे समजायला लागतो. त्या अज्ञानाचा भ्रांतीछेद तू करतोस. म्हणून हे गणेशा तू बोधरूप आहेस.

गणेशाच्या अलौकिक नृत्याचे वर्णन समर्थांनी
'गणराज्य विराज गाजतसे ।
रंग माजत माजत माजतसे ।
बहु नृत्यकला हृदयी विलसे ।'
असे केले आहे.

अशा सर्वांगसुंदर श्रीगणेशाची आरती समर्थ रामदासांनी
'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।'
अशी शब्दबद्ध केली आहे.

श्री संत ज्ञानदेव श्री गणेश वंदनेच्या एकोणिसाव्या ओवीत श्री गणेशाचे रूप वर्णन करताना म्हणतात,

'अकार चरण युगल । उ कार उदर विशाल ।
म कार मस्तकाकारे ।'

ते शब्दब्रम्ह वाड्मय म्हणजे प्रणवोत्पन्न असे गणेश मूर्त रूप होय. अर्थात ॐ या शब्दाचे अ, उ आणि म असे तीन स्वर असल्याने त्यातून त्यांनी हे मूर्ती रूप वर्णन केले आहे. ॐ हे श्री गणेशाचे निर्गुण स्वरूप प्रतीक आहे. ते मुळात ध्वनी रूप असून पुढे लेखनशास्त्र विकास पावल्यावर वर्णमाला निर्माण होऊन त्याचे अक्षर रूप साकार झाले. ॐकारा ची प्रथम मात्रा अ कार हे गणपतीचे दोन पाय असून दुसरी उ कार मात्रा त्याचे विशाल उदर आहे. तिसरी म कार मात्रा त्याच्या मस्तकाचा आकार आहे. या तिन्ही मात्रा एकवटल्या म्हणजे त्यात संपूर्ण वेद सामावला जातो.

'हे तिन्ही एकवटले । तेथे शब्दब्रह्म कवळले ।
ते मिया गुरुकृपे नमिले । आदिबीजा ।'

या ओव्यांमध्ये ज्ञानेश्वरांनी गणेशाचे दिव्य रूप साकारले आहे.

अशाप्रकारे विविध संतश्रेष्ठांनी वर्णन केलेले श्री गणेशाचे ओंकार स्वरूप हृदयमंदिरात स्थापन करून श्री गणेशामधील गुणवैशिष्ट्ये आपल्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न केला, तर सत् असत्, सदाचार, दुराचार यातील भेद जाणण्याचे तारतम्य आपल्यामध्ये येईल. गणेश तत्वाचे आणि आपले अभिन्नत्व ध्यानी येईल. ज्ञानसंवर्धन करून तसेच आत्मिक आनंद प्राप्त होऊन आपले जीवन गणेशाच्या हातातील स्वानंदमय मोदका प्रमाणेच मधुर होईल. हाच गणेश उपासनेचा सत्यार्थ आहे. अशा बुद्धीदेवतेला मनोभावे वंदन करून अमंगलाचा नाश होऊन, अखिल विश्वात निरामय आरोग्य, मांगल्य, सुखसमृद्धी, एकात्मता आणि शांती निर्माण व्हावी हीच प्रार्थना करते.

दैव परीक्षा

उन्हा पावसाची नाही
कधी वाटली भीती
काळ्या आईची काळजी
कसे पिकतील मोती

कसा पडला दुष्काळ
दैव बघतो परीक्षा
माझ्या रानाची रे आता
कोण करेल का रक्षा

उरी माझ्याच राहीला
उभा कर्जाचा डोंगर
मात कशी करू सांग
झालो पुरता बेजार

बैल जोड नांगराला
होते कधी माझ्या दारी
जोडी खिलारी सुंदर
आज सावकारा घरी

थोड्या पैशासाठी बघा
घास काढतो तोंडचा
सावकार नावाचा हा
डोंब रावण गावचा

– शुभांगी धारमळकर



बाळसराफ मोटार ड्रायव्हिंग स्कूल
टु व्हिलर व फोर व्हिलर शिकवले जाईल
आरटीओची सर्व कामे केली जातील.



प्रो. प्रा.: लिना द. बाळसराफ – ९३२५२२४११८
शुभम बाळसराफ – ९९७०६३८१९०

शॉप नं., सत्यजय अपार्टमेंट,
तळेगाव–चाकण रोड, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

हे बंध रेशमाचे



लेखन – सौ. भारती सावंत
खारघर, नवी मुंबई.
मो.: ९६५३४४५८३५

''अरे मोहन, तू ऑफिसला चाललास?'' जयाच्या या प्रश्नाने मोहन किंचित बावरला. ''आजही म्हणजे काय जयू? मी रोजच ऑफिसला जातो, तसाच आजही निघालोय''. तिच्या प्रश्नाचा रोख न समजून तो पुढे बोलला, 'का गं? काय काम होते का तुझे ? सोडायचे आहे का कुठे तुला?'' तशी फुरंगटून जात जयू बोलली, ''हे रे काय मोहन!..... आज तारीख किती?'' मोहनने मोबाईलवर तारीख पाहिली आणि उत्तरला, ''३० एप्रिल नाही का?'' आता पंधरा दिवस राहिलेत हे लॉकडाऊन संपायला मग हवे तर जाऊ फिरायला बाहेर. मुलेही कंटाळलीत''..... तशी जयू अजूनच नाराज झाली, ''असं काय करतोस मोहन?.....जा आम्ही नाही बोलणार! जा तू ऑफिसला !! ''तसे मोहन उत्तरला, ''अगं आज टिफिन बनवला नाहीस का?... नसेल तर राहू दे.. मी खाईन माझ्या कॅन्टीनमध्ये.'' तशी नाराजीनेच जयू स्वयंपाकघरात गेली आणि टिफिन घेऊन आली. तशाच अवस्थेत तिने टिफिन टेबलावर आपटला.....मोहनही तिच्याकडे न पाहताच दार लोटून फक्त ओरडून ''बाय''! म्हणत तिच्यापुढून ऑफिसला निघून गेला. जयूला खूप वाईट वाटले आणि थोडे विचित्रही.....

ती तिथेच टेकून सोफ्यावर बसली नि मागचा सारा जीवनपटच एखाद्या चलत् चित्रपटाप्रमाणे तिच्या डोळ्यांसमोरून तरळून गेला. सात वर्षे झाली आपल्या लग्नाला. तेव्हापासून आजतागायत मोहनने आपल्याला कधीच दुखावले नाही. जणूकाही आपले मन जाणून तो आपल्याला हवे अगदी तसेच वागतो. मनकवडाच जणू! मग आज तो का असा वागला? ती स्वत:च मनाला प्रश्न विचारती झाली. या कोरोनामुळे त्याची मनस्थिती थोडी अपसेट असेल, खूप काळजी घ्यावी लागतेय बाहेर पडताना, ऑफिसमध्ये वावरताना...म्हणून असेल कदाचित.....ती आपल्याच मनाची समजूत घालू लागली. आपणही त्याला बाहेरचे खावे लागू नये म्हणून लवकर उठून त्याला टिफिन बनवून देतोच ना!! कोरोनाची भीती काय त्याला एकट्यालाच आहे? अशा एक ना अनेक विचारांनी मनात काहूर उठले. पण आज आपला जन्मदिन असलेला ही तो विसरला...?

जाताना त्याने साधे 'विशही' केले नाही. रोजच्याप्रमाणे ऑफिसला जाताना 'किसही केले नाही'. ही सहा नि चार वर्षांची आपली लेकरे गुड्डू आणि बंटीही घरातच बंदिस्त आहेत. दोन महिने झाले. 'बाबाने कुठे फिरायला नेले नाही, सिनेमा किंवा हॉटेलही नाही' असेही कधी बोलले नाहीत. गुपचूप घरातच बसून खेळतात. दूरदर्शन पाहतात. एवढी छोटी असूनही किती समजूतदार आहेत आपली मुले! मुलांविषयीच्या अभिमानाने तिचा ऊर किंचितसा भरून आला. मुले लहान आहेत, त्यांना आपला जन्मदिन नाही लक्षात येत. पण मोहनचे काय बिनसले? ऑफिसला निघून गेला. विचारांच्या तंद्रीत दुपारचा एक वाजला. घड्याळाने एकचा टोला दिला नि जयूची तंद्री भंग पावली.' अरे!

बराच वेळ गेला. बंटी नि गुड्डू ही आले नाहीत, मम्मा जेवायला दे म्हणून? चला मुलांकडे पहावे'. म्हणून जयू मुलांकडे जाण्यासाठी ती सोफ्यावरून उठली तर दरवाजावरील घंटी कर्रर्र आवाज करून वाजली. ती दरवाजा उघडायला गेली.दरवाजा उघडून पाहते तर कोणीच नाही. 'असे काय झाले? आपणास भास तर झाला नसेल?' म्हणून ती मुलांच्या खोलीकडे जायला वळली इतक्यात पुन्हा एकदा कर्रर्र घंटी वाजली.आता मात्र तिला कळून चुकले. 'कुणीतरी मस्ती करत असेल, आपणाला भास नक्कीच झाला नाही'. म्हणून तिने गर्रकन वळून दरवाजा उघडला तर.....'अरेच्चा! कोणीच नाही??.....मग घंटी कोण वाजवतंय' असं स्वत:शीच पुटपुटत ती दरवाजा बंद करण्यासाठी तिने दरवाजाचा हँडल हातात पकडला तर!.....

'हॅप्पी बर्थडे टू यू' असे म्हणत एका हातात ताज्या, टप्पोऱ्या फुलांचा बुके आणि दुसऱ्या हातात केक, मिठाई नि गिफ्टची पिशवी घेऊन उभा असलेला मोहन दरवाजाबाहेर हसतच उभा असलेला दिसला. आता तिच्या तोंडाचा आ.ऽ..आपोआपच वासला गेला. तिला काय बोलावे किंवा करावे ते सुचेनाच. तसे मोहनने तंद्रीतून तिला जागे केले. घरात पाऊल टाकत 'हॅपी बर्थडे टू यू डार्लिंग' असे म्हणतच तो आत आला.

'अगं वेंधळ्यासारखे कुठे पाहातेस? आज पहिल्यांदाच मला पहात असल्यासारखी??' मोहनला तिचे असे पाहणे विचित्र वाटत होते. त्याने हसतच तिला विचारले 'मी कोणी वेगळा प्राणी वगैरे दिसतो आहे की काय?' तशी जयू भानावर आली आणि तिने मोहनला आवेगाने घट्ट मिठी मारली. तोही तितक्याच प्रतिसादाने तिला मिठीत घेऊन उभा होता. दोघांनाही आपण दरवाजातच उभे आहोत याचेही भान नव्हते इतके ते मिठीत बद्ध झाले होते. तिच्या तोंडातून शब्दांऐवजी फक्त हुंकाराच निघू लागले.....

प्रीतीचे रेशीमबंध हेच तर नसावेत?

तुझ्या सावलीत

मिळे सुखाची अनुभूती
आई तुझ्याच सावलीत
पंढरीच्या विठूची माया
सामावली या माऊलीत

आई तुझ्याच प्रेममायेने
फुलतोय गं माझा श्वास
तुला भेटण्यास आलोय
आई तुझ्याकडेच खास

तुझी प्रेममुर्तीच आई गं
मी ही हृदयात बसवली
तुझ्या प्रेमाच्या मंदिरात
ही एक रात्र मी वसवली

बाहेरच्या उन्हातान्हांत
देतेस तू हळुवार छाया
तुझ्या असण्याने मिळते
सुखाची नि:स्वार्थ माया

द्यावे वाटतेय स्वर्गसुख
तुझ्याच चरणाशी सारे
उन्हाळ्यात वाहू देतेस
थंडगार ममतेचे तू वारे

– सौ. भारती सावंत
खारघर, नवी मुंबई
M.: 9653445835



'स्क्रीन, स्ट्रेस आणि सोशल मीडिया: जनरेशन झेड (Gen Z) च्या मानसिक आरोग्याची आव्हाने आणि उपाय'

डॉ. धनंजय मानकर (M.D होमिओपॅथी तज्ञ)
सहायक प्राध्यापक, स्कूल ऑफ हेल्थ सिस्टम्स स्टडीज,
टाटा सामाजिक विज्ञान विज्ञान संस्था, मुंबई.
मो: ०९३७२०९००१६

प्रस्तावना (Introduction) :

'हातात अत्याधुनिक स्मार्टफोन, डोळ्यांवर चकाकणारा स्क्रीनचा प्रकाश, चेहऱ्यावर कृत्रिम हास्य असणारा पण आतून एका अनामिक भीतीने आणि एकटेपणाने पोखरलेला तरुण... हे आजच्या 'जनरेशन झेड' (Gen Z) चे प्रातिनिधिक चित्र बनत चालले आहे. १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली ही पिढी इतिहासातील सर्वात तंत्रज्ञान-स्नेही आणि हुशार पिढी मानली जाते. संपूर्ण जग त्यांच्या एका क्लिकवर उपलब्ध आहे. परंतु, या आभासी जगाच्या झगमगाटात या पिढीचे मानसिक आरोग्य मात्र कमालीच्या अंधारात चाचपडत आहे. वरवर पाहता सर्वकाही 'परफेक्ट' वाटणाऱ्या या तरुणाईच्या मनात 'लाईक्स', 'कमेंट्स' आणि भविष्याच्या अनिश्चिततेने एक प्रचंड वादळ निर्माण केले आहे. म्हणूनच, आज या पिढीच्या मानसिक आरोग्याची आव्हाने केवळ समजून घेणेच नव्हे, तर त्यावर उघडपणे बोलणे ही काळाची गरज बनली आहे.

जनरेशन झेडच्या मानसिक तणावाची प्रमुख कारणे (Root Causes of Stress)

आजच्या तरुणाईच्या मानसिक तणावाचे मूळ केवळ त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात नसून, त्यांच्या अवतीभवती असलेल्या आभासी आणि सामाजिक वातावरणात आहे. या तणावामागील प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

● सोशल मीडिया आणि आभासी जग (The Illusion of Social Media) :

जनरेशन झेड ही सोशल मीडियाच्या युगातच मोठी झाली आहे. इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट यांसारख्या प्लॅटफॉर्म्सवर सतत इतरांचे 'परफेक्ट' आणि आनंदी आयुष्य पाहायला मिळते. यातूनच 'FOMO' (Fear of Missing Out - काहीतरी सुटून जाण्याची भीती) जन्माला येतो. इतरांच्या तुलनेत आपले आयुष्य किती नीरस आहे, ही भावना तरुणांना आतून पोखरत राहते. तसेच, स्वतःचा आनंद आणि आत्मविश्वास हा फोटोंना मिळणाऱ्या 'लाईक्स' आणि 'कमेंट्स'वर अवलंबून राहिल्यामुळे एक प्रकारची मानसिक परावलंबिता निर्माण होते.

● भविष्याची आणि करिअरची तीव्र चिंता (Hyper-Cometition & Career Anxiety):

आजच्या काळात स्पर्धा गगनचुंबी झाली आहे. शिक्षणाच्या अफाट संधी आणि करिअरचे शेकडो पर्याय उपलब्ध असले, तरी त्यामुळे एक प्रकारचा संभ्रम निर्माण होतो, ज्याला 'Choice Paralysis' म्हणतात. वाढती महागाई, बेरोजगारी आणि बदलत्या तंत्रज्ञानामुळे (उदा. AI चा वाढता प्रभाव) आपले भविष्य सुरक्षित राहील का, या चिंतेने आजचा तरुण सतत तणावाखाली वावरत असतो.

● सायबर बुलिंग आणि ऑनलाईन ट्रोलिंग (Cyberbullying & Digital Toxicity):

आजकाल भांडणे किंवा अपमान केवळ चार भिंतींच्या आड होत नाहीत, तर ते डिजिटल पडद्यावर जगासमोर उघडपणे होतात. एखाद्या पोस्टवर आलेली नकारात्मक कमेंट किंवा ऑनलाईन होणारी थट्टा (Trolling) तरुणांच्या संवेदनशील मनाला थेट तडे देते.

या डिजिटल छळामुळे अनेक तरुण नैराश्याची शिकार बनतात.

● माहितीचा अतिरेक (Information Overload & Climate Anxiety) :

इंटरनेटमुळे जगाच्या पाठीवर घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटना सेकंदाच्या आत या पिढीपर्यंत पोहोचतात. युद्ध, हवामान बदल (Climate Change), आर्थिक मंदी आणि गुन्हेगारी यांसारख्या नकारात्मक बातम्यांचा सतत भडिमार झाल्यामुळे या पिढीमध्ये जगाविषयी एक प्रकारची असुरक्षितता आणि भीतीची भावना निर्माण होते.

मानसिक आरोग्याच्या समस्यांची प्रमुख लक्षणे (Warning Signs to Watch For) :

बऱ्याचदा तरुण आपल्या भावना उघडपणे व्यक्त करत नाहीत, पण त्यांच्या वागण्या-बोलण्यातून मानसिक तणावाची लक्षणे स्पष्ट दिसू शकतात. ही लक्षणे वेळीच ओळखणे गरजेचे आहे:

● शारीरिक आणि वर्तनातील बदल (Behavioral Changes):

मुलांच्या झोपेच्या सवयींमध्ये अचानक बदल होणे, जसे की रात्रभर जागणे किंवा दिवसभर झोपून राहणे (अनिद्रा). याशिवाय, भुकेवर परिणाम होणे- काही तरुण तणावामुळे खूप जास्त खातात (Stress Eating) तर काही जेवण पूर्णपणे टाळतात.

● भावनिक अस्थिरता (Emotional Outbursts) :

छोट्या-छोट्या गोष्टींवरून चिडचिड करणे, राग अनावर होणे किंवा विनाकारण रडू येणे. पूर्वी ज्या गोष्टींमध्ये आनंद मिळायचा (उदा. छंद, मित्र), त्या गोष्टींमधील रस अचानक कमी होणे आणि सतत उदास राहणे.

● सामाजिक अलिप्तता (Social Isolation) :

प्रत्यक्ष जगातील मित्र आणि कुटुंबापासून स्वतःला पूर्णपणे दूर करून घेणे. दिवसभर स्वतःला खोलीत कोंडून घेणे आणि केवळ स्क्रीनच्या विश्वात गुंतून राहणे हे गंभीर मानसिक तणावाचे लक्षण असू शकते.

● सकारात्मक उपाय आणि मार्गदर्शक तत्त्वे (Solutions & Actionable Advice):

जनरेशन झेडला या मानसिक दलदलीतून बाहेर काढण्यासाठी काही सोपे आणि व्यावहारिक उपाय करणे अत्यंत गरजेचे आहे.

● डिजिटल डिटॉक्स आणि स्क्रीन टाईमवर नियंत्रण (Digital Detox) :

सोशल मीडियाचा वापर पूर्णपणे बंद करणे शक्य नसले, तरी त्यावर मर्यादा घालणे शक्य आहे. दिवसातून किमान १-२ तास (विशेषतः रात्री झोपण्यापूर्वी आणि सकाळी उठल्यानंतर) स्क्रीनपासून पूर्णपणे दूर राहण्याचा नियम बनवावा.

● शारीरिक सक्रियता आणि सजगता (Mindfulness & Physical Health) :

व्यायाम, योगासने किंवा रोज किमान ३० मिनिटे मैदानी खेळ खेळल्याने शरीरात 'एन्डॉर्फिन' (Endorhins) सारखी आनंदी हार्मोन्स तयार होतात, जे तणाव कमी करतात. ध्यान (Meditation) केल्याने मनाची एकाग्रता वाढते आणि नकारात्मक विचार दूर होतात.

● भावनांना वाट करून देणे (Expressive Outlets) :

मनातील भीती, चिंता किंवा राग दाबून

ठेवण्याऐवजी तो व्यक्त करायला शिका. यासाठी रोजनिशी लिहिणे (Journaling), चित्रकला, संगीत किंवा विश्वासू मित्राशी मनापासून बोलणे खूप फायदेशीर ठरते.

● व्यावसायिक मदत घेण्यास संकोच न बाळगणे (Seeking Professional Help) :

जर तणाव नियंत्रणाबाहेर जात असेल, तर मानसोपचारतज्ज्ञांची (Therapist किंवा Counsellor) मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे. शारीरिक आजारासाठी डॉक्टरांकडे जाणे जितके सामान्य आहे, तितकेच मानसिक आजारासाठी थेरपिस्टकडे जाणे सामान्य मानले पाहिजे.

● पालकांची भूमिका (Role of Parents & Elders)

जनरेशन झेडच्या मानसिक आरोग्याला सावरण्यात पालकांची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे. बदलत्या काळानुसार पालकांनीही आपल्या दृष्टिकोनात बदल करणे गरजेचे आहे.

● निवाडा न करता ऐकणे (Non-judgmental Listening):

जेव्हा मुले त्यांच्या समस्या किंवा चिंता पालकांसमोर मांडतात, तेव्हा 'मुळात मोबाईल फोनमुळेच हे सगळे घडते आहे' असे म्हणून त्यांच्या भावना उडवून देऊ नका. मुलांना दोष देण्याऐवजी, त्यांचे म्हणणे शांतपणे आणि सहानुभूतीने ऐकून घ्या.

● सुरक्षित वातावरण देणे (Creating a Safe Space):

घरात असे वातावरण असावे, जिथे मुलांना अपयशाची किंवा ओरडा खाण्याची भीती वाटणार नाही. पालकांनी त्यांच्या काळातील स्पर्धा आणि आजच्या काळातील गळेकापू स्पर्धा यांमधील फरक समजून घेतला पाहिजे. मुलांना त्यांच्या मानसिक संघर्षात तुमचे पूर्ण समर्थन आहे, हा विश्वास देणे गरजेचे आहे.

● समारोप (Conclusion)

जनरेशन झेड ही आजवरची सर्वात हुशार, सर्जनशील (Creative) आणि नवनवीन गोष्टींचा स्वीकार करणारी पिढी आहे. त्यांच्याकडे जगाला बदलण्याची अफाट क्षमता आहे. परंतु, या क्षमतेला योग्य दिशा देण्यासाठी त्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम असणे अत्यंत आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य ही लपवण्याची किंवा लाजेची गोष्ट नसून, त्यावर उघडपणे बोलण्याची गरज आहे. आजची तरुणाई जेव्हा स्क्रीनच्या आभासी जगातून बाहेर पडून वास्तवाशी जोडली जाईल आणि समाज त्यांना समजून घेईल, तेव्हाच त्यांच्या मनातील हे वादळ शांत होईल. चला तर मग, या 'डिजिटल' पिढीला 'इमोशनल' साथ देऊया आणि त्यांच्या मानसिक आरोग्याचा आदर करूया!

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!

शिवानी प्रिंटर्स

श्री. दीपक ढोले पाटील

मो. ९४२२०८५८९०

१३११, किनारा सहकारी गृहसंस्था,
राज ट्रॅव्हल्स शेजारी, कसबा पेठ, पुणे



सरपंच

डॉ. माणिक बनकर (बनफूल)
रा. कराड
मो.: ९९६०३१४५१४

'शेतातली वस्ती ती, ग्रामीण भाग. गावाच्या बाहेर एका बाजूला शेती. तिथेच शेतामध्ये वस्ती. वस्तीवर दहा-बारा माणसांचा गुण्या गोविंदाने नांदणारं एकत्रित कुटुंब. घरातल्या माणसांबरोबर जिवापाड लळा लागलेला पाळीव प्राण्यांचा जमाव. मग, त्यामध्ये गाय, म्हैस, बैल, शेळी, बोकड, करडं, कोंबड्या, कुत्रं, मांजर असा शेतकऱ्याच्या संसारा बरोबर हा गोतावळा आला.

योगेशही शेतकऱ्याचा मुलगा. पिढ्यान पिढ्या चालत आलेला वारसा योगेश चालवत होता. त्याच्या आजोबापासूनच्या परंपरेत जनावरं पाळण्याचा वसाही जपला होता. खिल्लारी बैल पाळण्याचा शौक होता. बैलांची जपणूक करणं. बैल मोठी करणं, बैलांवर जिवापाड प्रेम करणं. हे योगेशने मोठे चुलते, वडील यांच्याकडून आदर्श घेतला होता. स्वतः उपाशी राहून जनावरांची काळजी घेत होता.

दुपारचे चार वाजायला आले होते. काही जनावरं रवंथ करत होती. काही खुटीच्या कडेने फिरत होती. तर, काही खुटीला डोकं घासती होती. रांजणातल्या घागरीने पाणी घंगाळात आणून योगेश ओतत होता. एक एक करून गोठ्यातल्या सगळ्या जनावरांना पाणी पाजून झालं. गाय, म्हैस, शेरडं-करडं पाणी पिऊन झाल्यावर गव्हाणीतल्या वाळल्या वैरणीत तोंड घालून चारा खाऊ लागली. योगेशने गळ्यातल्या टॉवेलने चेहऱ्यावरचा घाम पुसला. गोठ्यातून बाहेर येत. डोक्यात विचार येत होता. संध्याकाळच्या वैरणीचं करायचं काय?

कोरोनाचे दिवस होते. घरातून बाहेर पडायची पंचायत होती. जवळ कुणाच्या जायचं नाही. हातात हात द्यायचा नाही. वलोवशी शेरडीच्या तोंडाला मास्क बांधावं तसं तोंडाला मास्क बांधायचं. सॅनिटायझर हाताला सारखं लावायचं. खोकायला लागलं की, तपासणी करायची. कोरोना झालं, असं कळलं की, १४ दिवस कोरोना गृहात राहायचं. दवाखान्यात जागा मिळाली तर ठीक. नाही तर, जिथे जागा मिळेल तिथे राहायचं. माणसांचा सहवास नाही. जवळ कोणी जायचं नाही. देतील ती औषधं खायची. तिथेच खायचं-प्यायचं. १४ दिवसांनी जगला तर, घरच्या माणसात यायचं. नाहीतर, दवाखान्यातील लोकं नातेवाईकांशिवाय त्यांच्या परवानगीने विल्हेवाट लावतात. तिसरा, दहावा, तेरावा, चौदावा लांबूनच करायचा. कधी कोणाला कोरोना होईल आणि कधी कोणी मरण पावेल याची गॅरंटी नव्हती.

अशा अवस्थेत बैलांना वैरण आणायसाठी योगेशला रानात जायचं होतं. बाहेर पडायचं तर, पोलिसांची भीती वेगळीच. नाय जावं तर, जनावरांनी काय खायचं? मनातून विचार केला पोलिसांना जनावरांची अवस्था सांगूया. असा मनात विचार आणून घरातून बाहेर पडला. सायकलवर थोडंसं अंतर गेल्यावर डांबरी रस्त्याला लागला.

एक पिकअपवाला रस्त्यात थांबला होता. त्याच्या कडेने माणसांची गर्दी जमा झाली होती. योगेशला आपूर्प वाटलं म्हणून तोही गर्दीच्या दिशेने जवळ गेला.

पिकअपच्या मागच्या हौदात मरायच्या गतीला आलेली दोन-चार वासरं होती. त्यातच एक ८-९ महिन्यांचं मरतुकडं खोंड एका कोपऱ्यात जीव जाईना म्हणून मान टाकून पडून होतं. जमा झालेल्या गर्दीतून योगेशचं त्या खोंडाकडे लक्ष गेलं. योगेशला माहित होतं. ही वासरं कसाबाच्या धावणीला जाणार.

चालकाच्या हाताला हात लावत 'दादा! ह्यो कोपऱ्यातला खोंड मला देता का?' नाय रं बाबा! मी काय तुला द्यायला आणलाय व्हय?'

'तसं नव्हं!' 'मग'

ह्याला सांभाळायचं हाय.'

'दुसरा बघ.'

मी ह्याला घरी नेऊन खाऊ-पिऊ घालीन, अन मोठं करीन.' चालक योगेशच्या तोंडाकडे बघू लागला. गर्दीतली मंडळी पाहत होती. पिकअपच्या चालकाची बरीच विनवणी केली.

'बरं बरं'

म्हणत कसंतरी तो चालक खोंड द्यायला तयार झाला. मागील तेवढं पैसं योगेशने त्याच्या हातावर ठेवून खोंड ताब्यात घेतला.

हातातली सायकल रस्त्याच्या एका बाजूला लावली. पिकअप मधील खोंडाला हात लावला तसं ताडकन हाललं. तसं योगेश चकीत झाला. त्याच्या डोक्यात वेगळाच विचार चमकून गेला. हे खोंड दिसतं तसं नाही. काही तरी वेगळं आहे. ह्या मोठा झाल्यावर 'सरपंच' सारखाच उभा राहणार. म्हणून योगेशने त्या खोंडाचं नाव 'सरपंच' असं ठेवलं. खोंडाच्या शरीरात अवसान राहिलं नव्हतं. हे योगेशच्या लक्षात आलं. याची चालायची ताकद संपलीये. पण, उभा राहिला तर, पुन्हा बसणार नाही. हे जाणून योगेशने दोन्ही हाताची झोळी करून 'सरपंच' ला हातात घेतलं.

झपझप पावलं उचलत लगबगीने घरी आणलं. घरी अंगणात आणताच, आई, नाना (बाप), भाऊ, आण्णा (चुलता), चुलती, दिलीप, शिवदास मोठ्या भावंडांनी कडेने गराडा घातला. सगळ्यांना नवल वाटलं. योगेशने घडलेला प्रकार सांगितला. घरच्यांच्या लक्षात आलं. घरच्या सगळ्यांच्या तोंडातून एकदम आलं.

'अंर ह्यो तर, आमचा 'सरपंच' म्हणून उभा राहणार.' लाडाने योगेशच्या तोंडावरून हात फिरवत आई बोलली- 'लय भारी झालं बघ' आईच्या सुराला सूर देत नाना म्हणाले-

'लय बेस काम केलं बघ,

चुलती (मोठी आई)-

'अहो नाना! ह्याने कसाबाच्या धावणीला जाता जाता वाचवलंय.' नानांनी शाब्बासकीची थाप टाकत-

'खरंय बघ.'

'थांबा मी आंघोळ घालतो, अनब ह्याला खायला घालतो, बरीच दिवस झालं खायला मिळालं नसंल.' योगेश बोलला.

'व्हय.. व्हय..'

म्हणत बाकी सगळी पांगली. आपापल्या कामाला लागली. योगेशनेही सरपंचाला आंघोळ घातली. सरपंचाच्या गळ्यातल्या कासऱ्याने गोठ्यात एका बाजूला खंभीला बांधलं. हिरवंगार गवत त्याला खायला टाकलं. सरपंचही मोठ्या आवडीने बऱ्याच दिवसांनी असं खायला मिळाल्याने खाऊ लागला. योगेशने सरपंचाच्या पाठीवरून, कपाळावरून प्रेमाने हात फिरवला. गवत खाता खाता सरपंचही योगेशकडे मान करून शांत उभा राहिला.

सरपंचाला खाईलं तसं आहार मिळत होता. त्यामुळे सरपंचाच्या अंगावर मास वाढत होतं. बाकीच्या इतर जनावरांपेक्षा सरपंचावर जास्त लक्ष होतं.सरपंचाची योगेश जास्त काळजी घेत होता. हळूहळू सरपंचाला ओल्या वाळल्या वैरणी बरोबर पेंड-कणकीच्या गोळ्याचा खुराक चालू केला. सरपंचही नेटाने खात होता. शरीर आणि वयाने वाढत होता. नवीन माणूस, जनावर जवळ जाताना दिसलं की, ढरकाळी फोडत होता. त्याच्या ढरकाळीचा आवाज वस्तीवर सगळीकडे घुमत होता. पायाच्या नख्यांने जमिनीवर खरडू लागला म्हणजे गुलाल उधळल्यासारखं माती मागं टाकत होता. पाठीवरची वशिंड आकार धरू लागली होती. सरपंच आता गोटी सारखा गुटगुटीत दिसू लागला होता. डोक्यावरची शिंगं खिल्लार आकार घेऊ लागली होती. सरपंचाला एक कासऱ्यावरून आता दोन कासऱ्यांनी बांधावं लागत होतं. अंगात मस्ती वाढत होती. मस्ती वाढल तसं फुसफुस जास्तच करत होता.


दिवसेंदिवस सरपंचमध्ये बदल होत होता. सरपंच आता हळूहळू उंचाने कंबरेच्या वर खांद्याला लागत होता. सरपंचाचं वय वाढल तसं खुराखात वाढ होत होती. योगेश सरपंचाला पळवायला घेऊन जात होता. मधी आधी शेतात औताला, गाडी ओढायला जुंपला जात होता. त्याच्या बरोबर दुसरा बैल मागं पडत होता.

योगेशच्या घरी इतर बैलापेक्षा सरपंच उठून दिसू लागला होता. नवीन बघणारी माणसं सरपंचाचं कौतुक करत होती. मीठ-मिरची सरपंचावरून उतरून टाकाव्यात असं होत होतं. कोणाची नजर लागू नये म्हणून गळ्यात पायात काळा गोंडा बांधला होता. सरपंच वाऱ्यासारखा पळत होता. त्यामुळे योगेश आणि बाकी घरच्यांनी शर्यतीला पळवायचा निर्णय घेतला.

एक दिवस बैलगाडी शर्यत गावाजवळच काझड गावात असल्याचं योगेशच्या कानावर आलं. तसं सरपंचाला शर्यतीत पळवायचं ठरलं. शर्यतीच्या आदल्या दिवशी 'काय सरपंच शर्यत जिंकणार का?' असं योगेशने पाठीवरून हात फिरवत विचारताच सरपंचाने मान डोलावली. काझडची बैलगाडी शर्यत सरपंच जीव तोडून पळाला. सरपंचाला पहिल्यांदाच शर्यतीत पळताना बघून बघणाऱ्यांच्या डोळ्याचं पारणं फिटत होतं. सरपंचाचं कौतुक होत होतं.

सरपंच एक एक करून अनेक शर्यती पळतच राहिला. त्याने आता पर्यंत तीन ठिकाणी गुलाल अंगावर टाकून घेतला होता. तर, पस्तीस ठिकाणी शर्यतीत पळाला होता. त्यामध्ये डोर्लेवाडी, गुरसाळे, कारंडे (नातेपुते), पुरदौंड (माळिशरस), कोरेगाव (सातारा), दहिवडी, आणि दहिवडी जवळील पेडगाव, मोरगाव, मळभ, शिरसटवाडी, भिगवण, आसू-सोनगाव, राजुरी (फलटण), गोटी (पंढरपूर) अशा अनेक ठिकाणी शर्यतीत पळाला होता.

सरपंच आता नावारूपाला आला होता. सगळीकडं जाईल तिथं सरपंचाला नावत होती. वस्तीवरून जाणारी-येणारी सरपंचाला बघून तोंडात बोटं घालत होती. सरपंचाला जेवढी लोकं नावजत होती. त्याबरोबर त्याच्यावर जळणारी पण काय कमी नव्हती. तरी, पण सरपंच ताठ मानेने मोठ्याने डरकाळी फोडत मोठ्या डौलाने उभा होता.





ब्रेन रॉट सिंड्रोम

डॉ. कारभारी रा. खरात
एम.डी., डी.पी.एच., पी.जी.डि.एच.क्यू.एम.
वरिष्ठ सल्लागार, युनिसेफ, मुंबई महाराष्ट्र
मो.: ९५९७१११६२७

'सडक्या डोक्याच हाय ते' – हा एक परवलीचा टोमणा खेड्यापाड्यातून फार पूर्वीपासून वापरत आहे. यात डोक म्हणजे मेंदू असा अर्थ अभिप्रेत असतो. एखादी व्यक्ती विचित्र वागत असेल, सतत विक्षिप्तपणा करत असेल, चित्रविचित्र / विकृत विचार करत असेल, सतत नकारात्मक विचार बाळगत असेल तर त्याला बहुतांश सगळेच हा टोमणा मारतात. सडक्या / सडेल डोक्यानं वाक्प्रचार या डिजिटल जमान्यात फार मोठ्या प्रमाणात 'ब्रेन रॉट' या नावाने प्रसिद्ध पावला आहे. इतक्या प्रचंड प्रमाणात की सन २०२४ मध्ये ऑक्सफर्ड डिक्शनरीने 'ब्रेन रॉट' या शब्दाला 'वर्ड ऑफ द इयर' **(word of the year)** म्हणून घोषित केले. हा ब्रेन रॉट अत्र तत्र सर्वत्र आपले अधिराज्य गाजवतोय आणि त्याला आपल्या सर्वांपर्यंत पोहचवण्याचे काम करतोय तुमच्या–आमच्या सर्वांचेच लाडके मोबाईल फोनुलं अन् त्याची इतर भावंडं !

रोज तासनतास सोशल मीडियावर विविध रील्स, शॉर्ट्स, मीम्स इत्यादी निरर्थक गोष्टींमध्ये वेळ घालवल्याने मानसिक क्षमता कमकुवत होते. अशा या अवस्थेला ब्रेन रॉट असे म्हणतात. या मानसिक अवस्थेचे दुष्परिणाम फार मोठे आहेत. ब्रेन रॉटमुळे उद्भवणाऱ्या विविध लक्षणांच्या समुहाला ब्रेन रॉट सिंड्रोम असे संबोधतात.

या डिजिटल युगात ब्रेन रॉट प्रसिद्धीच्या शिखरावर असला तरी या संकल्पनेची उत्पत्ती हेन्री डेव्हिड थोरा यांच्या सन १८५४ मधील 'वॉल्डेन' या पुस्तकात सापडते. १८४० च्या दशकात युरोपात मोठ्या प्रमाणात बटाट्याचे पीक कुजले होते; त्यामुळे तिथे मोठा दुष्काळ पडला होता. त्या कुजलेल्या बटाट्यांशी माणसाच्या ब्रेन रॉटची तुलना केली गेली होती. ब्रेन रॉट झाल्याने बौद्धिक क्षमता कमी होते, बुद्धीचा ऱ्हास होतो, विचार करण्याची क्षमता नष्ट होत जाते. नवीन, क्रियाशील विचारांचा दुष्काळ जाणवू लागतो. हा ब्रेन रॉट सर्व वयोगटात लहान–थोरांमध्ये दिसून येतो.

मुळात हा ब्रेन रॉट होतो कशामुळे? हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आपल्याकडील वेळेचा प्रत्येक क्षण हा मोबाईल फोन, लॅपटॉप, आयपॅड इ.च्या स्क्रीनकडे टकमक लावून बघण्यात घालवण्याची सवय, व्यसनामुळे मनाला विश्रांती मिळत नाही. त्यामुळे मानसिक थकवा येतो. हे ब्रेन रॉट होण्याचे महत्त्वाचे कारण आहे. सोशल मीडियावरील निरर्थक, ध्येयहीन, छोटे छोटे रील्स सतत बघितल्याने मनाची एकाग्रता साधण्याची क्षमता कमी कमी होत जाते. यामुळे नवीन काही शिकण्याची क्षमता कमी होते. आपली दैनंदिन कामे करत असताना स्क्रीनवर व्हिडिओ, विनोद, मीम्स वगैरे पाहण्याची सवय, मोबाईल फोनवर येणारे सततचे नोटिफिकेशन्स, इशारे आणि सतत स्क्रोलिंग करत राहणे या गोष्टी ब्रेन रॉट होण्यास कारणीभूत ठरतात.

एखाद्या व्यक्तीला ब्रेन रॉट झाला आहे हे ओळखायचे कसे? याची सर्वसामान्य लक्षणे,

स्वभावातील बदल जाणून घेणे आवश्यक आहे. ब्रेन रॉट या मानसिक अवस्थेत पोहोचल्यावर, अशा व्यक्तीस एका विषयावर लक्ष केंद्रित करण्यात अडचणी येतात, मनाची एकाग्रता भंग पावते. एखाद्या विषयाचे, माहितीचे विश्लेषण करण्यात अडचणी जाणवतात. निर्णय घेण्याची क्षमता कमी होते आणि त्यामुळे दैनंदिन समस्या सोडविण्यात अडचणी येतात. ब्रेन रॉटमुळे स्मरणशक्ती कमी होते व विसरभोळेपणा वाढतो. मानसिक थकवा जाणवतो व काही नवीन करण्याची कल्पकता नष्ट होते, प्रेरणा राहत नाही. अशी व्यक्ती नकारात्मक बातम्यांकडे आकर्षित होते. मनाची सतत चलबिचल सुरू असल्यामुळे मानसिक संतुलन बिघडते. कोणतीही माहिती आठवण्याची सवय राहत नाही. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी डिजिटल उपकरणांवर अवलंबून राहण्याची सवय पडते व मेंदूची निष्क्रियतेकडे वाटचाल होत राहते.

ब्रेन रॉटचे दुष्परिणाम सर्व वयोगटात दिसून येतात. लहान वयात बालकांमध्ये हे दुष्परिणाम जास्तच घातक ठरतात, कारण याचा विकसित होत असलेल्या बाल मनावर... बौद्धिक क्षमतेवर, मेंदूच्या विकासावर विपरीत परिणाम होतो. बालकांमध्ये यामुळे झोप न येण्याची समस्या उद्भवते. मानसिक थकव्यामुळे मेंदू सुन्न झाल्याचे जाणवते. एकलेकोंडेपणा वाढतो, कुटुंबात व मित्रपरिवार, आप्तेष्ट यांच्यापासून अलिप्त राहण्याकडे कल वाढतो व समानुभूतीचा (EMPATHY) ऱ्हास सुरू होतो. मनाची एकाग्रता साधण्यात अडचणी येतात व निर्णयक्षमता कमी होते. संवादक्षमता कमी झाल्याने दैनंदिन व्यवहारात अडथळे येतात. अशा बालकांचा स्वभाव चिडचिडा बनतो, स्वभाव रागीट होतो आणि त्यांच्याकडून मोबाईल फोन काढून घेतल्यावर ते टोकाचे पाऊल उचलतात. याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. ब्रेन रॉट सिंड्रोमग्रस्त बालकांमध्ये नैराश्य व चिंताग्रस्ततेचा मोठा धोका असतो. या सर्व बाबींचा शैक्षणिक, मानसिक व सामाजिक प्रगतीवर वाईट परिणाम झाल्याचे दिसून येते.

याचप्रमाणे ब्रेन रॉटचे दुष्परिणाम सर्वच वयोगटात दिसून येतात. ज्येष्ठ नागरिकांना ब्रेन रॉट सिंड्रोम वेगाने वार्धक्याकडे घेऊन जातो. नैराश्य, एकटेपणा, विसरभोळेपणा, सतत तणावाखाली राहणे, आणि वाढत्या वयानुसार होणारे बदल अधिक वेगाने होऊ लागतात.

ब्रेन रॉट होण्यापासून आपण आपला बचाव कसा करावा? हा एक गहन प्रश्न बनला आहे. आपल्या दैनंदिन दिनचर्येत काही सवयी कटाक्षाने लावून घेतल्यास व त्या जपल्यास आपण ब्रेन रॉट होण्यापासून दूर राहू शकतो. ब्रेन रॉटपासून स्वतःला वाचवण्यासाठी सोशल मीडियापासून अलिप्त राहणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. तथापि हे बहुतांश जणांना शक्य होत नाही. अशावेळी मोबाईलवर वा इतर गॅझेटवर सतत स्क्रोलिंग करत राहणे टाळावे, मधूनमधून ब्रेक घ्यावा. स्वतःला इतर गोष्टींमध्ये सक्रिय करावे, पुस्तके/वृत्तपत्रे/ नियतकालिके वाचनाची सवय करून घ्यावी. शांत आणि पूर्ण झोप घ्यावी, यासाठी झोपण्यापूर्वी किमान एक तास अगोदर डिजिटल मीडिया पाहणे बंद करावे. आपला दैनंदिन स्क्रीन टाईम कमी करावा व स्वतःच्या मेंदूला अधिक क्रियाशील ठेवण्यासाठी बुद्धीला चालना मिळेल अशा उपक्रमांमध्ये स्वतःला गुंतवून घ्यावे. लहान बालकांच्या बाबतीत पालकांनी बालकांना स्क्रीन टाईमची मर्यादा घालून दिली व तेवढाच वेळ बालकांनी मोबाईल फोन वा गॅझेट वापरली आणि इतर वेळ व्यायाम, मैदानी खेळ वा इतर उपक्रमासाठी दिला तरत्यांचा ब्रेन रॉटपासून

बचाव करता येऊ शकतो, या ब्रेन रॉटपासून वाचण्यासाठी शारीरिक आणि मानसिक विश्रांतीची फार आवश्यकता आहे. विश्रांतीसोबतच दैनंदिन सकस आहारसुद्धा यासाठी खूप महत्त्वाचा आहे.

'अति तिथे माती' या म्हणीचा प्रत्यय सोशल मीडियाच्या अतिवापरामध्ये प्रकर्षाने दिसून येतो तो 'ब्रेन रॉट सिंड्रोमच्या' स्वरूपात. या ब्रेन रॉटवर उपाय करणे आवश्यक असते आणि ते केले नाही तर ब्रेन रॉटमुळे होणाऱ्या दुष्परिणामांमुळे फार मोठे नुकसान होते. हे टाळण्यासाठी ब्रेन रॉटवरील महत्त्वाचे उपाय आहेत ते असे –

(१) डिजिटल डिटॉक्स : यामध्ये स्वतःला डिजिटल उपकरणे व सोशल मीडियापासून ठराविक वेळेसाठी दूर ठेवण्याची सवय करून घेण्यावर भर दिला जातो. त्यामुळे ताणतणाव कमी होतो, शांत झोप लागते, एकाग्रता वाढते, मनाजोगे काम करायला वेळ मिळतो व नातेसंबंध वाढीसाठीही या वेळेचा वापर करता येतो.

(२) ध्यानधारणा, प्राणायाम नियमित करण्याची सवय करून घेतल्यास ब्रेन रॉटचे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते.

(३) पुस्तकांचे वाचन : हे मात्र पुस्तक हातात घेऊन वाचन करावे, स्क्रीनवर नाही.

(४) नियमित व्यायाम केल्याने डोपामाइनमुळे मेंदू तल्लख राहतो.

(४) शांत व वेळेवर पुरेशी झोप ब्रेन रॉटवर मात करण्यासाठी फार आवश्यक व उपयुक्त आहे.

(५) डिजिटल उपकरणांवर काम करताना ठराविक वेळेनंतर काही मिनिटांची विश्रांती घ्यावी.

(६) एकावेळी एका विषयावर एकाग्रता साधण्याची सवय करून घ्यावी. एकाच वेळी एकापेक्षा जास्त विषयावर विचार करायला गेले की त्यातील एकही गोष्ट, काम नीट होत नाही.

(७) असे काही छंद जोपासा की ज्यामध्ये हाताने स्पर्श करून / काम करून आनंद मिळेल, उदा. विणकाम, मातीकाम, बागकाम, लिखाण वगैरे ज्यामध्ये आपण आपल्या हातांनी काही बनवतो.

(८) सोशल मीडियावर वेळ देताना अशाच गोष्टी बघाव्यात ज्यामुळे आपल्याला काही चांगले करण्याची प्रेरणा मिळेल, उत्तेजना मिळेल, सकारात्मक ऊर्जा मिळेल.

(९) बुद्धीला चालना मिळेल अशा उपक्रमांमध्ये स्वतःला गुंतवून घ्यावे.


(१०) नियमित शारीरिक व्यायाम (उदा. चालणे, धावणे, उड्या मारणे, पोहणे, सायकल चालवणे वगैरे) केल्याने मेंदूचा रक्तपुरवठा वाढतो.

(११) नियमित संतुलित आहार घ्यावा – मेंदूच्या चांगल्या आरोग्यासाठी हे आवश्यक आहे.

(१२) आपली दैनंदिन दिनचर्या आखताना काम, विश्रांती आणि छंद यांचा योग्य मेळ घालावा, जेणेकरून शारीरिक, मानसिक व भावनिक थकवा येणार नाही.

(१३) आपल्या वैयक्तिक स्तरावर हे सर्व उपाय करूनही ब्रेन रॉटपासून सुटका होत नसेल तर अशावेळी मानसिक आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेणे उपयुक्त ठरते.

जगभरात 'ब्रेन रॉट' या विषयावर मोठ्या प्रमाणात संशोधन सुरू आहे. 'पबमेड', 'सायन्स डायरेक्ट', 'रिसर्च गेट' या आणि इतर माध्यमांमधून यावर शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. या विषयावर आणखी संशोधनाची गरज आहे. तोपर्यंत डिजिटल मीडियापासून थोडं अंतर राखून जरा विसावू या वळणावर!



लहान मुलांची सुरक्षितता : प्रेमाइतकीच सजगता महत्त्वाची!

प्रा. विजय नवले
सहसंचालक, करियरसेवा डॉट कॉम
प्रेरणादायी व्याख्याते, लेखक, करियर समुपदेशक
वारजे, पुणे. मो.: ९८२२५०२९६९

आपल्या लहान मुलांवर आपले जीवापाड प्रेम असते. त्यांना चांगले कपडे मिळावेत, चांगले अन्न मिळावे, उत्तम शाळेत शिक्षण मिळावे, त्यांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना भविष्यात उत्तम करिअर करता यावे आणि त्यांच्या आयुष्यात कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू नये यासाठी पालक सातत्याने प्रयत्न करत असतात. मुलांच्या भविष्यासाठी आर्थिक नियोजन करण्यापासून त्यांच्या छोट्या-मोठ्या इच्छा पूर्ण करण्यापर्यंत आपण कितीतरी गोष्टी करतो.

परंतु या सगळ्याच्या केंद्रस्थानी आणखी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे – मुलांची सुरक्षितता !

कारण मुलांच्या बाबतीत काही दुर्घटना अशा असतात की त्या घडण्यामागे पालकांचे प्रेम कमी असते असे अजिबात नाही. अनेकदा त्यामागे असते ते फक्त काही सेकंदांचे दुर्लक्ष, एखाद्या धोक्याचा आधी विचार न करणे किंवा ''एवढ्याने काय होणार आहे?'' अशी सहज निर्माण झालेली भावना.

म्हणूनच मुलांच्या सुरक्षिततेचा विचार करताना एक साधे तत्त्व लक्षात ठेवले पाहिजे –''दुर्घटना घडल्यानंतर आपण काय करू?'' यापेक्षा ''दुर्घटना घडूच नये म्हणून आपण आधी काय करू?''हा विचार अधिक महत्त्वाचा आहे.

<u>गाडीची खिडकी म्हणजे खेळण्याची जागा नाही.</u>

कुटुंबासोबत कारमधून प्रवास करताना अनेकदा लहान मुले मागच्या सीटवर बसलेली असतात. खिडकीची काच खाली असेल तर बाहेरचे जग पाहण्याचे त्यांना प्रचंड आकर्षण असते. काही मुले हात बाहेर काढतात, काही डोके बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात. मुलांच्या दृष्टीने ही गंमत असते; पण पालकांच्या दृष्टीने हा संभाव्य धोका आहे.

शेजारून जाणारे वाहन अगदी जवळून जाऊ शकते. एखादी वस्तू मुलाला लागू शकते. अचानक ब्रेक लागल्यासही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे चालत्या गाडीत मुलांना हात, मान किंवा शरीराचा कोणताही भाग खिडकीबाहेर काढू देणे टाळले पाहिजे.

याच्याशी संबंधित दुसरी काळजी म्हणजे पॉवर विंडो. चालक अनेकदा वाहन चालवण्यात व्यस्त असतो. त्याने मागे न पाहता खिडकीची काच वर करण्याचे बटण दाबले आणि त्याचवेळी मुलाचा हात किंवा डोके खिडकीजवळ असेल तर गंभीर प्रसंग निर्माण होऊ शकतो. आधुनिक वाहनांमध्ये काही सुरक्षा सुविधा असल्या तरी प्रत्येक वाहनात त्या असतीलच असे गृहीत धरता येत नाही.

म्हणून काच वर करण्यापूर्वी मुलांचे हात, बोटे किंवा डोके खिडकीजवळ नाही ना, याची खात्री करणे ही छोटी सवय मोठा धोका टाळू शकते. उपलब्ध असल्यास चाइल्ड लॉक आणि विंडो लॉक वापरणेही आवश्यक आहे.

रस्त्यावर चालतानाही मुलाची जागा महत्त्वाची.

आई, वडील, आजी किंवा आजोबा लहान मुलाला घेऊन रस्त्यावरून चालत असतात. मुलाचा हात आपल्या हातात आहे म्हणजे मूल सुरक्षित आहे, असे आपल्याला वाटते. पण आपण रस्त्याच्या कोणत्या बाजूने चालतो आणि मूल नेमके कोणत्या बाजूला आहे, याचाही विचार आवश्यक आहे.

फुटपाथ उपलब्ध असेल तर त्याचा वापर करणे हा पहिला पर्याय आहे. फुटपाथ नसेल तर पादचाऱ्यांनी समोरून येणारी वाहने स्पष्ट दिसतील अशा पद्धतीने चालणे अधिक सुरक्षित ठरते. त्याचबरोबर लहान मूल शक्यतो वाहतुकीच्या बाजूला न ठेवता रस्त्याच्या आतील, सुरक्षित बाजूला ठेवले पाहिजे.

लहान मुलांची उंची कमी असल्यामुळे वाहनचालकाला ते पटकन दिसतीलच असे नाही. विशेषतः पार्क केलेल्या वाहनांमधून, वळणावरून किंवा गर्दीच्या रस्त्यावरून चालताना अधिक काळजी आवश्यक आहे.

सोसायटीतील रस्तासुद्धा रस्ताच आहे !

मोठ्या रस्त्यावर गेल्यानंतर पालक मुलांना ''हात धर'', ''इकडे बघ'', ''पळू नको'' असे सांगतात. परंतु स्वतःच्या सोसायटीत किंवा कॉलनीत मात्र सुरक्षित असल्याची भावना निर्माण होते.

नेमका हाच आत्मविश्वास कधी कधी धोकादायक ठरू शकतो.

खेळताना एखादे मूल अचानक गेटमधून किंवा दोन पार्क केलेल्या वाहनांच्या मधून रस्त्यावर येऊ शकते. चेंडूच्या मागे धावताना त्याचे लक्ष वाहनांकडे नसते. दुसरीकडे वाहनचालकालाही अचानक आलेले लहान मूल दिसण्यासाठी पुरेसा वेळ मिळेलच असे नाही.

म्हणूनच मुलांना लहानपणापासून शिकवले पाहिजे–गेटमधून किंवा गल्लीमधून मुख्य रस्त्यावर येण्यापूर्वी थांबायचे, दोन्ही बाजूंना पाहायचे आणि वाहन नसल्याची खात्री करूनच पुढे जायचे.

सोसायट्यांनीही याकडे सामूहिक जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे. “Children at Play”, “Drive Slow” यांसारख्या सूचना, स्पीड नियंत्रण, योग्य प्रकाशव्यवस्था आणि वाहनचालकांचे प्रबोधन या छोट्या गोष्टी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

पार्किंगमध्ये वाहन चालवताना विशेष दक्षता.

लहान मुलांच्या दृष्टीने पार्किंगची जागा विशेष धोकादायक ठरू शकते. वाहनाच्या उंचीच्या तुलनेत मूल खूप लहान असल्यामुळे चालकाच्या नजरेतून ते सहज सुटू शकते.

रिव्हर्स कॅमेरा आणि सेन्सर उपयोगी आहेत; परंतु ते आपल्या प्रत्यक्ष निरीक्षणाची जागा घेऊ शकत नाहीत. गाडी सुरू करण्यापूर्वी आजूबाजूला एखादे मूल खेळत नाही ना, गाडीच्या मागे किंवा पुढे कोणी नाही ना, हे पाहणे गरजेचे आहे.

विशेषतः गाडी रिव्हर्स घेताना मोबाईलवर बोलणे किंवा दुसऱ्या कामात लक्ष देणे पूर्णपणे टाळले पाहिजे. शक्य असल्यास ऑडिओचा आवाज कमी ठेवावा, जेणेकरून बाहेरून कोणी सूचना दिल्यास ती ऐकू येईल.

वाहन हलवण्यापूर्वी काही सेकंद केलेले निरीक्षण एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचवू शकते.

दुचाकीवर लहान मूल म्हणजे अतिरिक्त जबाबदारी

तीन–चार वर्षांच्या मुलांना दुचाकीवर बसवताना

विशेष काळजी आवश्यक आहे. मागे बसलेल्या लहान मुलाला झोप येऊ शकते, त्याची पकड सैल होऊ शकते किंवा स्पीडब्रेकर आणि खड्ड्यामुळे त्याचा तोल जाऊ शकतो.

त्यामुळे ''मूल बसले आहेच ना!'' एवढ्यावर समाधान मानता येणार नाही. मुलाचे वय, त्याची सुरक्षित बसण्याची क्षमता, हेल्मेटसह योग्य सुरक्षा साधने, वाहनाचा वेग आणि लागू असलेले वाहतूक नियम या सर्वांचा विचार करणे आवश्यक आहे. अगदी लहान मूल स्वतःला सुरक्षितपणे सांभाळू शकत नसेल तर असा दुचाकी प्रवास टाळणे हाच अधिक सुरक्षित पर्याय आहे.

एकापेक्षा अधिक लहान मुलांना असुरक्षित पद्धतीने दुचाकीवर घेऊन जाणे तर अधिक धोकादायक ठरू शकते. प्रवासात मुलांची मस्ती सुरू झाली किंवा अचानक तोल गेला तर चालकाला परिस्थिती सांभाळणे कठीण होऊ शकते.

<u>गॅलरीतील खुर्चीही धोका बनू शकते.</u>

घराची बाल्कनी किंवा गॅलरी सुरक्षित आहे का, याचा विचार पालकांनी मुलाच्या नजरेतून करायला हवा.

मोठ्या व्यक्तीसाठी सुरक्षित वाटणारी रेलिंग लहान मुलासाठी सुरक्षित असेलच असे नाही. जवळ खुर्ची, स्टूल, टेबल किंवा चढता येईल अशी कोणतीही वस्तू असेल तर मूल उत्सुकतेपोटी त्यावर चढू शकते. रेलिंगच्या पलीकडे पाहण्याचा प्रयत्न करू शकते.

म्हणून बाल्कनीमध्ये चढण्यासाठी उपयोगी पडतील अशा वस्तू रेलिंगजवळ ठेवू नयेत. रेलिंगची रचना, उंची, फटी आणि सुरक्षित जाळी यांचीही वेळोवेळी तपासणी केली पाहिजे.

''माझे मूल असे करणार नाही'' यापेक्षा ''मुलाने प्रयत्न केला तरी ते धोक्यात येणार नाही'' अशी घराची रचना करणे अधिक सुरक्षित आहे.

<u>बाथरूममधील धोकेही लक्षात घ्या.</u>

मुलं थोडी मोठी झाली की स्वतंत्रपणे आंघोळ करायला लागतात. हे त्यांच्या स्वावलंबनाचे लक्षण असले तरी बाथरूममध्ये गरम पाणी, घसरणे, बंद दरवाजा आणि गिझर यांसारखे धोके असतात.

विशेषतः गॅस गिझर असल्यास अपुऱ्या वायु वीजनामुळे कार्बन मोनॉक्साइडसारखा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. इलेक्ट्रिक गिझरमध्येही योग्य अर्थिंग, विद्युत सुरक्षा आणि तापमान नियंत्रण आवश्यक आहे.

मुलाला बराच वेळ झाला तरी ते बाहेर आले नाही, प्रतिसाद देत नाही किंवा बाथरूममधून असामान्य आवाज येत आहे, तर '' आंघोळ करत असेल'' म्हणून दुर्लक्ष करू नये. लहान मुलांच्या बाबतीत बाथरूमचा दरवाजा असा असावा की आपत्कालीन परिस्थितीत बाहेरून उघडता येईल.

<u>वीज, प्लग आणि वायरङ्गकुतूहलाला धोका कळत नाही.</u>

लहान मुलाला प्लग पॉइंट म्हणजे काय, विद्युत प्रवाह म्हणजे काय आणि त्याचा धोका किती मोठा आहे हे माहीत नसते. त्याला फक्त भिंतीतील दोन-तीन छोटी छिद्रे दिसतात. कुतूहलापोटी त्यामध्ये एखादी वस्तू घालण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

म्हणून न वापरलेले सॉकेट्स योग्य चाइल्ड-सेफ

कव्हरने सुरक्षित करावेत. सैल वायर, खराब प्लग, उघडे विद्युत कनेक्शन यांची त्वरित दुरुस्ती करावी.

मुलांना वीजेपासून दूर राहण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे; पण प्रशिक्षणाबरोबरच भौतिक सुरक्षा व्यवस्था करणे अधिक महत्त्वाचे आहे.

स्वयंपाकघरातील प्रेमही सुरक्षित असले पाहिजे.

आई किंवा वडील स्वयंपाक करत असताना मुलाला जवळ घेऊन एखादी गोष्ट दाखवणे प्रेमाचा सुंदर क्षण असू शकतो. पण स्वयंपाकघरात गॅसची ज्योत, गरम तेल, उकळते पाणी, कुकर, गरम भांडी, सुरी आणि विद्युत उपकरणे असतात.

मुलाच्या एका अनपेक्षित हालचालीने गरम भांडे अंगावर येऊ शकते. त्यामुळे गरम भांड्यांची हँडल्स शक्यतो मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवावीत. काडेपेटी, लायटर, चाकू, गरम उपकरणे सुरक्षित जागी ठेवावीत. लहान मुलांना गॅसजवळ उभे करून स्वयंपाक दाखवताना अतिरिक्त सावधगिरी आवश्यक आहे.

दिवा, मेणबत्ती आणि उदबत्ती–श्रद्धेबरोबर सुरक्षितताही.

घरात देवापुढे दिवा किंवा उदबत्ती लावण्याची पद्धत अनेक घरांत असते. मोठ्यांसाठी ती रोजची बाब आहे; लहान मुलासाठी मात्र ती चमकणारी आणि कुतूहल निर्माण करणारी वस्तू असू शकते.

घरातून बाहेर पडताना उघडी ज्योत, मेणबत्ती किंवा असुरक्षित स्थितीत असलेली उदबत्ती सोडू नये. लहान मुलाच्या आवाक्यात काडेपेटी किंवा लायटर ठेवू नये.

मुलांचे कुतूहल थांबवता येणार नाही; पण कुतूहल धोक्यापर्यंत पोहोचणार नाही अशी व्यवस्था नक्की करता येते.

नवीन ठिकाण म्हणजे नवीन धोके.

आपण मुलांना आजी–आजोबांकडे, नातेवाईकांकडे किंवा गावाला पाठवतो. तिथे मुलांना खूप आनंद मिळतो; पण त्यांच्या दृष्टीने ते नवीन वातावरण असते.

शहरातील घरात नसणाऱ्या अनेक गोष्टी तिथे असू शकतात. विहीर, पाण्याची टाकी, शेततळे, जिना, गच्ची, जनावरे, शेतीची अवजारे, गावातून जाणारा रस्ता किंवा सहज उघडता येणारे मुख्य दार.

म्हणून मुलाला दुसरीकडे पाठवताना फक्त 'त्याची काळजी घ्या' एवढे सांगण्याऐवजी त्या ठिकाणचे संभाव्य धोके कोणते आहेत यावर स्पष्ट संवाद आवश्यक आहे.

मोबाईलमुळे निर्माण होणारे 'काही सेकंदांचे दुर्लक्ष'

आजच्या काळातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मोबाईल.

आपण मुलासोबत आहोत; पण आपले लक्ष मोबाईलमध्ये आहे, अशी परिस्थिती सहज निर्माण होते. रस्ता क्रॉस करताना, पार्किंगमध्ये, मुलं खेळताना, कारमध्ये प्रवास करताना किंवा घरातील गॅलरीत असताना पालकांचे लक्ष काही क्षण मोबाईलकडे जाते.

प्रश्न मोबाईल वापरण्याचा नाही; प्रश्न ज्या क्षणी मुलाला आपल्या पूर्ण लक्षाची गरज आहे त्या क्षणी आपले लक्ष कुठे आहे, हा आहे.

मुलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत काही सेकंदही महत्त्वाचे असू शकतात. मुलांना फक्त सांभाळू नका; सुरक्षिततेचे प्रशिक्षणही द्या.

मुलांच्या मागे चोवीस तास पालक राहू शकत नाहीत. त्यामुळे जसजशी मुले मोठी होतात तसतसे

त्यांना स्वतःच्या सुरक्षिततेचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

रस्ता कसा ओलांडायचा, अनोळखी व्यक्तीबरोबर जायचे नाही, लिफ्टमध्ये काय काळजी घ्यायची, विजेच्या उपकरणांना हात लावायचा नाही, आग दिसल्यास काय करायचे, पाण्याजवळ एकटे जायचे नाही, आपत्कालीन परिस्थितीत कोणाला फोन करायचा, स्वतःचे पूर्ण नाव आणि पालकांचा संपर्क क्रमांक माहीत असणे–अशा अनेक छोट्या गोष्टी मुलांना वयानुसार शिकवता येतात.

मुलांना सतत घाबरवण्याची गरज नाही. उलट सुरक्षिततेचे नियम त्यांना शांतपणे, वारंवार आणि कृतीतून शिकवले पाहिजेत.

सुरक्षितता ही संपूर्ण कुटुंबाची संस्कृती बनली पाहिजे.

मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ आईची किंवा केवळ वडिलांची नाही. आजी–आजोबा, नातेवाईक, घरातील मदतनीस, वाहनचालक, शाळेतील कर्मचारीङ्कमुलांच्या संपर्कात नियमितपणे येणाऱ्या प्रत्येकाला आवश्यक सूचना माहीत असल्या पाहिजेत.

विशेषतः मूल दुसऱ्या व्यक्तीसोबत बाहेर जाणार असेल तर 'लक्ष ठेवा' एवढे न सांगता आवश्यक सुरक्षा सूचना स्पष्टपणे सांगणे उपयुक्त ठरते.

आपल्याला एखाद्या ठिकाणी असुरक्षित परिस्थिती दिसत असेल तर संबंधित व्यक्तीला नम्रपणे सूचना करण्यासही मागेपुढे पाहू नये. कारण सुरक्षिततेच्या बाबतीत 'मला काय करायचे?' अशी भूमिका योग्य नाही.

<u>प्रेमाबरोबर 'सजग पालकत्व' आवश्यक.</u>

आपण आपल्या मुलांसाठी मोठी स्वप्ने पाहतो. त्यांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतो. त्यांच्या करिअरसाठी योजना आखतो. त्यांच्या वाढदिवसापासून त्यांच्या भविष्यातील शिक्षणापर्यंत प्रत्येक गोष्टीचे नियोजन करतो.

पण या सगळ्या नियोजनाच्या आधी एक मूलभूत जबाबदारी आहे–त्यांना सुरक्षित बालपण देणे.

प्रत्येक दुर्घटना टाळता येईलच असे म्हणता येणार नाही. पण अनेक धोके आधी ओळखता येतात आणि योग्य खबरदारीने त्यांची शक्यता निश्चितच कमी करता येते.

त्यासाठी प्रत्येक ठिकाणी स्वतःला एक प्रश्न विचारण्याची सवय लावूया –

'इथे माझ्या मुलाच्या दृष्टीने काय धोका असू शकतो?'

गाडीमध्ये बसताना, दुचाकीवर जाताना, रस्ता ओलांडताना, पार्किंगमध्ये वाहन काढताना, गॅलरीत खेळताना, बाथरूममध्ये आंघोळ करताना, स्वयंपाकघरात येताना, गावाला जाताना किंवा एखाद्या नवीन ठिकाणी फिरतानाङ्कहा एक प्रश्न आपली सजगता अनेक पटींनी वाढवू शकतो.

लहान मुलांना जगाची ओळख करून द्यायची आहे; जगाची भीती घालायची नाही. त्यांना खेळू द्यायचे आहे, शिकू द्यायचे आहे, अनुभव घेऊ द्यायचे आहेत; पण त्याचवेळी त्यांच्या भोवतालच्या धोक्यांची जबाबदारी मोठ्या माणसांनी स्वीकारली पाहिजे.

मुलांवर प्रेम करणे म्हणजे फक्त त्यांना हवे ते देणे नव्हे; त्यांना न दिसणारा धोका आपण आधी ओळखणे,

हीसुद्धा प्रेमाचीच एक अत्यंत महत्त्वाची अभिव्यक्ती आहे.

मुलांचे भविष्य घडवणे आपल्या हातात पूर्णपणे नसेल; पण त्यांच्या सुरक्षिततेसाठी शक्य ती प्रत्येक काळजी घेणे नक्कीच आपल्या हातात आहे.

म्हणूनच –

प्रेम भरपूर करा, स्वप्ने मोठी पाहा; पण प्रत्येक क्षणी सजगही राहा.

कारण लहान मुलांच्या सुरक्षिततेमध्ये 'काळजी'पेक्षा 'वेळीच घेतलेली काळजी' अधिक महत्त्वाची असते.

ऐक

झोळी बांधता येईल अशा फांद्या तोडू नकोस
घरटी करता येतील, खोपी टांगता येतील
अशी झुडपंही वाढू दे डिंकासाठी बाभळी,
लिंबोळ्यांसाठी कडूलिंब राहू दे
बोट धरून चालता येईल अशी पाऊलवाट बुजवू नको
इथंही ऋतू फिरायला येतील, झाडंझुडं पार बदलून जातील
संध्याकाळच्या सावल्यात सुनसान सडकांवरून
एखादी बाबागाडी इकडे वळणार नाही कशावरून?
पाळण्यावर चिमणाळं हलणार नाही कशावरून?
बालगाणी शिकवण्याचा लडीवाळ बोबडकांदा म्हणेल
तिकले काय आहे? डोंगल कुथून येतो?
मुंगूस म्हणजे काय? किती पाय गोमीला?
याला काय म्हणतात नि त्याचं काय कलायचं म्हणत
आपल्यासह हरेक वस्तुचं खेळणं होईल
खरं सांगू, याहून सुखद नवलही घडेल
हा पिटुकला कवितेचा तुकडा खरा होईल
तेव्हा कळेल तुला
मातीची पणती लावून सवंसांझेला
मी काय लिहीत असायचे

– कल्पना दुधाळ
मो. ९९२३६२७२१८







उतार वयातले विस्मरण... शाप नव्हे वरदान!

प्रल्हाद दुधाळ
एफ १३०१, थ्री ज्वेलस् अपार्टमेंटस,
टिळेकर नगर, कोंढवा, पुणे ४११०४८.
मो.: ९४२३०१२०२०

आपण आपल्या आजूबाजूला बघतो की बऱ्याच जणांना विस्मरण होण्याचा विकार असतो.अगदी नुकत्याच घडलेल्या गोष्टीसुद्धा अशा व्यक्तीकडून विसरल्या जातात. पूर्वायुष्यात भेटलेली माणसे,त्यांची नावे,स्वतःच्या आयुष्यातल्या अगदी महत्वाच्या घटनांचे तपशीलच काय पण नेहमीच्या वहिवाटीचे रस्तेही काहींच्या लक्षात रहात नाहीत आणि असा माणूस आपल्या विस्मरणाच्या या आजाराबद्दल स्वतःला दोष द्यायला लागतो. तरुणपणी असा आजार जडला तर मात्र अशा माणसाला दैनंदिन आयुष्यात खूप अडचणी येतात.योग्य औषधोपचार घेऊन विस्मरणाचा हा आजार नक्कीच बरा होत असेल यात संशय नाही.

आजार म्हणून विस्मरण होणे नक्कीच त्रासदायक आहे, पण वृद्धापकाळाने बऱ्याचदा कित्येक लोकांना विस्मरणाचा विकार जडतो. काहींना तर स्क्रिझोफेनियासारखा आजार होतो आणि माणसे स्वतःची आणि आप्तस्वकीयांची ओळखही विसरून जातात.असा आजार झालेल्या जवळच्या वृद्ध व्यक्तींची देखभाल करण्याचे मोठे आव्हान घरातल्या लोकांसमोर उभे राहते असा टोकाचा विस्मरणाचा विकार होणे खूपच दुर्दैवी असते.

या उलट आपण समाजात बघतो की काही काही व्यक्तींना प्रचंड स्मरणशक्तीचे वरदान मिळालेले असते अगदी वयाच्या सत्तर ऐशीतही स्मरणशक्ती सशक्त असलेल्या व्यक्ती बघितल्या की अशा माणसांचा आपल्याला हेवा वाटायला लागतो. अशा माणसांना त्यांच्या आयुष्यातल्या अगदी लहानपणापासूनच्या घटना, तपशील अगदी तारीख वारासहीत लक्षात असतात. सगळ्यांचे मोबाईल नंबर, गाड्यांचे नंबर, वाढदिवस, पत्ते, स्वतःच्या आयुष्यातल्या बारीकसारीक घटनाच काय पण इत्तरांच्या बाबतीतला सगळा तपशीलही अशा व्यक्ती लक्षात ठेवतात. माझ्या मते अशा जबरदस्त स्मरणशक्ती असलेल्या व्यक्तींना आयुष्भर या वरदानाची एक वेगळी किंमतही मोजावी लागते!

होते काय की प्रचंड स्मरणशक्ती असलेल्या व्यक्ती त्यांच्या आयुष्यात घडलेल्या चांगल्या गोष्टी तर लक्षात ठेवतातच पण माणसाच्या जीवनप्रवासात फक्त चांगल्याच घटना थोड्याच घडतात? अनेक आनंददायी घटनांच्या बरोबरच अनेक दुःखद क्लेशदायक घटनाही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि स्मरणशक्तीचे वरदान लाभलेल्या व्यक्तीसाठी अशा नकोशा आठवणीं म्हणजे जणू कधीच बऱ्या न होणाऱ्या सतत ठसठसणाऱ्या जखमा ठरतात.आयुष्यात झालेले अपमान,सोसलेले दुःख,जवळच्या व्यक्तींनी वेळोवेळी केलेला मानभंग,अजाणता किंवा जाणीवपूर्वक दुखावलेला आत्मसन्मान अशा गोष्टी विसरू म्हटले तरी विसरल्या जात नाहीत आणि स्मरणशक्तीचे मिळालेले वरदान शापासारखे वाटू लागते!

थोडे विचित्र वाटेल पण मला मनापासून वाटते की माणसाच्या ठराविक वयाच्या टप्प्यानंतर थोडाफार का

होईना विस्मरणाचा विकार असणे मानसिक आरोग्यासाठी फायद्याचे होऊ शकते!

काय आहे ना, प्रत्येकाच्या जीवनात ज्या विसरून जायला हव्यात अशा अनेक घटना घडलेल्या असतात आणि वयाच्या ठराविक टप्प्यानंतर आनंदी आणि समाधानी आयुष्य जगायचे असेल तर पूर्वायुष्यातल्या नकोशा आठवणी विसरता यायला हव्यात. वृद्धापकाळात नकोशा आठवणींमुळे विविध मनोकायिक आजार होऊ शकतात.

आध्यत्मिक शक्ती जप तप ध्यानसाधना कदाचित यावरचे उपाय असू शकतात पण सर्वसामान्य माणसाला अशी साधना जमेलच असे नाही. त्यामुळे विस्मरणाचा विकार कधी कधी फायद्याचा ठरु शकतो असे माझे प्रामाणिक मत आहे..

नको वृद्धपणी
नकोशा आठवणी
बोचरे ते क्षण
विसरू दे!
आनंदाच्या स्मृती
चिरकाल ठेव
घावांचे त्या व्रण
पुसावेस !
आता नको पुन्हा
षड्रिपूचा त्रास
शांततेचा ध्यास
रात्रंदिन

पुनरुज्जीवन

बांधावर फळझाडं होती
टपकन पडलेली कैरी खराब नव्हती
पोपटांची उष्टी फळं उष्टी नव्हती
एरंडाचे घोस आभाळात तरंगताना
मेंदीच्या ताटव्यात काजवे दडायचे
कासवाच्या पाठीवर पाकोळया बागडायच्या
खोचलेल्या मेढीची झाडं होताना
रेतीत नखं रुतवत पिसारे फुलायचे

नंतर माशी लागलेल्या फळांचे वास पांगले
आरशांवर चोची मारत खुळी झाली पाखरं
सालींना जखमा करणारे
सुतारपक्षी हुसकले
ते दिवस थोडीथोडी समज देत पुढं सरकले

प्रगत तंत्रज्ञानानं
बिनडागांची तरावट फळं पिकतात हल्ली
कमालीच्या देखभालीत ड्रॅगणफ्रुट,
द्राक्षे, डाळींब निर्यात होतात
तळ्यातली कमळं टपात फुलतात
बांध-ताली नाहीत की
वाळकीचिळकी काडीकुडी नाही
ससे, मुंगसं, पाणपक्षी नाहीत

पण मला खात्रीय
उगवणक्षमता टिकलेलं
देशी पेरूचं एखादं कडक बी
असेलच कुण्या पाखराच्या विष्ठेत
अथवा कुंपनाच्या कोपऱ्यात
ते वाढेल पूर्वीच्याच उमेदीनं
पूर्वीच्या पोपटांचं पिल्लू येईल भिरभिरत
शेलका पेरू टोकरेल
आणि इथली माऊली
कडेवरच्या खेळत्याबागडत्या बोबड्या लेकराला
नेमका तो पेरू खाऊ घालेल
की हे लेकरू गोड बोलत
पृथ्वीवरच्या या टिंबाला तसंच पुनरुज्जीवित करेल

– कल्पना दुधाळ
मु. पो. बोरीभडक, ता. दौंड,
जि. पुणे ४१२२०२. मो. ९९२३६२७२१८



सावित्रीबाई आणि सत्यशोधक समाज कार्य

शीला गिते

बीए., बीएड, सातारा

दलित मित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र भूषण

महात्मा फुल्यांनी २४ सप्टेंबर १८७३ला सत्यशोधक समाजाची नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी स्थापना करुन धर्मसंस्थेवर एक प्रहार करुन सामाजिक समतेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या कार्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंनी पतीच्या कार्यात खांद्याला खांदा भिडवून पुरोगामी चळवळीस आचार व विचारासह स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. जगाच्या इतिहासात पुरोगामी दांपत्य अजोडच दिसून येईल. २५ डिसेंबर १८७३ला सिताराम जबानी अल्हाट व राधाबाई ज्ञानोबा निंबाळकर यांचा पहिला ब्राह्मण पुरोहित विना विवाह पार पाडला. या विवाहात महात्मा फुलेंनी बाह्य समाज विरोध तर सावित्रीबाईनी आतील विरोध आघाडी सांभाळली. त्यात त्यांना प्रचंड छळ सोसावा लागला. दूसरा ७ मे १८७४ ला ग्यानोबा ससाणे व काशीबाई शिंदे यांच्या विवाह प्रसंगी सनात्यांनी दिलेला प्रचंड विरोधात महात्मा फुलेंनी स्वतःच्या घरी २५० आप्त मदतीने पोलिस पार्टीच्या मदतीने हा विवाह पार पाडला. यात सावित्रीबाईंनी अस्पृश्यांची मदत घेऊन हे कार्य पार पाडले. हे सर्व विवाह पुरोहितावीना, हुंड्याविना, कमी खर्चात उभयांना समाज पातळीत ठेवून पार पाडले. या कार्यात, चळवळीत ९० स्त्रीया सावित्रीबाईंच्या सभासद होत्या.

आज समाजात समाजकारण व राजकारण करणाऱ्या उठता बसता महात्मा फुले व सावित्रीबाईंचे नाव घेणाऱ्यांनी आपल्या मुलामुलींच्या लग्नप्रसंगी काटकसरीने हुंडाविना वधुवरांना समतेच्या विचारांतून लग्न लावून या क्रांतीकारक कार्याला सहकार्य करणे ही समाजाची अत्यावश्यक गरज आहे.

दिनांक ४ फेब्रुवारी १८८९ रोजी सकाळी ९.३० वाजता यशवंतराव फुले व राधा ससाणे ग्यानोबा ससाणेची मुलगी यांचा आंतरजातीय मिश्र विवाह पार पडला. यावेळी पक्षघाताने महात्मा फुले थोडेफार सावरले होते पण पूर्ण जबाबदारीने सावित्रीबाईंनी हा आंतरजातीय आधुनिक भारतातील पहिला विवाह मोठ्या धाडसाने पार पडला. हा विवाह हडपसर येथे मोठ्या संख्येने पार पडला. अशा तऱ्हेने सत्यशोधक चळवळ त्यातील विवाह सामाजिक कार्य संकटांचा पाडाव करत चालू राहील.

महाराष्ट्रात १८७७ ते १८९६ भयंकर दुष्काळ पडले. अन्नासाठी मोहताज, भुके कंगाल, स्त्री, शुद्रादी जनतेसाठी सत्यशोधक समाजाने फुले पती पत्नीने, कार्यकर्ते यांनी नुसती चर्चा न करता दुष्काळ निवारण करणेसाठी स्वतः सावित्रीबाईंनी धनकवडी येथील व्हिक्टोरीया कँपवर १ हजार बालकांच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था स्वतः पहात होत्या. त्यांच्या बरोबर महादू वाघोले व अनेक स्त्रीया होत्या. या बरोबरच हजारोंना जगण्याची हिंम्मत, निराधारांना मानसिक आधार देत होत्या. अन्नधान्य पुरवित होत्या. याच वेळी

सावित्रीबाईंनी कलेक्टरांपुढे निरपराध सत्यशोधकांची हिरारीने बाजू मांडून दुष्काळी कँपला दुष्काळासाठी ४ गाड्या धान्य मिळवून हे कार्य २ वर्ष चालविले याचे सचित्र पुरावे आहेत. परंतु आज भोगवादी, उचल संस्कृतीने सत्यशोधक, विचाराला हद्दपार करण्याचे ठरविले दिसते. संपत्तीचे बेगडे प्रदर्शन करुन समाजात स्वतःची पत वाढवत आहेत. त्यांच्या भोगवादी वृत्तीने सामाजिक विषमतेची मूळ रोवली जात आहेत. सावित्रीबाईंची चळवळ ही मुक्तीची पहाट आहे. आमच्या भगीनिंनी कालबाह्या परंपरा, धार्मिकक गुलामगिरी, अंधश्रध्दा यांना छेद देवून सावित्रीबाईंच्या विचारांची कास धरुन स्त्रीशक्तीला उन्नत करुन खऱ्या अर्थाने सावित्रीच्या लेकी बनावे हीच त्यांना आदरांजली.





श्री. आदेश पांडूरंग बनकर

संचालक मासिक माळी आवाज, पुणे
अध्यक्ष, विश्वदीप सोशल फाऊंडेशन

संत सावतामाळी सुपर मार्केट

मो.: ९६६५२५३४४८, ९१३०२२१७४८
ईमेल - maliawajnk@gmail.com

मु. पो. निमगांव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे

अस्वस्थ

या सांजसमयी
अस्वस्थ करत रहातात
अनेक क्षण
आणि
जीवलगांना दुरावल्याच्या आठवणी.
काहीही परत मिळवता येतं
पण
गेलेले क्षण नाही मिळत परत.

चिमुकल्या बोटाला धरुन
ज्यांनी चालायला शिकवलं
ती माणसं कुठे गायब होतात
अचानकच
आणि
तरीही आपण चालत रहातो
अजगरासारखी विस्तीर्ण वाट.

एखादी धुसर संध्याकाळ
मात्र
तेवत ठेवते आपल्या मनात
जीवलगांच्या आठवणी
अगदी ठळकपणे.

अशावेळी मन मात्र
मोजत रहातं
एकेक ठसे
विरत चाललेले.

नवीन ठसे
नकोसे वाटताहेत हल्ली.
न जाणो कधी गायब होतील ते
आणि
परत ही संध्याकाळ
अधिकच एकाकी होईल!

- डॉ.ज्योती कदम

माणसातली आर्द्रता हरवतेय...!



डॉ. अभिनय दरवडे
सुप्रसिध्द बालरोगतज्ञ, व्याख्याते, समुपदेशक,
अध्यक्ष, प्रबोधन फाऊंडेशन,
संचालक, संगोपन बालरुग्णालय, धुळे
मो.: ९९७०८४२१५०

मला हे नेहमी जाणवत राहतं की, आजकाल माणसं फार शुष्क झाली आहेत. त्यांच्या मनातल्या संवेदनांची आर्द्रता कमी झाली आहे. जाणिवा बोथट झाल्या आहेत, विरोध टोकदार झाला आहे, राग अनावर झाला आहे आणि तिरस्काराने पराकोटीची सीमा गाठली आहे. दुसऱ्याच्या दुःखाबद्दल वाटणारी कणव कुठेतरी हरवत चालली आहे. दुसऱ्यासाठी क्षणभर थांबणं, त्याचं शांतपणे ऐकून घेणं आणि त्याला समजून घेणं या साध्या गोष्टीही आजकाल अवघड वाटू लागल्या आहेत.

नात्यांमध्ये आपलेपणापेक्षा व्यवहार वाढला, मैत्रीत सहजतेपेक्षा अपेक्षा वाढल्या आणि माणसा माणसांमधली उब हळूहळू कमी होत गेली. संवाद सुरू आहेत, संपर्क वाढले आहेत, आभासी जगात हजारो माणसं आपल्या भोवती आहेत; पण मन मोकळं करून बोलता येईल, दुःख सांगताना शब्दांची जुळवाजुळव करावी लागणार नाही आणि आनंद व्यक्त करताना तुलना केली जाणार नाही, अशी माणसं मात्र दुर्मीळ होत चालली आहेत.

कदाचित आपल्या भोवतालापेक्षा आपणच आपल्या आतल्या जगापासून दूर गेलो आहोत.

सततची स्पर्धा, अपेक्षांचं ओझं, भविष्याची असुरक्षितता आणि स्वतःला सिद्ध करण्याची अखंड धावपळ... या सगळ्यांनी आपल्या मनावर एक अदृश्य थकवा साचत गेला आहे. प्रत्येकाला कुणापेक्षा तरी पुढे जायचं आहे, स्वतःचं श्रेष्ठत्व सिद्ध करायचं आहे, आपलं म्हणणं खरं ठरवायचं आहे. या प्रवासात दुसऱ्याच्या भावना समजून घेण्यासाठी लागणारा संयम आणि स्वतःच्या चुका स्वीकारण्यासाठी लागणारा मोठेपणा आपण हरवत चाललो आहोत.

मग जगातलं सौंदर्य दिसेनासं होतं. दुसऱ्याचं यश आनंद देण्याऐवजी अस्वस्थ करतं. एखाद्याची चूक झाली की त्याला सावरण्याऐवजी त्यावर बोट ठेवण्याची घाई होते. मतभेदांचं रूपांतर मनभेदांत होतं आणि मनभेदांचं रूपांतर कधी टोकाच्या तिरस्कारात होतं, हे कळतही नाही.

आपण माणसांना समजून घेण्यापेक्षा त्यांच्याबद्दल निर्णय देण्यात अधिक वेळ घालवू लागलो आहोत.

स्वतःपुरतं जगणाऱ्या माणसांच्या गर्दीत मैत्रीचा निखळपणा कमी होत आहे. स्वार्थ, अपेक्षा आणि स्वतःपुरतं ओरबाडून घेण्याची वृत्ती अधिक ठळक होत आहे. माणूस दुसऱ्या माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याऐवजी त्याचा उपयोग काय, फायदा काय, आपल्याला त्याच्याकडून काय मिळेल, या हिशेबातून पाहू लागला तर नात्यांचा आत्माच हरवतो.

आणि हे सारं आपल्या डोळ्यांदेखत घडत आहे.

पण या वास्तवाकडे पाहताना केवळ खंत व्यक्त करून चालणार नाही. कारण या परिस्थितीचा भाग

आपणही आहोत. समाज बदलावा, माणसं बदलावी, संवेदनशीलता वाढावी, अशी अपेक्षा करताना आपण स्वतः किती संवेदनशील आहोत, हा प्रश्नही स्वतःला विचारायला हवा.

एखाद्याचं बोलणं पूर्ण होण्याआधी आपण त्याला तोडतो का? दुसऱ्याच्या अडचणी ऐकताना आपण खरंच समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? एखादी व्यक्ती आपल्या मताशी सहमत नसली, तरी तिच्याविषयी आदर राखू शकतो का? कुणी अडचणीत असताना आपल्या सोयीचा थोडासा वेळ बाजूला ठेवून त्याच्यासाठी उभं राहू शकतो का?

या प्रश्नांची उत्तरं कदाचित आपल्याला अस्वस्थ करतील; पण परिवर्तनाची सुरुवात नेहमी स्वतःपासूनच होते.

माणुसकी जपण्यासाठी फार मोठ्या गोष्टी कराव्या लागतात असं नाही. कधी एखाद्याची विचारपूस करणारा फोन, निराश झालेल्या व्यक्तीला दिलेला धीर, चूक झालेल्या माणसाला सुधारण्याची दिलेली संधी, वृद्ध आई-वडिलांसोबत घालवलेला निवांत वेळ, मुलांचं निःशर्त ऐकून घेणं किंवा संकटात सापडलेल्या अनोळखी व्यक्तीला केलेली छोटीशी मदत... या साध्या कृतींमधूनच माणुसकीचा झरा वाहत राहतो.

आपण प्रत्येक वेळी बरोबरच असलं पाहिजे असं नाही; कधी नातं टिकवण्यासाठी समोरच्याला समजून घेणं अधिक महत्त्वाचं असतं. प्रत्येक वाद जिंकणं गरजेचं नसतं; काही वेळा शांत राहून नातं जपणं हीच खरी जिंकलेली बाजी असते. प्रत्येकाला बदलण्याची जबाबदारी आपली नसते; पण आपल्या वागण्यामुळे कुणाच्या मनाला अनावश्यक वेदना होऊ नयेत, एवढी काळजी आपण नक्की घेऊ शकतो.

आता दिवाळी जवळ आली आहे. घराघरांत स्वच्छता सुरू होईल, अंगणात रांगोळ्या उमटतील, पणत्या उजळतील, आकाशकंदील झळकतील आणि फराळाच्या सुगंधाने घरं भरून जातील. आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील, शुभेच्छांची देवाणघेवाण होईल. अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करताना आपल्या मनातही एक प्रश्न उजळायला हवाङ्कआपल्या अंतर्मनात साचलेल्या अंधाराचं काय?

घराच्या कोपऱ्याकोपऱ्यांत साचलेली धूळ आपण सहज झटकतो; मग मनात साचलेला राग, मत्सर, अहंकार आणि तिरस्कार झटकून टाकणं इतकं अवघड का वाटतं? घराच्या उंबरठ्यावर पणत्या लावताना आपल्या नात्यांच्या उंबरठ्यावरही एखादी पणती लावता येईल का? दुरावलेल्या माणसाशी पुन्हा संवाद साधता येईल का? गैरसमजांच्या भिंती थोड्या कमी करता येतील का? एखाद्याच्या दुःखात त्याला उपदेश करण्याऐवजी त्याचं शांतपणे ऐकून घेता येईल का?

मला वाटतं, दिवाळीचा खरा अर्थ याच छोट्या कृतींमध्ये दडलेला आहे. कारण दिवाळी केवळ घरं उजळवण्याचा सण नाही; ती मनं उजळवण्याची, नाती जपण्याची आणि माणसामाणसांमधला अंधार दूर करण्याची संधीही आहे.

एखाद्याच्या आयुष्यात आनंद आणण्यासाठी मोठं काही करण्याची गरज नसते. कधी आपुलकीचा एक शब्द, काळजीने केलेली विचारपूस किंवा मदतीसाठी पुढे केलेला हातही पुरेसा असतो. आपल्या छोट्याशा कृतीने कुणाच्या मनात आशेचा प्रकाश उजळत असेल, तर त्याहून सुंदर दिवाळी कोणती?

आपण यशाच्या शर्यतीत किती पुढे गेलो, किती संपत्ती मिळवली, किती प्रतिष्ठा कमावली, याला आयुष्यात महत्त्व आहेच; पण आपल्या सहवासात किती माणसांना आपलेपणाची ऊब मिळाली, किती जणांना आपण समजून घेतलं आणि किती दुःखी मनांना आधार दिला, याचंही मोल कमी नाही.

कदाचित जग बदलण्याची सुरुवात एखाद्या मोठ्या क्रांतीने होणार नाही. ती एखाद्या माणसाच्या बदललेल्या दृष्टिकोनातून होईल. आपण थोडे अधिक सहृदय झालो, थोडे अधिक संयमी झालो, दुसऱ्याचं दुःख समजून घेण्याइतके संवेदनशील झालो, तर आपल्या भोवतालचं जग नक्कीच थोडं अधिक सुंदर होईल.

या दिवाळीत घराघरांत पणत्या उजळू देत; पण त्यांचा प्रकाश आपल्या मनापर्यंतही पोहोचू दे. संवेदनांची आर्द्रता पुन्हा जागी होऊ दे, नात्यांमध्ये आपलेपणा फुलू दे आणि प्रत्येक माणसाला दुसऱ्या माणसात माणूस दिसू दे. यशाच्या धडपडीत माणूसपण हरवू नये, स्वाभिमान जपताना माणुसकी सुटू नये आणि मतभेदांच्या गर्दीत एकमेकांबद्दलचा आदर हरवू नये, एवढं जरी आपण साधू शकलो, तरी या दिवाळीचा प्रकाश खऱ्या अर्थाने आपल्या जगण्यात उतरेल.

शेवटी, आयुष्य किती मोठं जगलो यापेक्षा आपल्या सहवासात किती माणसांना आपलेपणाचा अनुभव आला, हेच अधिक महत्त्वाचं आहे. दिवाळीच्या प्रकाशपर्वात आपल्या मनातली आर्द्रता पुन्हा जागी होवो, संवेदनांना नवी पालवी फुटो आणि माणुसकीचा हा दिवा प्रत्येकाच्या अंतःकरणात अखंड तेवत राहो, हीच मनापासून इच्छा.

सर्वांना प्रेम, आपुलकी आणि माणुसकीच्या प्रकाशाने
उजळलेल्या दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

माझी माणसे

आजी-आजोबांनी दिला
खानदानाचा संपन्न वारसा
आई-बाबांनीही दाखवला
संस्कारांचा निमळ आरसा

दादा वहिनी आदर्श आमचे
राखतो आम्ही सर्वांचा मान
वरिष्ठांचाही करूनी सन्मान
परिवाराची वाढवतोच शान

आई-बाबांनी दाखवले जग
माझे घर स्वर्गाहूनी ही भारी
परिवार नांदतो खेळीमेळीने
नंदनवनच फुलले जणू दारी

भांडणाचा ना लवलेश कधी
गोकुळ नांदतेय सदा घरात
एकमेकांच्या शब्दाला मानून
आनंद खेळतोय पहा दारात

परमेश्वर देखील सुखावलाय
सुखी परिवार आमचा पाहून
धनधान्याची भरूनी कोठारे
धनलक्ष्मी वसली घरी राहून

दृष्ट नको कुणाची लागायला
माझ्या या सुखी परिवाराला
हेचि मागणे करतो परमेश्वरा
सुखाची भरभराट या घराला

गृहलक्ष्मीचा होतोय घरीदारी
धनलक्ष्मीसम आदर सन्मान
दारी आला याचक सुखावतो
कुणाचा होत नाही अपमान

– सौ. भारती सावंत
खारघर, नवी मुंबई
M.: 9653445835



बदलती खेडी, बदलता देश.

गोविंद बभुता मोरे
सेवानिवृत्त मुख्याध्यापक,
मविप्र समाज, नाशिक.

गांधीजी म्हणायचे, 'माझा भारत हा शहरात राहत नसून खऱ्या अर्थाने खेड्यात राहतो. खेडी सुधारली, खेडी स्वयंपूर्ण झाली तर देश सुधारेल, देश स्वयंपूर्ण होईल.' 'माझ्या स्वप्नातील भारत' या पुस्तकात गांधीजींनी रामराज्याची कल्पना मांडली आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात खेडी स्वयंपूर्ण व्हायला हवीत. अस्पृश्यता हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे आणि तो दूर व्हायलाच हवा असे त्यांचे मत होते. Back to nature या उक्तीप्रमाणे Back to Village हे त्यांचे मिशन होते. गांधीजी हे दूरगामी विचार करणारे द्रष्टे होते याची प्रचिती आज आपल्याला येते आहे. गांधीजींच्या काही धोरणांच्या बाबतीत लोकांमध्ये मतभेद असू शकतात पण ग्रामीण भागाविषयीचे त्यांचे विचार आजही प्रेरणादायी वाटतात.

भारत स्वतंत्र झाला आणि भारतात औद्योगिकरणाचे वारे वाहू लागले. रोजगारासाठी लोकांचा ओघ शहराकडे वाढू लागला. शहरे फुगत गेली आणि खेडी ओस पडत गेली. भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण अभिमानाने म्हणतो. परंतु शेती सुधारण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सुरूवातीच्या काळात म्हणावे असे प्रयत्न झाले नाहीत. १९५४ चा माझा जन्म आहे. लहानपण, शिक्षण आणि नोकरीसाठीचे माझे वास्तव्य खेडेगावातच जास्त राहीले आहे. शेतकरी कुटुंबात जन्माला आलो म्हणून शेती आणि शेतकरी यांचे जीवन मी खुप जवळून पाहिले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवन किती हलाखीचे होते याचा अनुभव मी घेतला आहे. ग्रामीण भागातील महिलेला सोसावा लागणारा त्रास मी डोळ्यांनी पाहिला आहे. दुष्काळ हा शब्द आज परोपरी आपल्या कानावर पडत असतो. पण खरा दुष्काळ कसा असतो त्याचे चटके माझ्या पिढीतील लोकांनी सोसले आहेत. दुष्काळ आजही पडतात पण म्हणून आज कुणी उपाशी राहत नाहीत. ७२ च्या दुष्काळात किती तरी दिवस महीने आम्ही गव्हाची चपाती, तांदळाचा भात आणि साखरेच्या गोड पदार्थांसाठी आम्ही तरसलो आहोत हे आजच्या पिढीला खरे वाटणार नाही. खेड्यात एक दोन धनिक माणसं सोडली तर बाकीचे बहुसंख्य दारिदयात खितपत पडलेले दिसायचे. जिराईत शेती भरपूर पण उत्पन्न अत्यल्प असायचे. या वर्षाच्या कमाईचा मेळ पुढच्या वर्षाशी बसायचा नाही. सावकारी पाश आवळले जायचे. पोटाची खळगी भरण्यासाठी शेती सावकाराकडे गहाण ठेवली जायची जी शेतकऱ्यांना कधीच सोडविता यायची नाही. मला आठवतंय आमच्या घरी तांब्याच्या मोठ्या डेंगी, बघोणे, हंडे गुंडे होते. सोसायटीचे कर्ज फेडण्यासाठी विडिलांनी ते धुळे येथील सावकाराकडे गहाण ठेवले. परत ही भांडी आम्हाला कधीच पहायला मिळाली नाहीत. शेतकरी कायम कर्जबाजारी असायचा. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी स्वतः उपाशी राहून शेतात घाम गाळायचा.

१९७२ च्या दुष्काळाने आपल्याला बरेच काही शिकवले. त्यावर्षी पाऊस झाला नाही. गावातील ठराविक लोकांकडेच विहीर मळा असायचा. जास्तीत जास्त शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असायची. ७२ च्या दुष्काळात प्यायला पाणी होते पण खायला अन्न

नव्हते. सरकारकडे अन्नधान्याचा साठा नव्हता. आयात केलेली आणि रेशन दुकानात मिळणारी लाल रंगाची निकृष्ट मिलो ज्वारी आम्ही काही महिने खाल्ली. रोजगार हमी योजनेत कामाचा मोबदला म्हणून कुपनं मिळायची. हे कुपन दाखवून रेशन दुकानात मिलो ज्वारी मिळायची. गहू, तांदूळ तर दूरच पण बाजरीची भाकरही त्याकाळात मिळत नव्हती. श्रीमंत घरातील महिला पुरुषही रोजगार हमीच्या कामाला खड्डे खोदण्यासाठी जायचे. अशा कठीण परिस्थितीतही सरकारने फुकट कुणाला काही दिले नाही ही चांगली गोष्ट केली. फुकट काही मिळाले तर त्याची लोकांना किंमत नसते, लोक निष्क्रिय बनतात. त्याचा अनुभव आज आपण घेत आहोत.

१९७२ च्या दुष्काळात लोकांच्या हाताला काम मिळावे म्हणून रोजगार हमीची कामे सुरू झाली. त्यातून अनेक गावांमध्ये छोटे छोटे बंधारे तयार झाले. जमीनीत पाणी जिरवण्यासाठी हे बंधारे पुढे अतीशय उपयुक्त शाबीत झाले. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याची गरज निर्माण झाली. प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारताला अन्नधान्यासाठी कायम दुसऱ्या देशांकडे भिकेची झोळी घेऊन जाणे ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट होती. स्वामीनाथन सारख्या कृषी तज्ज्ञांनी जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाणांची निर्मिती केली व हायब्रीड बियाण्यांचा शोध लावला. नवीन बियाणे आणि रासायनिक खतांचा वापर यामुळे शेतीत एक प्रकारे हरीत क्रांती झाली. शेती उत्पन्नात वाढ होवून हळूहळू देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होत गेला. केवळ शेती करून शेतकरी सुधारणार नाही हे शरद पवार सारख्या जाणत्या नेत्यांना जाणवले होते. त्यासाठी जोडधंदा म्हणून पशुपालनावर ग्रामीण भागात जोर देण्यात आला आणि देशात दुग्धव्यवसाय भरभराटीस आला. हरीत क्रांतीच्या पाठोपाठ देशात धवल क्रांती झाली. शरद पवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी फळबाग लागवडीस जास्त प्रोत्साहन दिले. शेतीपूरक जोड उद्योगांना अनुदान देवून त्यांनी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले.

ऐंशीच्या दशकात शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांची चळवळ जोरात होती. शरद जोशी हे अर्थतज्ञ होते. आंबेगाव येथील अंगार मळ्यात त्यांनी शेतीवर अनेक प्रयोग केले. शेतकरी लोकांच्या हलाखीच्या परिस्थितीला केवळ अस्मानी संकट कारणीभूत नाही तर सुलतानी दुजाभावही तेवढाच कारणीभूत आहे हे त्यांनी सप्रमाण लोकांच्या लक्षात आणून दिले. शेतकऱ्यांना आपल्या हक्कासाठी जागरूक करण्याचे काम शेतकरी संघटनेने केले. 'भीक नको हवेत घामाचे दाम' असे त्यांनी सरकारला ठणकावून सांगितले. इतरांना शेतमाल स्वस्तात मिळावा म्हणून सरकार शेतकऱ्यांच्या मालाला जाणीवपूर्वक कमी भाव देतो असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. शेती हा सुद्धा एक उद्योग आहे आणि या उद्योगालाही हमीभाव आणि नफा मिळायला हवा असे त्यांचे म्हणणे होते. शेतकरी जागरूक झाले. शरद पवार साहेबांनी शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेला पाठबळ दिले. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचा राजकीय लाभ सर्वाधिक प्रमाणात शरद पवार साहेबांना झाला. यानंतर शासनही शेतकरी कल्याणाच्या योजना राबवू लागले. अनुदानाच्या स्वरूपात शासन शेतकऱ्यांना मदत करू लागले. शेती हा सर्वात प्राथमिक असा उत्पादक घटक आहे. अर्थसंकल्पात शेतकरी केंद्रीभूत राहू लागला. 'शेतकरी सुखी तर जग सुखी' ही धारणा लोकांना पटू लागली. ऐंशीच्या दशकानंतर शेतकऱ्यांचे जीवनमान हळूहळू उंचावत गेले.

पूर्वी गावात बलुतेदारी पद्धत होती. शेतकरी आपल्या शेतात जे पिकवतो त्यातील काही हिस्सा तो या बलुतेदारांना द्यायचा. सुतार, लोहार, ,सोनार , कुंभार, न्हावी , कोळी ,मांग , चांभार हे सर्व गावगाड्याचे घटक होते. बलुतेदार हे एक प्रकारचे कुशल कारागीर होते. शेतकऱ्यांना लागणाऱ्या सर्व सुविधा ते कोणतीही रोख रक्कम न घेता पुरवायचे. शेतकरी हा त्यांचा ' आसामी ' असायचा. शेतपिकाचा ठराविक हिस्सा किंवा धान्य बलुतेदाराला मिळायचे. एकप्रकारे खेडी स्वयंपूर्ण होती. न्यायनिवाडा गावातच केला जायचा. वृद्ध वयस्कर जाणकार व्यक्तींना गावात मान असायचा. अशा लोकांचा गावावर वचक असायचा. शासनकर्ते कोण आहेत याच्याशी गावातील लोकांना काही देणेघेणे नसायचे. पण जिथे शेतकऱ्यांनाच नीट पिकायचे नाही तिथे बारा बलुतेदारांचे काय? बरं या बलुतेदारांना सन्मानाची वागणूक तरी मिळत होती का? तर तसेही नाही. प्रसिद्ध लेखक आणि समाजसेवक अनील अवचट यांनी बलुतेदारांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक खेडी पायाखाली घातली. शेकडो बलुतेदारांच्या मुलाखती घेतल्या. बारा बलुतेदारांच्या समस्या जाणून घेतल्या. गावगाड्यात बलुतेदारांची स्थिती हलाखीची होती. गावावर तेथील जमीनदार, सावकार यांचे वर्चस्व असायचे. त्यांच्या पुढे जायची कुणाची हिंमत नसायची. मिळेल त्या अल्प मोबदल्यात बलुतेदारांना काम करावे लागायचे. शेतकऱ्यालाही छळणारे काही गावगाड्यातील तर काही शासनाचे प्रतिनिधी होते. जातीभेद तिव्र होते. जाती आणि पोटजाती यांमध्येही उच्च निचतेची उतरंड होती. गावात अस्पृश्य आणि बलूतेदारांची वस्ती गावाबाहेर परीघावर असायची. पंगतीभेद केला जायचा. श्रमीकांनी पिकवलेले अन्नधान्य यांना खायला चालायचे पण त्यांना आपल्या पंगतीत बसवून घ्यायला श्रीमंतांना कमीपणा वाटायचा. पिढ्यानपिढ्या चालत आलेली हीच पद्धत रूढ मानून कुणीही तक्रार करत नसे. गरजा खुप कमी असल्याने अशाही परिस्थितीत सुख मानणारी ती पिढी होती. प्रत्येकाला एकमेकांची गरज असल्याने सर्व जण एकमेकांना धरून चालायचे. कुणी कोणत्याही जाती धर्माचा असो, एकमेकांशी प्रेमाचे नाते मानून एकमेकांचा आदर करायचे. ऐंशी नव्वदच्या दशकापर्यंत बलुतेदारी पद्धत टिकून होती.

हळूहळू बदल होत गेला. बलुतेदारी पद्धत बंद होत गेली. लोकशाही पद्धतीत प्रत्येक मताला सारखीच किंमत असल्याने दबले गेलेले सर्व घटक राजकीयदृष्ट्या सजग झाले. शहरातील झगमगाट आणि जातीभेद विरहीत मुक्त स्वातंत्र्य गरीब लोकांना आकर्षित करू लागले. बलुतेदारांनी आपली पारंपरिक बलुतेदारी आणि गावातील धनिक लोकांचे वर्चस्व झुगारून लावले. लोक कायद्याची भाषा बोलू लागले. कोणीही कोणताही व्यवसाय करू लागले. 'रोख भाई ठोक' असा व्यवहार सुरू झाला. सत्तेचे विकेंद्रीकरण केले गेले. ग्रामपंचायत आणि ग्रामपालिकांना काही अधिकार प्राप्त झाले. शैक्षणिक आरक्षणाबरोबरच राजकीय आरक्षणाचा लाभ गावातील गरीब अस्पृश्य समाजालाही मिळू लागला. अस्पृश्यांविरूद्ध अत्याचार करणाऱ्यांना कडक शासन करता येईल असे कायदे बनवण्यात आले. पंचायत राजमध्ये महिलांनाही आरक्षण मिळाले. या सगळ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम असा झाला की गावा गावातील अस्पृश्यता कमी होत गेली. गावातील सर्व घटक हळूहळू समाज प्रवाहात एक होत गेले. बेटी व्यवहार नाही पण रोटी व्यवहार सुरू झाला.

धुळे तालुक्यातील चौगाव , बागलाण तालुक्यातील

मोराणे सांडस, चांदवड तालुक्यातील निमोण या गावांमध्ये माझे दीर्घ वास्तव्य राहीले आहे. गेल्या ३६ वर्षांपासून मी सिन्नर गावात राहत आहे. सिन्नर तालुक्यातील मनेगाव , नायगाव ,वडांगळी ,सोनांबे , सिन्नर येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शाळांमध्ये मी नोकरी केली आहे. माझे सर्व नातेवाईक, मित्र मंडळ खेड्यात राहणारे असल्याने ग्रामीण भागाशी माझी नाळ जोडलेली आहे. ग्रामीण भागातील बदलत्या गोष्टींचा मी साक्षीदार आहे.ज्या काळात बैलगाडी, छकडा गाडी शिवाय गावात दुसरे वाहन नसायचे , गावात वीज नव्हती. टीव्ही नव्हते की मोबाईल नव्हते त्या काळात खेड्यातील साध्या धाब्याच्या घरात मी लहानाचा मोठा झालो. माझ्या पिढीची माणसं एवढ्यासाठी भाग्यवान आहेत की त्यांनी ग्रामीण भागातील अत्यंत साधे अप्रगत असे जीवनही पाहीले आणि मोबाईल, एआयच्या जमान्यातील प्रगत जीवनही पाहत आहेत. ज्या गावात साधी चहाची टपरी नव्हती त्यां गावात आता मोठमोठे मॉल उभे राहताना दिसत आहेत.

ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाचा विचार करतांना मोट नाडा विहीर मळा येथपासून सुरू झालेली शेती ते आज ट्रॅक्टर यंत्रांमार्फत केली जाणारी शेती येथपर्यंतचा आलेख डोळ्यांसमोर उभा राहतो. झोपडीतून मातीच्या धाबे असलेल्या घरात आणि धाब्याच्या घरातून सिमेंट काँक्रेटच्या घरात झालेला प्रवास मी अनुभवला आहे. सायकलीसाठी जीव तीळ तीळ तुटायचा पण अकरावी होईपर्यंत सायकल मिळालीच नाही. चार चार किलोमीटर पायी चालत जात शाळा शिकावी लागली. ही गोष्ट केवळ माझी एकट्याची नाही तर त्या काळातील सर्व ग्रामीण भागातील मुलांची होती. आज विमानातून प्रवास करणेही फार कौतुकाचे राहीले नाही. एवढ्या दहा वीस वर्षात खेड्यापाड्यांचा झालेला विकास ही एक दखल घेण्यासारखी गोष्ट आहे.

एकवेळ शेती ही पूर्णपणे शेतकरी, शेतमजूर आणि बैलजोडी यांच्या कष्टांवर अवलंबून होती. घरातील लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वचजण शेतीकामात मदत करायचे. अडजी पडजी करून शेतीकाम उरकले जायचे. ज्यांच्याकडे शेती नाही ते शेतमजूर म्हणून काम करायचे. वर्षाच्या कराराने काम करणारे सालदार असायचे. हळूहळू ही परिस्थिती बदलत गेली. शेतकरी शेतमजुरांची पोरं शिकली व शहरात नोकरीला लागली. थोडाफार पैशांचा ओघ खेड्याकडे येवू लागला. शेती परवडत नव्हती ,चार पैसे गाठीला राहत नव्हते. कधी काळी उत्तम शेती मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी असे म्हटले जायचे. पण आता शेती तिसऱ्या स्थानावर म्हणजे निकृष्ट मानली जावू लागली होती. लोकांमध्ये नोकरीचे आकर्षण वाढले . त्यासाठी शिक्षण घेण्याकडे कल वाढला. खेड्यातील मुले शिकून मोठमोठ्या अधिकार पदावर जावू लागली तसतशी खेडी सुधारत गेली. शिक्षण ही केवळ उच्चभ्रू लोकांची मक्तेदारी राहिली नाही. बुद्धीमत्ता फक्त शहरातच नाही तर ती खेड्यातही आहे हे खेड्यातील मुलांनी सिद्ध करून दाखवले. खेड्यांचा विकास होण्यात शिक्षणाचा मोठा हातभार आहे हे कोणीही मान्य करेल.

पारंपरिक पद्धतीने शेती करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्याकडे शेतकरी वळू लागले तसतशी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलू लागली. भरड धान्य पिकविण्यापेक्षा नगदी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत गेला. ज्यांच्याकडे बागायती शेती होती त्यांनी ऊस आणि साखर उद्योग

यातून आर्थिक सुबत्ता प्राप्त केली. पश्चिम महाराष्ट्र याबाबतीत पुढे होता. निफाड , सांगली, सातारा हा भाग द्राक्ष उत्पादनात आघाडीवर होता. बागायती भागातील शेतकरी सधन झाले. नंतर सिंचनाच्या सोयी वाढल्या. जलसंधारणाची कामे झाली. पीव्हीसी पाईप आणि ठिबक सिंचनाद्वारे कमी पाण्यात उत्पादन घेणे शक्य होवू लागले. डाळींब, पेरू , पपई, शेवगा यांची शेती शेतकरी करू लागला. कांदा, सोयाबीन, मका यांची लागवड वाढू लागली. फळपीक घेण्यात कष्ट कमी, मजूर कमी आणि पैसे जास्त अशी स्थिती झाली. ताजा पैसा हाती मिळतो म्हणून भाजीपाला घेण्यात काहींनी आघाडी घेतली. नवीन प्रकारच्या बियाणांमुळे शेतीची उत्पादनक्षमता वाढली. शेतकऱ्यांच्या खिशात पैसा खेळू लागला. त्यामुळे खेडी विकसित होत गेली.

'गरज ही शोधांची जननी असते' ही म्हण शेतीक्षेत्रालाही लागू पडते. सरकारच्या मोफत योजनांचा फटका शेती व्यवसायाला बसला. मोफत रेशन आणि मोफत वैद्यकीय सुविधा यामुळे मजूर कष्टाच्या कामाला नाही म्हणू लागला. सगळेच लाडके झाल्यावर काम करायचं कुणी ? सत्ता मिळवण्यासाठी व मतदारांना आकर्षित करण्यासाठी वारेमाप मोफत योजनांचा पाऊस पडू लागला. गरीबांना जगण्याची हमी मिळाली ही गोष्ट खरी असली तरी माणसांची काम करण्याची सवय कमी झाली हा तोटाच आहे. मोफत योजनांमुळे शेती कामाला मजूर मिळेनासे झाले. त्यामुळे यांत्रिक शेती ही शेतकऱ्यांची गरज झाली. सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानांमुळे ग्रामीण भागात ट्रॅक्टर आणि शेती औजारे वाढली. यांत्रिक पद्धतीने शेती करण्यास सुरुवात झाली आणि शेतकऱ्यांचे कष्ट कमी झाले. यांत्रिक शेती आणि फळबागा यांमुळे खरे सुख कुणाला मिळाले असेल तर ते ग्रामीण भागातील महीलांना. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा अवलंब वाढला. महिलांचे जात्यावरचे दळण दळणे बंद झाले, पाणी शेंदून आणने संपले. खळ्यांवरचे काम राहीले नाही की चुल्हा फुंकत धूर सहन करत स्वयंपाक करणे राहीले नाही. यांत्रिकीकरणामुळे महिलांचे शेतात आणि खळ्यात जाणे कमी झाले. चकचकीत घरांमुळे सारवणे पोचारणे राहीले नाही. घरोघरी गॅस आल्यामुळे धुराचा त्रास राहीला नाही.

पूर्वी गाव तिथे हागणखडी असायची. गावापर्यंत जायचा रस्ता धड नसायचा. गावात बोटावर मोजता येतील एवढ्याच लोकांकडे काही तरी वाहनं असायची. शिक्षण असो की आरोग्य, प्रत्येक गोष्टीसाठी शहराकडे धाव घ्यावी लागायची. राजकारणी लोक फक्त शहरांचा विकास करायचे आणि पाच वर्षांतून मते मागण्यासाठी तेवढे गावात यायचे. यांतून एक वेळ अशी आली की शहरं फुगत गेली आणि खेडी ओस पडायला लागली होती. पण आता परिस्थिती बदलली आहे. खेड्यांतूनही नेतृत्व करणारी माणसं पुढे येवू लागली. विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून निवडणुका लढवल्या जावू लागल्या. एका बाजूला शहरं वाढत्या लोकसंख्येमुळे बकाल होत गेली तर दुसऱ्या बाजूला खेडी विकसित होत गेली.

खेड्यातील लोकांचे राहणीमान आता पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने अधिक उंचावले आहे हे आपण मान्य करायलाच हवे. गल्ली गल्लीतून वाहणाऱ्या गटारी आता खेड्यात दिसत नाहीत. खेड्यातही गटारीची कामे झाली आणि रस्ते काँक्रेटचे झाले. कौलारू घरे आणि धाब्याची घरे जावून सिमेंट काँक्रेटची घरे खेड्यातही दिमाखात उभे राहतांना दिसू लागली. हागणदारी गावागावातून हद्दपार झाली. ज्यांना गावात मोकळी जागा कमी होती त्यांनी आपापल्या शेतात ऐसपैस मोठमोठी घरे बांधली.

शहरातील खुराड्यांसारख्या फ्लॅटमधे राहणाऱ्यांपेक्षा खेड्यातील आणि शेतातील पर्यावरणपूरक घरात राहणारी माणसं जास्त आरोग्यदायी जीवन जगतात असे मला वाटते. कष्ट आणि जिद्द प्रत्येक क्षेत्रात प्रगतीसाठी आवश्यक असतात. याच गुणांच्या जोरावर शिकलेल्या आणि नोकरी करणाऱ्यांपेक्षाही कमी शिक्षण घेतलेले ग्रामीण भागातील काही शेतकरी मुले जास्त पैसे कमावतांना आपल्याला पहावयास मिळतात. जुन्या चित्रपटात दाखवतात तसा आजचा शेतकरी हा भोळा भाबडा राहीलेला नाही. आजच्या शेतकऱ्यांने शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. बाजारपेठेचा अभ्यास करून तो आता आपल्या पीक पद्धतीत बदल करत असतो. शेती ही कष्ट करणाऱ्यांची आहे. उंटावरून शेळ्या हाकणाऱ्यांची नाही.

आताचे शेतकरी शेती ही व्यापारी पद्धतीने करायला लागले आहेत. नफा तोट्याचा ताळेबंद त्याला मांडता येवू लागला आहे. कमी क्षेत्रात आणि कमी पाण्यात जास्त पीक घेण्याची कला शेतकरी आत्मसात करतो आहे. शेती बरोबरच शेतीला पूरक असे जोड व्यवसाय शेतकऱ्यांची मुले करू लागली आहेत. उठसूठ शहराकडे धाव घेण्याची आता आवश्यकता राहीली नाही. शेतीला लागणारी औषधे, रासायनिक खते, बी बियाणे, पाईप, हार्डवेअरची दुकाने आता खेड्यांच्या वेशीवर विराजमान झाली आहेत. शहरातल्या सर्व सुविधा आता खेड्यातच उपलब्ध आहेत. देशातील कानाकोपऱ्यात कुठेही जा, तिथे सिमेंट काँक्रेटच्या रस्त्यांची कामे चालू आहेत. सहलीच्या निमित्ताने माझे भारतभर फिरणे झाले आहे. जम्मू काश्मीर, लेह लडाखच्या पहाडी भागापासून ते कन्याकुमारी पर्यंत रस्त्यांचे जाळे विणले जात आहे. आता खेड्यापाड्यातही ट्रॅक्टर आणि वाहनांची संख्या इतकी वाढली आहेत की काहींच्या घरांपुढे वाहने उभी करायला जागा अपुरी पडते. विकासाच्या बाबतीत काही भाग पुढे आहेत, काही मागे आहेत. पण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची वाटचाल विकासाच्या दिशेने होत आहे हे नक्की.

गावपाड्यांत आणि घराघरात आता वीज पोहोचली आहे. नळपाणी पुरवठा योजना गावागावात आहेत. चूल आणि स्टोव्हची जागा आता गॅस सिलिंडरने घेतली आहे. बैल गेले आणि बैलगाडीही गेली. काही दिवसांत बैल आणि बैलगाडी आपल्याला पाहायलाही मिळणार नाही. गावठी गायी गेल्या आणि जास्त दूध देणाऱ्या जर्सी गाई आल्या. आता प्रत्येकाकडे काही ना काही वाहन आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आणि बुडाशी वाहन आहे. ग्रामसफाई करणारा कामगारही बुलेट मोटरसायकल वरून झाडू घेऊन फिरताना आपल्याला दिसतो. खेड्यातील प्रत्येक घरात आता आपल्याला टीव्ही दिसतो, फ्रीज दिसतो. पूर्वी ज्या सुविधा केवळ शहरातील नोकरदार लोकांच्या घरी दिसायच्या त्या सर्व सुविधा आता बहुतेक शेतकऱ्यांच्या घरांमधे पहायला मिळतात. पूर्वीच्या राजेरजवाड्यांच्या नशीबी ज्या सुविधा नव्हत्या त्या सोयी सुविधा आजच्या गरीब शेतकऱ्यांच्या घरी पहायला मिळतात. वारा घालायला पंखा आहे. करमणुकीला टीव्ही आहे आणि जगाच्या कानाकोपऱ्यातील खबर क्षणात देणारा मोबाईल आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दात थोडा बदल करून म्हणावेसे वाटते...

राजास जी महाली
सौख्ये कधी न मिळाली
ती सर्व प्राप्त झाली
साध्या घरात माझ्या.....

विज्ञानात एक तत्व सांगितले जाते 'All properties are periodic ' अर्थात निसर्गात सर्व घटना चक्राकार गतीने घडत असतात. मागच्या काही काळात शेतीला खरंच वाईट दिवस होते. शेतीला कनिष्ठ मानून लोक नोकरीकडे धाव घेत होते. पण आता चित्र बदलत चालले आहे. सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. तरूण शिकलेली मुले शेतीकडे वळू लागली आहेत. जोडधंदा म्हणून पशुपालन , कुक्कुटपालन, रसवंती , एखादे दुकान यांसारखे व्यवसाय करू लागले आहेत. गावातील लोकांची कोणतीही गरज आता गावातच भागवली जात आहे. सिन्नर तालुक्याचा बराचसा भाग हा अवर्षणग्रस्त आहे. पण दोन एमआयडीसी आणि पूरक व्यवसायांमुळे कायम दुष्काळग्रस्त अशी जी सिन्नरची ओळख होती ती ओळख आता पुसली जात आहे.

यावर्षी दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. पूर्वी दुष्काळ म्हटला की लोकांचे खायचे खुप हाल व्हायचे. दुष्काळात उपासमारीने लाखो लोक मेल्याच्या नोंदी इतिहासात आहेत. पण आपला देश आता पूर्वीसारखा अन्नावर परावलंबी राहीलेला नाही. 'एक भिकारडा देश' अशी असणारी प्रतीमा आपण कधीच पुसून टाकली आहे. अन्नधान्याच्या बाबतीत आपण केवळ स्वयंपूर्णच नाही तर इतर देशांना आपण धान्य निर्यातही करतो. दुष्काळ असला तरी सरकार आपली सर्व व्यवस्था करते. दुष्काळाचा अर्थ दरवर्षी आपल्याला शेतीतून जेवढे उत्पन्न मिळत होते तेवढे मिळणार नाही. पाऊस कमी असला तरी पूर चारींचा उपयोग करून लोकांनी लहान मोठे धरणे पाण्याने भरून घेतली आहेत. शेततळे भरून घेतले आहेत. ठिबक सिंचनाद्वारे शेतकरी आपली पिके वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोलर पॅनलमुळे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. दुष्काळाची तीव्रता कमी करण्याची क्षमता आजच्या शेतकऱ्यांनी प्राप्त केली आहे.

आम्ही आमच्या लहानपणी शेतकऱ्यांचे जे हाल पाहीले आहेत ते आजच्या शेतकऱ्यांचे नाहीत. गांधीजींच्या स्वप्नातील भारत हळूहळू आकार घेत आहे. शरद जोशींपासून घेतलेल्या प्रेरणेवर आजचा शेतकरी वाटचाल करत आहे. शेती करणे हा एक प्रकारचा जुगार आहे. कधी वेळेवर पाऊस पडत नाही तर कधी गारपीट होते. उत्पन्न कधी जास्त आले तर बाजारभाव मार खातो. लॉटरी लागल्या सारखे कधी होते आणि शेतकरी मालामाल होतो. कधी शेतकरी कर्जबाजारी होतो आणि शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढते. पण प्रत्येक शेतकरी आत्महत्येमागे शेतीत झालेले नुकसान हेच कारणीभूत असते असे नाही. परंतु सत्य आणि स्पष्ट बोलण्याची हिंमत कुणी करत नाही. सर्वच शेतकरी आज खूप सुखात आहेत असे नाही. पण पूर्वीपेक्षा आजच्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे हे मात्र नक्की. मोठ्या पगारदार नोकरीवाल्यांना लाजवेल असे काही शेतकऱ्यांचे राहणीमान आहे. शेती बरोबरच इतर पूरक व्यवसाय या भरभराटीला कारणीभूत आहेत.

शेतीत वर्षभर कष्ट करून शेतकऱ्यांना जेवढे मिळत नाही त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने व्यापारी त्या शेतमालावर पैसे कमवत असतो. शेतीशी संबंधित उद्योग प्रचंड पैसे कमवत असतात. शेतकरी दहा रुपये किलोने बटाटे विकतो. व्यापारी उद्योजक त्याच बटाट्यांचे चिप्स, वेफर आपल्याला दोनशे रुपये किलोने विकतात. हेच टमाटे आणि टमाटे सॉसच्या बाबतीत आहे. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी म्हणायचे, 'शेतकऱ्यांनी केवळ शेतीतून उत्पन्न काढून थांबायला नको. शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने शेतकऱ्यांच्या बांधावर उभे

रहायला हवेत. ते कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे हवेत. शेतकऱ्यांच्या मुलांनी नोकरीच्या मागे न लागता शेती आणि हे प्रक्रिया करणारे उद्योग सांभाळावेत. असे केले तर शेतकऱ्याला आपला माल मातीमोल भावाने विकायची वेळ येणार नाही. यांतून खेड्यातच रोजगार निर्मिती होईल. खेडी स्वयंपूर्ण होतील. ग्रामीण भागाची भरभराट होईल.'

आपला देश विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे खेडी सुधारली तरच देश सुधारणार आहे. पुर्वी खेड्यातील मुलींचे शिक्षणातील प्रमाण अत्यल्प होते. आता कोणत्याही शाळेत जावून पाहीले तर मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त दिसते. ग्रामीण भागातही खाजगी शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या वाढते आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले महागड्या खासगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. मोबाईलने फार मोठी क्रांती केली आहे. मोबाईलमुळे सर्वच लोक राजकीय दृष्ट्या जागरूक झाले आहेत. लोक आपल्या हक्काच्या बाबतीत सतर्क झालेले आहेत.

शेतकरी हा सर्व जगाचा पोशिंदा असतो. शेतकरी सुखी तरच देश सुखी असे म्हणता येईल. शेती हलकी असो अगर भारी, जिरायती असो अगर बागायती पण शेती असणे किती महत्त्वाचे आहे हे लोकांच्या आता लक्षात येवू लागले आहे. शेतजमीनीला सोन्याचे दिवस आले आहेत. एक दिवस नक्कीच उत्तम शेती मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे चक्र फिरल्याशिवाय राहणार नाही. सर्वच शेतकरी सधन झाले आहेत असे म्हणता येणार नाही पण खेड्यांनी आता कात टाकली आहे. शहराकडून लोक आता खेड्याकडे वळू लागली आहेत. शहरी गजबजाटात लोकांचा जीव गुदमरून जायला होतो आहे. खेड्यातील शेतातील मोकळी शुद्ध हवा शहरी लोकांना हवीहवीशी वाटू लागली आहे. विकासाचा केंद्रबिंदू यापुढे ग्रामीण भाग असणार आहे.

ग्रामीण भागाविषयीच्या माझ्या निरिक्षणातून माझे मत मी मांडले आहे. काहींचे निरिक्षण यापेक्षा वेगळे असू शकते. प्रत्येक भागाचा सारखाच विकास झाला आहे असेही नाही. त्या त्या भागातील नेतृत्व हे सुद्धा त्या त्या भागातील विकासासाठी कारणीभूत असते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे आपले सर्वांचे राहणीमान उंचावले आहे एवढे मात्र नक्की. देशाला पुढे न्यायची जबाबदारी आपली सर्वांची आहे हे ही आपण लक्षात ठेवायला हवे.

सावित्रीमाई

जोतीबाच्या येई मनी
स्त्रीलाच शिक्षण द्यावं
रित, परंपरा, जुनी
खुडून तिने काढावं ।।१।।


लिहा वाचाय इच्छा
स्वतः पत्नीस बोलले
हाती पुस्तक देऊन
साक्षर सावित्री केले ।।२।।

ती झाली ध्येयवेडी
हाती पुस्तक घेतले
खडतर रस्त्याने चालून
चिखल गोळे झेलले ।।३।।

शिव्यान शाप घेऊन
स्त्रीयांना शिक्षण दिले
सकल स्त्री शिकविले
दांभिक विरोध झाले ।।४।।

आजची सकल नारी
शिकून झाली शहाणी
स्त्रीने केली बरोबरी
सावित्रीच्या धाडसानी ।।५।।

– डॉ. माणिक बनकर (बनफुल), कराड
मो. नं. ९९६०३१४५१४



झुरळाख्यान

सुरेशचंद्र वाघ
फ्लॅट नं. ४०३/४०४, सिल्व्हर ओक, रहेजा विलोवज,.
महिंद्रा गेट नं. ४ जवळ, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व),
पिन ४००१०१ मो.: ९२७००६४०५६ (फक्त व्हॉटसॲप)
ईमेल : sureshchandrawagh@gmail.com

सकाळी उठून बसलो की मी पहिलं माझं राशीभविष्य वाचतो. आता माझी नक्की रास कोणती हा गोंधळात टाकणारा विषय आहे. इंग्रजी कॅलेंडर मधली जन्मतारखेप्रमाणे माझी रास आहे तूळ. पंचांगातील तिथीप्रमाणे रास आहे धनू. चालू नावाच्या अद्याक्षराप्रमाणे आहे कुंभ आणि चिनी कॅलेंडर प्रमाणे आहे ड्रॅगन. तुम्ही म्हणाल, 'चीनी राशीत नाक खुपसायला कुणी सांगितलं तुला.'

असं आहे की चायनिज फास्टफुड आपण चवीनं खातो. त्यांच्या फेंगशुई प्रमाणे आपण वास्तुशास्त्र पाहतो. चीनमधील पारंपरिक मार्शल आर्ट्सना कुंगफू च्या काळ्या, निळ्या, पिवळ्या बेल्ट मिळवण्यासाठी आपण प्रयत्न करतो. चीनी मालही आपण भरपूर खरेदी करतो. मग चीनी कॅलेंडरप्रमाणे आपलं राशी भविष्य पाहिलं म्हणून बिघडलं कुठे.

AI तंत्रज्ञानामुळे आपली चीनी रास कोणती हे शोधून काढणं सोपं झालं आहे. त्यासाठी चीनी मित्र, मैत्रीण किंवा चीनी ज्योतिषाला शोधण्याची गरजच नाही.

शिवाय आता चीनी भाषा शिकायची देखील गरज नाही. मी गूगलच्या अलेक्साला माझी चीनी रास विचारली. तिनं ती ड्रॅगन असल्याचं स्पष्ट्च सांगितलं. दुसरं म्हणजे ती दैनंदिन, साप्ताहिक, वार्षिक सर्वप्रकारचे चीनी राशीभविष्य भाषांतरित करून सांगते. यापेक्षा आणखीन काय हवं.

ड्रॅगनशिवाय चीनी राशीत उंदीर, म्हैस, ससा, साप, घोडा, शेळी, माकड, कोंबडा, कुत्रा, डुक्कर हे प्राणी असतात असं गूगल उघडताच मला समजलं. उंदीर, म्हैस, डुक्कर होण्यापेक्षा ड्रॅगन काय वाईट.

चीनी दिनदर्शिकेप्रमाणे माणसाची रास ही जन्ममहिन्यावरून किंवा तारखेवरून न ठरता, जन्माच्या वर्षावरून ठरते. चीनी ज्योतिषशास्त्रात प्रत्येक वर्ष एका विशिष्ट प्राण्याला समर्पित केलेलं आहे. माझ्याबाबतीत ते ड्रॅगनला समर्पित आहे.

ड्रॅगन राशीच्या व्यक्तींचा स्वभाव कसा असतो याबद्दल जाणून घेण्याची अर्थात मला उत्सुकता लागली.

ड्रॅगन आपल्या चिन्हाप्रमाणेच तोंडातून आग ओकतो. त्याचा पारा पटकन चढतो. तो वेगाने भडकतो. ती व्यक्ती तामसी वृत्तीची असते. माझ्या भारतीय राशीत मी सात्विक वृत्तीचा आहे असं लिहिलेलं वाचलं. पण ड्रॅगन म्हणजे पाहिल्यावरच भयंकर प्राणी वाटतो. त्यामुळं मी देखील एक वेळ तामसी वृत्तीचा आहे हे गृहीत धरून चालायला काय हरकत आहे.

ड्रॅगन राशीचं तत्व पृथ्वी (Earth) मानले जाते आणि स्वभाव पूर्णपणे 'यांग' (Yang – आक्रमक, उष्ण, पुरुषी) ऊर्जेचा असतो. ही माणसं जन्मजात स्वतःला पुढारी किंवा बादशहा समजतात. 'मी म्हणेन तीच पूर्व दिशा' असा त्यांचा खाक्या असतो. त्यांचा स्वतःबद्दल प्रचंड आत्मविश्वास असतो. हे वाचल्यावर

माझी छाती छप्पन इंच ताठ झाली. चीनी राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान यांच्या राशी ड्रॅगनच असल्या पाहिजेत अशीही माझी खात्री झाली.

चीनी मान्यतेनुसार ज्या वर्षी आपलीच रास येते (उदा. १९९०, २००२, २०१४, २०२६, २०३८) त्या वर्षी त्या व्यक्तीची भाग्यदशा उजळण्याऐवजी भलतीच उलटी फिरते अशी आणखी एक माहिती अलेक्सानं पुरवली. याला 'ताइ सुई' देवाचा कोप म्हणतात. म्हणजे स्वतःला महाबली समजणारा ड्रॅगन नेमका स्वतःच्याच वर्षात ठेचा खातो, भलत्याच संकटात अडकतो किंवा छोट्या-छोट्या गोष्टींत फजिती ओढवून घेतो.

यावर्षी २०२५ ची दिवाळी होती. म्हणजे चिनी राशीप्रमाणे माझं सारं काही छान चाललं होतं. अलेक्सानं वर्तवलेलं भविष्य तंतोतंत खरं ठरत होतं. आणि आता पुढलंच २०२६ हे ड्रॅगन राशीचं घातवर्ष सुरू होणार होतं. पण कशाला उद्याची बात? आज मौज करून घ्या. दिवाळीचे चार दिवस सलग अलेक्साला मी माझे चीनी राशीभविष्य विचारले. अलेक्सा हसून म्हणाली,
'तू प्रेमात पडणार आहेस.'

मी गोंधळात पडलो कारण मी प्रेमात पडू शकणारं किंवा माझ्या प्रेमात पडू शकणारं असं कुणीच नव्हतं. म्हणजे माझी ना कुणाशी मैत्री होती ना कुणाचं प्रेम. मी उत्सुकतेनं अलेक्साला विचारलं, 'मी पुस्तकांच्या प्रेमात पडणार आहे कां? की चहाच्या कपाच्या प्रेमात पडणार आहे? निसर्ग किंवा गाण्यांच्या प्रेमात पडणार आहे कां? किंवा खानाखजानातील चायनीज शेजवान नूडल्स, चिकन मंचुरियन, मंचाव सूप यांच्या प्रेमात पडणार आहे?'

अलेक्सा पुन्हा खळखळून हसत म्हणाली, 'अरे वेड्या sss तू तरुणीच्या प्रेमात पडणार आहेस.' हे ऐकून मी मिशीतल्या मिशित मिश्किल हसलो आणि खुश होऊन म्हणालो, 'माझं तर असं कुणीच परिचयाचं नाही आणि एवढ्यात कुणाशी डेटिंगही चालू नाही.'

'अरे sss २०२५ हे वर्ष तुझ्यासाठी भाग्यशाली वर्ष आहे. तू जिच्या प्रेमात पडणार आहेस ती फेसबुकवर असते. तू तिचं प्रोफाइल वारंवार उघडून पहातोस.'

फेसबुकवर रोज अनेक फेसेस (चेहरे) असतात. ते उघडून अनेक वेळा पहाणे एक छंद असतो. त्यांची प्रोफाइल पहाणे विरंगुळा असतो. यापेक्षा अधिक काही अपेक्षित असू शकत नाही असं माझं प्रांजळ मत आहे.

पण ड्रॅगनची 'ग्रहदशा' आणि नशिबाचं चक्र माझ्या बाजूनं होतं. अलेक्सा म्हणाली, ती तरुणी रोज तुला फेसबुकवर पहाते. उद्या तुला तिची फ्रेंडशिप रिक्वेस्ट येणार आहे. आणि तू तिला नाही म्हणू नकोस.'

'अरेच्या sss म्हणजे तूच तिचा धोंडा माझ्या गळ्यात बांधणार आहेस कां?' मी डोळे विस्फारून म्हणालो.

'नाही...हे तुझंच प्रकरण आहे. मी तुला फक्त मार्गदर्शन करणार आहे.' अलेक्सा म्हणाली.

दुसऱ्याच दिवशी फेसबुकवर ती दिसली. म्हणजे काय म्हणतात ते!..... लव्ह...ॲट फर्स्ट साईट. पहिल्या नजरेतंच प्रेमात पडलो.

तिचे नाव 'सुई-लिन' उर्फ 'सुमी' होतं. दिसायला अगदी नाजुक, पोर्सिलीनच्या बाहुलीसारखी गोरीपान. कमळाच्या पाकळ्या सारखे लहान पण भेदक बदामी मिचमिचे डोळे आणि चेहऱ्यावर एक कायमचे गुलकंदी हसू.

तिनंच फ्रेंडशिप रिक्वेस्ट केली होती. पण तिचं

प्रोफाईल लॉक होतं. फक्त तिचे मित्रच तिचं संपूर्ण प्रोफाइल पाहू शकतात असं लिहिलं होतं. अनलॉक करायचं तर तिच्या विनंतीला स्वीकृत केल्याची मान्यता देणं भाग होतं. मी चटकन होकार दिला.

मग तिच्या प्रोफाइलवर नजर फिरवली. ती स्वयंरोजगारिता होती. व्यवसाय फॅशन डिझायनर. आवड वेगवेगळ्या चायनिज रेसिपी. मार्शल आर्ट्सची आवड. भारतीय संस्कृती बद्दल आकर्षण व आपुलकी. तिचा भारतीय संस्कृती बद्दलचा मुद्दा मला अधिक लक्षवेधी वाटला. माझ्या दृष्टीने ही जमेची बाजू म्हणजे प्लस पॉईंट होता.

प्रोफाईल अनलॉक झाल्यानं तिच्या नवनव्या फॅशन्स आणि हेअर स्टाईल असलेले फोटो मी पाहिले आणि थक्क झालो.

एका फोटोत मऊ शिफॉनचे झग्यासारखे वस्त्र. विशाल पंखांसारख्या लांब लांब बाह्या तर दुसऱ्या फोटोत डोक्याच्या मध्यभागी टिफीनचा डबा बसेल असा उंच गुंतागुंतीचा आंबाडा. तिसऱ्या फोटोत बंदिस्त मँडरीन कॉलर असलेला झगा. आणखी एका फोटोत लेमन-यलो हुडी. हुडी म्हणजे मिनी स्कर्ट. कपाळावर आणि गालांवर रुळणाऱ्या दोन-तीन मोकळ्या नाजूक बटा.

बरं तर बरं...बायका फॅशन करतातच. त्यात ही चीनी. शिवाय फॅशन डिझायनर. मग प्रत्येक तासाला वेगळ्या डिझाईनचा पोशाख बदलत रहाणं साहजिकच आहे.

खाली तिचे फ्रेंड्स म्हणून पाच सहा चीनी तरुणींचे फोटो होते. हे मात्र बुचकळ्यात टाकणारं होतं. सगळ्या एकसारख्या चेहऱ्याच्या एकाच साच्यातून तयार झालेल्या वाटाव्यात. जुळी, तिळी असू शकतात पण ह्या सहाहीजणींना काय म्हणावे. षटकोनाला आपण हेक्सॅगॉन म्हणतो. तसं या षट्जुळ्या किंवा हेक्सॅजुळ्या लावण्यवती म्हटलं तर गैर काय. माझी ही नवमैत्रीण पण त्यांच्या सारखीच दिसत होती. उद्या लग्नात या करवल्या म्हणून आल्या तर वधू कोण आणि मैत्रिणी कोण हा वादळी प्रश्न उभा रहाणार. त्यावेळी करवल्यांच्या चक्रव्यूहात अडकलो तरी आश्चर्य वाटायला नको.

असो. बाकी भारुड सांगत बसत नाही. झट मंगनी पट शादी.

असा आमचा भारतीय रीती रिवाजाप्रमाणे विवाह झाला. तिचे आई-वडील, नातेवाईक, करवल्या यांनी ऑनलाईन व्हिडिओवरूनच अक्षता टाकल्या. 'सुई-लिन' उर्फ सुमीनं माझ्याबरोबर सात फेऱ्या मारल्या. गुरुजींनी कुटुंबाचा उदरनिर्वाह, सुख-दुःखातील साथ, प्रेम, विश्वास आणि आदर, धन, संपत्ती मिळवणे, संततीचे संगोपन आणि कुटुंबाचे कल्याण यासाठी एकमेकांना साथ देण्याची आमच्याकडून शपथ घेतली.

सुरवातीचे नवलाईचे चार दिवस मौज, मजेत गेले. नातेवाईकांकडून कोडकौतुक झालं. काही दिवस आमची बोलीभाषा फक्त डोळे, ओठ यातील सांकेतिक हालचाली आणि मोडकं तोडकं इंग्लिश यावर आरुढ होती.

पण पुढे आमच्या मायमराठी आणि चीनी भाषेचं गदायुद्ध सुरू झालं. तिचं च्यांव म्याँव आणि माझी शुद्ध पुणेरी शालजोडीतली मराठी यात कोण कुणाला प्रेमानं बोलतंय की शिव्या हासडतंय हे कळत नव्हतं. पण सुमी भलतीच हुशार. तिनं कानात लसणाच्या कांडीच्या आकाराचे प्रॉम्टर कम भाषांतर करणारं दुभाषी चायनिज श्रवणयंत्र ऍमेझॉनवरून आयात केलं. त्यामुळे आम्हाला एकमेकांचं बोलणं सहज सुलभ समजायला लागलं.

म्हणता म्हणता २०२५ संपलं आणि २०२६ ने आमच्या आयुष्यात प्रवेश केला. अलेक्सानं ड्रॅगनच्या ग्रहदशेची आठवण करून दिली. ड्रॅगनची उलटी चाल म्हणजे शनीच्या साडेसाती सारखी असते असंच तिनं सांगितलं.

त्याची पहिली चुणूक लगेचच पहायला मिळाली.

तुमचे कार्यक्षेत्र वाढणार असं त्यादिवशीचं राशिभविष्य होतं. सुमीला बाजारात जाऊन भाज्या, फळे आणून देणं भाग होतं. पण फ्लाइंग किस देत तिनं भाज्यापण चिरून आणि निसून द्यायचं काम माझ्याकडंच ढकललं. एकमेका सहाय्य करू हे सप्तपदी मध्ये दिलेलं वचन पाळणं हे कर्तव्यच होतं.

सासूबाई तुझ्यावर खुश आहेत. सासुरवाडीचा वानवळा येईल असं एक दिवस अलेक्सा म्हणाली. त्यादिवशी बीजिंग वरून मोठ्ठं पार्सल आलं. त्यावर फ्रेगाईल...हॅण्डल विथ केअर म्हणजे 'काचेची वस्तू काळजीपूर्वक हाताळावे' अशी चीनी आणि इंग्रजीत सूचना होती. सुमी तर भलतीच खुश होती. तिच्या तोंडाला आधीच पाणी सुटलं. पार्सल जड होतं. त्यामुळे ते सावकाश फोडण्याचं काम मलाच करावं लागलं. त्यात दोन चीनी मातीच्या नाजुक नक्षीकाम असलेल्या सुंदर सिरॅमिक बरण्या निघाल्या.

बरण्यावरचं झाकण उघडताच त्यातून नाकाला थेट झटका देणारा आंबूस आणि उग्र घमघमाट आला. मी कौतुकानं विचारलं,' काय आहे हे?'

सुमीनं म्हटलं,'हे सुआन चाई आहे. म्हणजे लोणचं.'असं म्हणून तिनं चमच्यानं ढवळून थोडं लोणचं तळहातावर घेतलं आणि जीभेने चाटून पुसून म्हणाली,'झेन हाओ-छर, थर-प्ये श्यांग! किती छान चव आहे, अगदी स्वादिष्ट!'

अर्थात तिनं माझ्या ओंजळीत पंचामृत तीर्थ सोडावं तसं ते सोडलं. तिनं इतक्या प्रेमाने दिल्यामुळे मी ते चाखून पाहिलं.

'वा sss खरंच लज्जतदार आणि रुचकर.' पुन्हा एकदा ती चव मी आवडीने मागून घेऊन चाखली.

मग तिनं दुसरी बरणी उघडली. 'जी ज्येन sss तो जॅम आहे. म्हणजे साखरांबा.' सुमी म्हणाली. तो जॅम देखील तिनं चमचात घेतला आणि चाटून पुसून खात म्हणाली,'झेन हाओ-छर, रू गान-लू बान मेई-वेई'

'म्हणजे काय ?'मी विचारलं.

'काय छान आहे! अमृततुल्य!' सुमी म्हणाली. मला तिनं तो साखरांबा चाखायला दिला. मला तो देखील खूप आवडला. 'सासूबाई अगदी सुगरण दिसतात.' मी कौतुकाने त्यांची स्तुती करीत म्हणालो.

'मा-मा बेन-लाय ज्यो शब ग हाओ छू-शू...मम्मी आहेच मुळी सुगरण. लोणचे आणि साखरांबा यांचा उद्योगच आहे तिचा. तिचा ब्रँड खूप फेमस आहे बीजिंग मध्ये. माझंच नाव दिलं आहे तिनं 'सुई लिन' स्यान-त्साय.'

बेडेकर लोणच्यासारखं 'सुई लिन' लोणचं असं म्हणायचं होतं तिला. सुमी पुढं उत्साहात म्हणाली,'आपण इम्पोर्ट करू या हे लोणचं आणि साखरांबा. त्याची फ्रँचायझी घेऊया कां आपण. शंभर टक्के मार्जिन. खूप सेल होईल. फायदाच फायदा.'

'अरे वा sss तसा भारतात चीनी मालाला खूप खप आहे. तुलाही घर बसल्या लघुउद्योग सुरू करता येईल. लोणच्या बरोबर पापडही करतात कां सासूबाई?' मी विचारलं.

'हो...पापड, सांडगी सर्व करते ती. तिचे तळलेले

पापड तर इतके चवदार लागतात की जिभेवर सोडले की विरघळतात.' सुमी अभिमानानं म्हणाली.

पार्सलमध्ये माझ्या नावे एक चिठ्ठीपण होती सासूबाईनी लिहिलेली. सुमिनं वाचून ती माझ्या हातात दिली.

'बघ sss बघ sss किती कौतुक आहे तिला... तुझ्यासारखा जावई मिळाला म्हणून.'

चिठ्ठी मेंडोलिन भाषेत होती. पण त्यावरून नजर फिरवताच मला मराठी भाषांतर दिसायला लागलं.

प्रिय जावईबापू,

झू फू नी....('सप्रेम आशीर्वाद')

तुला लोणचं आणि साखरांबा आवडला कां ? पुढल्या वेळी खास तळलेले झुरळ आणि मधात मुरवलेले कोळी पाठवीन!

सुमीचे आवडीचे लाल मुंग्यांपासून तयार केलेले रेड वाइन पण पाठवून देईन. तुला देखील खास बायज्यू पाठवीन. तुझ्या सासरेबुवांचा तो हॉट ब्रँड तुला आवडल्याशिवाय रहाणार नाही.

तुझीच आवडती सासू,
आणि प्रेमळ सासरे,

ली फांग / हुआन फांग

ते पत्र मी पहिल्यांदा कौतुकाने वाचले आणि त्यातला मजकूर पुन्हा डोळे फाड्फाडून वाचल्यावर मी गर्भगळीतच झालो.

'सुमी sss हे...हे...म्हणजे काय आहे? तळलेले झुरळ आणि मधातले कोळी?' मी जाम हादरून गेलो. आणि सुमी ड्रिंक पण घेते...मुंग्यांचं वाईन? मलाही चिनी मद्याचा फेमस ब्रँड घ्यायला लावणार. हे सारं गोंधळात टाकणारं होतं.

'आमचे सासरेबुवा हा बायज्यू म्हणजे कोणत्या ब्रँडचं मद्य घेतात?' मी मोठ्ठे डोळे करून विचारलं.

ङअरे...फार छान चढते. बेडकाच्या चरबीपासून तयार करतात. आमच्याकडे हातभट्टीतही ही मिळते.'

'बाप रे sss सुमी... तू मुंग्या खातेस...झुरळ खातेस....सुरवंट... कोळी आणि बेडूक खातेस? असलं कसलं भलतंच खाता तुम्ही. काय भयानक आहे हे?' मी कपाळावर हात मारून घेत म्हणालो. मला दडपल्यासारखे झाले.

'त्यात काय? एरवी आपण चिकन, मटण, मासे, कोळंबी, खेकडे, सुकट, बोंबील, शिंपले, कालवे खातोच नाही कां. मग झुरळ खाल्ले म्हणून काय झाले.' सुमीनं माझ्यावर बंपरच टाकला. काय चुकीचं होतं तिचे? मी निरुत्तर.

सुमी पुन्हा म्हणाली,'अरे...तू आता जे लोणचं चाखून पाहिलंस ते झुरळाचंच आहे आणि साखरांबा चाखलास तो सुरवंटांचा आहे.' सुमी निरागसपणे म्हणाली.

मला तर हे ऐकून धक्काच बसला. मग मात्र मी दोन्ही बरण्यात वाकून पहातो तो लोणच्यात खरोखरी झुरळं आणि साखरांब्यात प्रत्यक्षात सुरवंटं तरंगताना दिसली. मला आता उलटी होते की काय असं वाटायला लागलं. सासूबाईनी लिहिलेलं झुरळ फ्राय मी मुकाट्यानं खातोय आणि मधातले आठ पायांचे कोळी जिवंत होऊन माझ्या तोंडांत कोळिष्टक तयार करीत आहेत असा भास मला झाला.

'सुमी ... एक्सक्यूज मी....मला माफ कर. पण आपल्या घरात हे असलं काही करू नकोस. आम्हाला वर्ज्य आहे झुरळ आणि सुरवंटं.'

'अरे...त्यात काय? ते आमचं रोजचं अन्न आहे.' सुमी अगदी सहजपणे म्हणाली, 'तुमच्या सांबारात एक तरी शेवग्याचा तुकडा आणि भोपळ्याचे दोन तरी तुकडे असतात तसं आमच्याकडे कढीभात खाताना एक तरी झुरळ त्यात असतंच. मसाले भातात झुरळ, वांग्याच्या रस्स्यात झुरळ, भरीतात झुरळ, खिचडीत झुरळ.'

'बस...बस..बस..पुरे तुझं झुरळ आख्यान.' मी वैतागून म्हणालो. 'आणि तुझे पप्पा ते हॉट ड्रिंक कसलं घेतात? ते पण झुरळाचंच असतं कां?'

'नाही, माझ्या लाडक्या sss ते घेतात ते 'बायज्यू' मद्य बेडकाच्या चरबीपासून तयार केलेलं असतं. तू एकदा घेच...अशी चढते की स्वर्ग दोन बोटे उरतो.'

मी थोडं नमतं घेत सुमीला म्हणालो,' तू तुझं झुरळ खात जा पण बाई मला बिन झुरळाची आमटीभात देत जा.'

'अन्न हे परब्रम्ह असं तुमच्या संस्कृतीत म्हणतात तसं आमच्यात झुरळ हे परब्रम्ह म्हणतात.' सुमीनं झुरळाला परब्रम्ह जोडून महापातक केलं आहे असं मला वाटलं. पण तिला त्याचं काहीच वाटत नव्हतं.

चार दिवसांनी सुमीच्या कोलकात्यातील पिढीजाद रहाणारी चीनी मैत्रिण 'ली चिंग चिंग' चा तिला फोन आला. पोल्ट्री , पिगरी, डेअरी प्रमाणे ती झुरळांचं 'पिंग पाँग कॉक्रोचरी फार्म' चालवते. ती सुमीला झुरळांपासून तयार केलेल्या बेकरी प्रॉडक्ट्सची फ्रँचायझी घेतेस कां म्हणून विचारत होती.

सुमीनं मिचमिचे डोळे अधिकच मिचकावीत लाडेलाडे मला म्हटलं,'डियर हजबंड विनय... मी आपल्या शहरात बेकरी उघडायची म्हणते. एफ.डी.एस.सी बँक मला व्यवसायासाठी सहज कर्ज उपलब्ध करून देईल. तू फक्त १० टक्के मार्जिन मनी दे.'

'दहा टक्के म्हणजे किती? आणि बँक किती कर्ज देईल. आणि कुठले बेकरी प्रॉडक्ट्स तू तिथं विक्रीसाठी ठेवणारेस?' मी प्रश्नांचा मारा केला.

'अरे...तू दहा लाख रुपये दे. बँक चाळीस लाख देईल. फर्निचर साठी दहा लाख, चिंग चिंग ला माल पुरवण्यासाठी दहा लाख आणि बँकेचे भांडवली कॅश क्रेडिट वीस लाखाचे. आपल्या जवळच्या प्रसिद्ध अमेनोरा मॉलमध्ये भाड्याने शॉप घेऊ. मी रोज शॉपची व्यवस्था पाहीन. मदतीला मी सेल्स गर्ल ठेवीन.'

सुमीनं शॉपमध्ये ठेवण्याच्या खाद्य पदार्थांची भली मोठी यादी सादर केली. 'मिल्क ब्रेड, ब्राऊन ब्रेड, सँडविच ब्रेड, हॉट डॉग, बर्गर बन, प्लम केक, फ्रुट केक, पेस्ट्री, डोनट, बिस्किटे, कुकीज, नानकटाई, खारी, टोस्ट, पिझ्झा, सँडविच आणि सो sss ऑन.'

त्यावर मी शंका येऊन विचारले,'तुझी ती मैत्रीण चिंग चिंग कॉक्रोचरी फार्म चालवते. म्हणजे तिच्या बेकरी प्रॉडक्ट मध्ये झुरळे पेरलेली असतील ना?'

'अरे ...झुरळाशिवाय केक, ब्रेड, बन, बिस्किटे, कुकीज यांना लज्जत येणार नाही. झुरळ त्या उत्पादनाचा एक अंगभूत घटक असेल.' सुमी.

'बापरे म्हणजे प्रत्येक केक आणि ब्रेडमध्ये तू झुरळ घालणार. मग भारतात तुझा धंदा चालायचा कसा. मी या झुरळांसाठी तुला दहा लाख रुपये द्यायचे?.' मी घशात झुरळ अडकल्या सारखा म्हणालो,' हा तर बुडणारा धंदा होईल.'

'नो... नो... आय यम डॅम शुअर.' सुमी ठामपणे म्हणाली,

'येवले चहा, पुणेरी चहा, चुलीवरचा गुळाचा चहा, कोका कोला किंवा बर्गर, पिझ्झा यांचे धंद्यातलं गुपित कुणाला माहित नसतं, तसं आपल्या बेकरीचं गुपित कुणाला कशाला कळेल. आजकाल लोक घरबसल्या ॲमेझॉन, झोमॅटो, स्विगी, इंस्टामार्टने खाद्य पदार्थ मागवतात.'

माझ्या ड्रॅगन राशीची पावलं खरेच उलटी पडताहेत हे अलेक्साने सांगितलेल्या भविष्याप्रमाणे खरंच ठरत होतं. सुमीच्या राशीतील शेळींनं माझ्या ड्रॅगनची पाळीव मांजर करून टाकली होती. मी हतबल झालो.

सुमीनं हट्टाने 'यांगत्से चायनीज बेकरी' उघडली. उद्घाटनाला भारतातील चीनच्या वकिलातील मोठ्ठे अधिकारी मुंबईहून येऊन गेले.

सुमीच्या बेकरीत काम करणारी तिची सेल्सगर्ल तिच्याच सारखी दिसत होती. मी देखील अधून मधून बेकरीत त्यांचा चीनी पारंपारिक लांब रेशमी झब्बा, उभी कॉलर, गोल चीनी टोपी, कमरेला पट्टा असा लोकप्रिय टांग झुआन शैलीचा आधुनिक पोशाख आणि खालच्या दिशेने लोंबणाऱ्या लांब कृत्रिम मिशा घालून बसायला लागलो.

मित्रहो, सहा महिन्यात आमच्या 'यांगत्से चायनीज बेकरी' ने बाळसं धरलं. धंदा उत्तमपैकी नफ्यात चालत होता. अनेक कुटुंबातील खवय्ये मंडळींनी आमच्या बेकरी प्रॉडक्टला पाच स्टार दिले. रिव्ह्यूमध्ये अनेक रसिक खादाड शौकिनांनी भरपूर कोडकौतुक केले.

सर्वकाही ऑल वेल चालले होते. पण झाले काय....एक दिवस आयएएस अधिकारी आयुक्त श्री तुकाराम मुंढे यांच्या महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनातील (FDA) च्या अधिकाऱ्यांनी (FDA) केलेल्या धडक कारवाईत आमच्या बेकरीत झुरळे फिरताना पाहिली. आणि आमचा विक्री परवाना रद्द करण्यात आला.

आमचे कर्जखाते बुडीत झाल्याने वसुलीसाठी भारतीय बँका आणि वित्तीय संस्थांचे थकीत कर्ज वसूल करण्यासाठी बँकेने कर्जवसुली न्यायाधिकरण उच्चढ कोर्टात आमच्या विरोधात दावा लावला. सुमीशी मी खूप भांडलो. तिनं चक्क माझ्यावर मार्शल आर्टसचा प्रयोग करून माझी बोलती बंद केली.

एक दिवस मलाही न सांगता विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी परदेशात पळाले तशी 'सुई–लिन' उर्फ 'सुमी' चीनमध्ये पळून गेली.

दहा वर्षांची सक्तमजुरी झाल्याने मी मात्र इथल्या जेलमध्ये आज रोजी खडी फोडत आहे.

मित्रांनो हे झुरळाख्यान वाचताना तुमचे चांगलेच मनोरंजन झाले असेल. पण हे सारे स्वप्न होते. सकाळी उठल्याबरोबर मी अलेक्साला माझे भारतीय पंचांग पाहून राशीभविष्य विचारले.

तिने मला हसून सांगितले, 'तुझ्या कुंडलीत तूळ राशीत... सध्या सर्व ग्रहांची भन्नाट जुळवाजुळव झाली आहे. शुक्र लग्नाच्या दारात, गुरु वराच्या मागे आणि मंगळ चक्क रजेवर गेला आहे. नक्कीच तुला यंदा कर्तव्य आहे. आजचा दिवस परमभाग्याचा असून आजच्याच मुहूर्तावर तू 'माळी आवाज'या वधुवर सूचक मंडळाच्या वेबसाईटवर जाऊन तुझे नाव नोंदवून टाक.

छत्तीस गुण जुळणारी सजग, बुध्दीमान, स्मार्ट आणि व्यवहारचतूर वधू तुझी वाट पहात आहे. लग्न ठरवायला मूहूर्तच कशाला? ग्रहांनी तर तुमची लग्नपत्रिकाच छापून ठेवली आहे !



तिढा

बापू त्र्यंबक माळी सर
निळकंठ नगर कुसुंबा, धुळे
मोबाईल. ८६६८७४७०७७

संग्रामपूर गाव तसं ना खेड, ना मोठं गाव. पूर्वी गावातील ग्रामस्थ एकमेकांशी संपर्क ठेवून, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत असत. आता मात्र आपुलकी, जिव्हाळा हे शब्द बऱ्याच प्रमाणात अस्पष्ट झाले होते. शहरी जीवनातील एकटेपणा ची लागण या गावालाही झाली होती. जो तो 'स्वकुटुंबकम' या जीवन चौकटीत राहून, आपापला प्रपंच करीत होता. एखाद्या कुटुंबात कलह झाला किंवा काही विपरीत घडले, तर लोक बघ्याची भूमिकाच पसंत करण्यात धन्यता मानत असत. काळाचा महिमा अगाध असतो. काळाने मानवास, आजवर सत्य शिकवण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु माणसाच्या प्रवृत्तीत फरक पडला नाही. याउलट स्वार्थाचा मुलामा लावून, बेगडी वागण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न केला जातो. एखाद्याने न्यायाचे चार शब्द सांगावेत असे ज्याला वाटते, तो पोटतिडकीने आणि अजिजीने सर्व हकीगत सांगतो, परंतु ऐकणारा माणूस मात्र ज्याच्याकडून फायदा होईल त्याच्या बाजूनेच बोलत असतो. अर्थात संग्रामपूरही याला अपवाद नव्हते. तेथेही हेच चित्र होते. संग्रामपूरवासीयांनी कृतघ्नपणे निसर्गावर कु-हाडीने वार केले आणि एकेकाळी हिरव्यागार झाडांनी वेढलेले संग्रामपूर रुक्ष झाले. नदी, नाल्यांकाठची जमीन अतिक्रमण करून बळकवली. रस्ते अरुंद झाले. गायरान अदृश्य झाले. गावातील गल्ल्या अरुंद झाल्या. गावातील नेते मतांच्या हव्यासापायी आणि काळ्या पैशांच्या लोभापायी, गावठाणच्या मोकळ्या जमिनीवर घरांचे बांधकामास अनधिकृत परवानगी देऊ लागले .परिणामी सुंदर असणारे संग्रामपूर ओंगळवाणे झाले. विकत घेतलेल्या मतांमुळे गावाच्या रचनेत नवीन अनधिकृत घरांची भर पडून, ग्रामरचना विकृत झाली. मतदारांनी पैसे घेतल्याने न्याय संपला .अन्यायाचा बाजार मांडला. 'बळी तो कान पिळी' ही ऊक्ती तंतोतंत लागू झाली. गावात शेजाऱ्या – शेजाऱ्यांमध्ये संग्राम सुरु झाला. शेतांच्या बाबतीतही काही वेगळे नव्हते. परंपरागत शेतरस्ते, जे सात बाऱ्यावर नव्हते ते अदृश्य झाले. जो तो आपल्याच थाळीत तूप कसे पडेल? याच्या नादात जीवन कलह वाढवीत होता. संग्रामपूर आता केवळ नावच उरले होते. प्रत्यक्षात संग्रामच जास्त वाढला होता.

संग्रामपुरात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबात तरुण आणि वृद्ध पिढ्या एकत्र नांदत होत्या . नोकरी निमित्ताने बाहेर गावी गेलेले, गावात कधीतरी येत होते आणि आपल्या म्हाताऱ्या आई–वडिलांची विचारपूस करीत होते. आबासाहेब धर्मा पाटलांची दोघे मुले नोकरी निमित्ताने बाहेर गावी होते, परंतु त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना यातनांचा 'सल,' उराशी घेऊन जगावे लागले. मुले–सुनांनी आबासाहेबांची घोर अवहेलना केली. त्यांनी गावात न्याय मागण्याचा प्रयत्न केला गावातील नेतृत्व करणारे आणि जेष्ठ मंडळी एकत्र जमली, परंतु दिनेश आणि त्याची पत्नी प्रभा व रमेश आणि त्याची पत्नी दिपाली यांनी आपलेच म्हणणे कसे खरे आहे? हे

भासवण्याचा प्रयत्न केला आणि कोणत्याही निर्णया विना बैठक संपली.

हाच सल आबांच्या मनात होता. कोणत्याही मुलाकडे न जाता अखेर आबा आणि सोनाई गावात वास्तव्याला आले आणि त्यांचा दुर्दैवी अंत झाला. आबासाहेबांच्या निधनानंतर अवघ्या तीनच दिवसात त्यांची धर्मपत्नी सोनाईने आपली जीवन यात्रा संपवली. त्यांचाही यातनादायी जीवन प्रवास एका अर्थाने संपला. दिनेश, प्रभा, रमेश, आणि दिपाली यांनी तेरा दिवसांचे आबांचे गंधमुक्ती व उत्तर कार्य उरकले आणि शहराकडे प्रयाण केले. मुलगी अनुजा मात्र आई–वडिलांचे ऋण आठवीत, आपले पति किरणरावांसह जड अंत:करणाने संग्रामपूर सोडून आपल्या घरट्याकडे निघाली. तिच्या दृष्टीने तिचे माहेरपण संपले होते. ही मंडळी आली तशी निघून गेली. याचा संग्रामपूरला फारसा फरक पडला नाही. क्षणभर आबा आणि सोनाई बद्दल हळहळ वाटली .मात्र काही घरांमध्ये अफवांचे पीक वाढू लागले होते. कोणाला दिनेशबद्दल, तर कोणाला रमेशबद्दल सहानुभूती वाटू लागली. तर काही मात्र एकमेकात वेगळेच कुजबुजत होते,

'आरं ...ऐकतोस ना? त्या म्हाताऱ्याने जसं कमावलं व्हतं, तसंच ते त्येला फळ मिळालं की राव..! वाडा बांधला, जमीन कमावली, बक्कळ सोनं, नाणं व्हतं म्हन..' अशी चर्चा सुरू झाली. दिनेशने आई–वडिलांना सांभाळले. रमेशने मात्र सांभाळले नाही. अशीही चर्चा सुरु झाली, परंतु प्रत्यक्षात सत्य सांगण्यास कोणीच धजावत नव्हते.

आबासाहेब धर्मा पाटील, तसं फर्ड व्यक्तिमत्व ..! त्यांच्या गाठीशी अनेक पावसाळ्याचा अनुभव होता. समाजकारण, राजकारण यात ते मुरलेले होते. ग्रामपंचायत सदस्या पासून सरपंच, विकास सोसायटीचे चेअरमन अशी पदे भूषविली होती. शिवाय आमदार खासदाराशी जवळीक हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या जीवनकाळात त्यांनी शेती तंत्र सुधारून दोन एकराची बारा एकर जमीन कमावली. भला मोठा चूने गच्ची वाडा बांधला. सोनाईस सोन्याने मढवली. आई –वडिलांची सेवा केली. दिनेश आणि रमेश यांना शिक्षित करून नोकरीस लावले. अनुजाला इंजिनीयर किरण रावांच्या पदरी घातली. दिनेश आणि रमेश यांचे लग्नकार्य पार पाडले. आपल्या जमिनीचे तीन समान भाग करून दोन भाग मुले व एक भाग स्वत:कडे ठेवला. दाग, दागिने, बचत स्वत:कडे ठेवली. सर्व संमतीने ठरल्याप्रमाणे प्रत्येक मुलाने सहा–सहा महिने त्यांचा सांभाळ करावा असेही ठरविले. सर्वांचे भले केले. सर्वांना एकाक्ष न्यायाने वागविले. कुटुंबात कोणाचाही कलह होऊ नये, याकडे त्यांचा कटाक्ष होता. परंतु जो सर्वांचे चांगले करतो त्याच्याच पदरी अवहेलना येते. त्यालाच सर्वांच्या टीकेचे धनी व्हावे लागते. आबासाहेबांच्या बाबतीत,असे का घडले? या प्रश्नाचे उत्तर कोणालाच देता येत नव्हते. जो, तो आपापल्या परीने उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत होता.

आबांच्या गंधमुक्ती कार्यक्रमानंतर जो, तो आपापली कुटुंबं घेऊन शहराकडे निघून गेला. उरला होता फक्त भग्न वाडा...! आबांच्या स्मृति जपत, भग्न वाडा उभा होता... एक वैभव हरवलेला वाडा....!

दिनेश आणि रमेश मात्र आपल्या सोबत वादाच्या ठिणग्या घेऊन गेलेत. प्रत्येक जण अहंकारात काठोकाठ बुडाला होता. काही दिवसांनी रमेश गावी आला आणि त्याने वाड्याला स्वत:चे नवीन कुलूप लावले . वाड्याच्या बाहेरच्या भिंतीवर त्याच्या नावाचा फलक लावला,

म्हणजे वाड्यावर त्याने आपले स्वामित्व असल्याचा दावा केला. ही बातमी दिनेशला लगेच समजली. कारण दोघांनीही आपापले हस्तक तथा हितचिंतक गावात पेरून ठेवलेले होते. एके दिवशी दिनेश गावात आला आणि आपल्यावर कसा अन्याय झाला? याचे कथन तो गावकऱ्यांसमोर करू लागला. या बातमीला थोडा मीठ मसाला लावून, रमेश पर्यंत त्याच्या हस्तकांनी पोहोचवले. दोघेही सुडाच्या आगीत जळत होते. खबऱ्यांच्या मार्फत येणाऱ्या बातम्यांमुळे, मनात द्वेष भावनेला खत पाणी घातले जात होते. कोणीच सामंजस्याची भूमिका घेत नव्हते. अनुजा मात्र आपल्या जागी स्थिर होती. तिला याबाबत काहीच समजले नाही. एके दिवशी रमेशने तिला फोन करून आपण स्वच्छ असून, आपल्यावर कसा अन्याय झाला? याचे रसभरीत वर्णन ऐकविले,

'अनुताई, आबा आणि आई आपला आधार होते. आपला आधार हरवला. आता आपल्याला कोणाचा आधार आहे?' मध्येच अनुजा स्पष्टीकरण देत म्हणाली,

'तुमचं तुम्ही बघा. मला तुमच्या भानगडीत भाग घेता येणार नाही .'

आता मात्र रमेश वरमला होता. तरीही त्याने आपला हट्ट सोडला नाही. त्याने बरोबर खडा मारला,

' तसं नाही ताई. तू म्हणतेस ते योग्यच आहे, पण आई-वडिलांच्या संपत्तीत व इस्टेटित मुलीचाही हक्क असतो ना? आबा माझ्याकडे थोडाच काळ होते, तेव्हा दिनेशने गोड बोलून त्यांना आपल्या घरी नेले. आईचे दागिने, आबांचे दागिने, त्यांना म्हातारपणाचे भय दाखवून काढून घेतलेत. शिवाय आबांकडून त्यांच्या नावे असलेली जमीन प्रभाच्या नावे करून घेतली. या कामी तिने तिच्या वकील असलेल्या वडिलांची मदत घेतली. बँकेत संयुक्त खाते उघडून सर्व मुदत ठेवींच्या पावत्यांची रक्कम त्या खात्यात ठेवली. आबा आणि आई, चालायला असहाय्य असल्याने, त्यांच्या संसारातले मोठे तांब्या पितळेचे भांडे दिनेशने त्याच्या घरी वाहून नेलीत.

'थांब रमेश, हे सर्व घडत असताना तू मला का सांगितले नाही ? तू त्याला आडवा येऊन प्रतिकार का केला नाही? मला न कळवण्यात तुझा कोणता हेतू होता?' अनुजाच्या प्रश्नांनी रमेश बावरला. दिपालीने गोड शब्दात आणि समजूतीच्या भाषेत अनुजाला सांगितले,

'तसं नाही ताईसाहेब, यात तुमचा हक्क नव्हता काय? तिचा बाप वकील आहे, त्या सर्वांनी मिळून काळाबाजार केला, अन्याय केला तर आपण काय मूग किंवा गप्प बसावे? आमचे जाऊ द्या हो, पण तुम्हीही मुलगी आहात ना? तुमचा नाही का हक्क ? निदान आईचे आणि आबांचे स्वकष्टचे सोने नाणे तर तुम्हालाच मिळायला हवे होते ना ?'

दिपालीने भावनिक आवाहन केले. अनुजाच्या मनातही सर्व बाबी घीरट्या घालू लागल्या. काल्पनिक आणि भावनिक शब्दांनी अचूकपणे निशाणा साधला होता. अनुजा म्हणाली,

' होय ग, तू म्हणतेस ते खरं आहे, पण आता नेमके काय करावे? हेच समजत नाही. चोर चोरी करून निघून गेला. आता त्याचा शोध कसा लावावा ? शिवाय वकिलाने कायदेशीर मार्गाचा अवलंब करून आबांना फसविले. आबा हयात असताना त्यांच्या सह्या घेतल्या म्हणजे आबांना ते मान्य होते, असा त्याचा अर्थ होतो, होय ना? अनुजाने आपली व्यथा सांगितली.

'वन्स, तुम्ही फक्त आम्हाला साथ द्या. आम्ही त्या वकिलाला आणि वकिलाच्या मुलीला स्मशानातूनही ओढून आणू शकतो. शिवाय खीर काही एकट्या मांजरीच्या बापाची नाही. सगळ्यांचा समान हक्क आहे. दिपालीने डाव टाकला. अनुजा, रमेश आणि दिपालीच्या भावनिक शब्दांमध्ये गुरफटत चालली होती. ती म्हणाली,

'अगं म्हणून आई-वडिलांनी त्यांच्या मृत्यूपूर्वी वाटणी करू नये, म्हणजे 'तिढा 'वाढत नाही.'

'ताई, तूच आमचा आधार आहेस. मोठी बहीण म्हणून तू आता आई-वडिलांची भूमिका निभाव. तुझ्याशिवाय मला कोणीच नाही.' रमेशने स्पष्ट केले आणि प्रस्ताव मांडला.' ताई आई-वडिलांच्या मालमत्तेत मुलीचाही हिस्सा असतो. अजूनही वेळ गेलेली नाही. शेतीत कब्जा हक्कात तुझा उल्लेख करता येईल. यासाठी शासनाकडे दाद मागता येईल. बँकेत संयुक्त खात्याची चौकशी करता येईल, त्यांच्या घराची झडती ही घेता येईल, हे काम सोपे नसले तरी अवघड मात्र नाही. आणि हो शेवटी न्यायालयात तसा पुरावा आपण सादर करू या.'

'अरे बाबा, डॉक्टर आणि वकिलाची पायरी चढू नये असं म्हणतात, त्याचं काय?' अनुजाच्या मनात शंकेची पाल चूक चुकली.

रमेश ईरेला पेटला होता. त्याने अनेक वकिलांचा कायदेशीर सल्ला घेतला आणि काही झाले तरी बहिणीच्या हक्काचा उपयोग करून घ्यायचे ठरविले. अनुजाशी संवाद साधून तिलाही आपल्या जाळ्यात ओढण्याचा तो प्रयत्न करीत होता. आपल्यावर जणू अन्यायाचे आभाळ कोसळले असे रमेशने भासविले. त्यासाठी त्याने मायावी भाषेचा आधार घेतला. काट्याने काटा कसा काढता येईल? हाच विचार रमेश आणि दिपालीच्या मनात घर करून बसला होता. आधार होती फक्त ...विवाहित मोठी बहीण, अनुजा.

एके दिवशी रमेश आणि दिपाली अनुजा कडे आले. आतापर्यंत समक्ष सहभागी न झालेले अनुजाचे पतिराज, किरण रावांनी चर्चेत सहभाग घेतला. जवळपास चार तास साधक-बाधक चर्चा होऊन, पुढे काय करावे? याचा आराखडा तयार झाला. चर्चेअंती दिनेशला सामोपचाराने सांगण्याचे ठरले. बैठक घेऊन गावकऱ्यांचाही सहभाग घ्यावा असेही ठरले. ठरल्याप्रमाणे तारीख निश्चित झाली. दिनेशला तसा निरोप पाठविला. बैठकीसाठी दिनेश-प्रभा, रमेश-दिपाली, अनुजा-किरणराव हे सर्व हजर झाले. गावातले सरपंच आणि ज्येष्ठ मंडळी जमली. गिरीधररावांनी विचारणा केली,

'आवं मानसास्नी सांगता येतं, पर तुमी ऐकाया तयार नाय, मग ह्यो 'तिढा' सुटायचा कसा ?'

हे ऐकून रंगनाथ रावांनी निक्षून सांगितले ,

'म्या म्हणतोय ,तुम्हास्नी जर ऐकायचं नसंल, तर कोरटात जावा, आमचं कोण बी दुश्मन नाय. तवा सर्वांच्या इचारा परमानं गोडीनं ऐकावं, व्हय ना मंडळी ?'

चर्चा सुरू असतानाच प्रभाचे वडील अण्णासाहेब आले आणि ते स्थानापन्न झाले. तोच गिरीधर रावांनी दिनेशला विचारले,

'दिनू, तुज्याकड किती जमीन हाय?'

दिनेशने सात बारा समोर ठेवला, तो मंडळीने पाहिला आणि रमेशला विचारणा केली, त्याप्रमाणे त्यानेही आपला सात बारा उतारा मंडळी पुढे ठेवला. दोन्ही सात बाऱ्यांवर एकूण आठ एकर म्हणजे प्रत्येकी

चार, चार एकर जमीन होती ते पाहून अनुजा म्हणाली,

' ही जमीन तुमची आहे पण आबांची जमीन कुठे आहे? ती कोणी चोरली? मंडळी समोर याचा खुलासा व्हावा, म्हणजे खरा चोर समजेल..'

'आम्हाला चोर म्हणणारी आलीस मोठी साव.. माझ्या सासू-सासऱ्याची मी सेवा केली, त्याचा मोबदला म्हणून आबांनी मला चार एकर जमीन बक्षीस दिली, त्यात कोणाचा काडीचाही संबंध नाही. ती माझ्या मालकीची आहे,' प्रभाने स्पष्ट केले .

'आत्ता समजलं की राव, म्हनजी दिनू आणि परभा हत्यारं घीऊन तयार हायती की, पर पोरी म्या काय म्हणतोय, ह्यो रमेश आन अनुजा ही आबाची लेकरं नव्हतं काय? त्येनच्यावर आन्याव का? ते सावतर हायती का? तुमीच लय लाडाचं व्हत..? तुम्हास्नी इरोध करायचा आसल तर हतं गावात करू नगा ... आमी चाललो माघारी. आम्हास्नी कामधंदा नाय का? आधी बी आसंच केलंया तुमी, मग सांगण्यात काय आर्थ हाय?'

मध्येच अण्णासाहेब वकील म्हणाले ,
' मंडळी, मी बोलू शकतो काय?'

'वकील सायेब, न्यावानं बोला की'. रंगनाथराव म्हणाले.

'आबांनी माझी मुलगी प्रभा हिला त्यांच्या पालनपोषणाबद्दल जमीन दिली. सुनेलाच दिली ना? त्यात अयोग्य काय? इतरांनी त्यांना का सांभाळले नाही? जो सांभाळतो त्याचा हक्क असतो, शिवाय आबांनी राजीखुशीने तिच्या नावे जमीन केली, तेव्हा आक्षेप का घेतला नाही ?'

आत्तापर्यंत केवळ श्रोत्याची भूमिका घेणारे, अनुजाचे पती किरण राव स्पष्टपणे म्हणाले ,

'वकील साहेब, हे न्यायालय नाही, आपली बाजू मांडायला? आपल्याकडून कोणाचीही बाजू न घेता, समान न्यायाची अपेक्षा होती. आपण ती संधी गमावली. शिवाय नात्यात एकाक्षपणे न्याय द्यावा. जावई, मुलगी आणि तुम्ही काय काळंबेरं केलं, हे आता सांगायला लावू नका. आपल्या नात्याप्रमाणे वागा, हे आपल्याला आमचं सांगणं आहे .'

आपल्या वडिलांना चार चौघात अपमानास्पद बोललेलं प्रभाच्या जिव्हारी लागले. ती उसळून म्हणाली ,

'काडी लावा तुमच्या इस्टेटीला... माझ्या वडिलांवर केलेले घाणेरडे आरोप, मी सहन करणार नाही आणि हो त्यांच्यावर आरोप करणारे तुम्ही ....?.. तुम्ही काय, आणि तुमची बायको काय .. तुम्ही काय कमी लुटले होय म्हातारीला? जेव्हा आम्ही पाहायचो, तेव्हा सदा न कदा म्हातारीच्या कानाशी लागलेली असायची. तुम्ही इंजिनियर आहात ना?, आपल्या घरच्यांना काय मदत केली तुम्ही ..? सासर तुमचं तीर्थ होतं, होय ना? सासऱ्यांचे सल्लागार होता तुम्ही.. शहरात चार फ्लॅट घेतलेत ना? स्वतःच्या कमाईचे?.. इथं आमच्यात भाग घेऊ नका, नाहीतर अनर्थ होईल. जावयाने आपल्याला लायकी प्रमाणे वागावं.'

अनुजाला नवऱ्याचा अपमान सहन झाला नाही. ती त्वेषाने म्हणाली,

'होय गं. ती तुझ्या वडिलांची कमाई नाही. मी या घरची लेक आहे .माझा नवरा तुमचा कोणीच नाही का? ते उपरे आहेत? माझाही या मालमत्तेत हक्क आहे, समजलं ...?'

रमेश आणि दिपाली शांतपणे ऐकत होते.

तोच दिनेश म्हणाला , ' जा तू कोर्टातून हिस्सा मागून घे. तिथे बहिण म्हणून सिद्ध कर जा.'

'तुला लाज वाटायला हवी. एकुलत्या एक बहिणीस तिचा हक्क सिद्ध करायला सांगतो, तर मग ऐक, आम्ही आता कोर्टात लढणार. कोर्टाचा निर्णय आम्हाला मान्य असेल. अरे तू वडिलांच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेतला. त्यांच्याच कष्टाचे पन्नास तोळे सोनं, वीस लाखांच्या मुदत ठेव पावत्या, हडप केल्या. त्यांचा हिशोब आम्ही कोर्टात मागणार .' रमेश व्यक्त झाला.

'जा रे कोर्टात तुला कोणी अडवलं? हिम्मत असेल तर लढ कोर्टात जा. यासाठी आम्हाला बोलावलं का? आईच्या नावे असलेलं घर तुझ्या नावे कसे झाले? आई तुझ्याकडे असताना गोड बोलून तिचे दागिने काढून घेतले. वडिलांवर घाणेरडे आरोप केले. त्यांच्या चारित्र्यावर तुझ्या बायकोने संशय घेतला.' दिनेशने रमेश वर जळजळीत बाण फेकले. शर संधान जोरात चालू झाले. सर्वांचा एकच गलका चालू झाला. सत्य कोण? असत्य कोण? याचा निवाडा पंचांना करता येईना कंटाळून श्रीधर पंत म्हणाले,

'आरं आमी हतं आलो, आन झक मारली . तुमी लई हुशार निघालेत की राव. आत्ता आमच्या न्यावाची तुम्हास्नी काय गरज आहे? तुमी शिकल्याली मंडळी हायती. तुमच्या परिस तुमच्या बायका लईच हुशार हायती. समद्यांनी चांगला अभ्यास केल्याला दिसतोय. आमची ईद्या हतं चालायची नाय. चला मंडळी आपल्या घरला.'

अनुजाला अनिवार दुःख झाले आणि ती म्हणाली,

'काका, अशाने हा तिढा सुटायचा कसा? कोर्टातही सुटणार नाही. यांच्या अंगी सहनशीलता आणि प्रमाणिकपणा नाही. कोणीच कोणाची मान मर्यादा ठेवत नाही. आबांना स्वर्गात... काय वाटत असेल? याचा तरी विचार करा जरा.' अनेकांना न्याय देणाऱ्या आबांच्या घरातच, त्यांच्या मुलांचा एकमेकांवर आरोपांचा वर्षाव होत आहे. आबा .. यासाठीच का.. तुम्ही कष्टाने हे सर्व .. उभे केले?'

दुःखावेगाने अनुजाला बोलता येईना.

'थांब पोरी, अनु, त्वा गप बस जरा,'उपरणे सावरीत गिरीधर रावांनी आपल्या बुद्धीला कस लावला,

'दिनू त्वा लईच हुशार हाय की लेका..! बायकोच्या नावं जमीन केलीस ना? मग आबाची सही असल्यालं शेवटची इच्छा, असल्याला कागद दाखवं की रं पंचांना.. पंचांना येडं समजतं का तुमी? आबांनी राजी खुशीनं लिहून दिल्यालं नाय. म्या खात्रीनं सांगतोया

आता मात्र दिनेश आणि प्रभाची बोबडी वळली. त्यांनी सारवा सारव केली. प्रभा म्हणाली ,

' तो कागद आमच्या पोराकडून हरवला. प्रवासात त्याची बॅग चोरीला गेली. आता आम्ही कसा आणणार?'

प्रभाचा सूर बदलला होता, त्यावर अनुजा म्हणाली,

अगं एक खोटं रेटण्यासाठी, हजार वेळा खोटं बोलावं लागतं ते काही नाही. सगळी जायदाद एकत्र करून, आम्हा तिघा वारसदारांना समान वाटणी करा. माझा मुलीचा हक्क मला द्या. मीही आबांची वारसदार आहे. इथे बाहेरच्या आलेल्या सुनांनी, आपली अक्कल पाजळायची नाही. आबांच्या वर्षश्राद्धाच्या कार्यक्रमास अद्याप एक महिना बाकी आहे त्या कार्यक्रमापर्यंत कोणीच वाटणीचा विषय काढायचा नाही. आबा आणि आईच्या शेवटचा कार्यक्रम सर्वांनी पार पाडावा आणि

त्याच दिवशी सर्व समान वाटणी होईल .'

'व्हय, अनु, त्वा अगदी बरोबर बोललीस बग.निदान वर्षीचा कार्यकरम व्हईस्तवर गप बसा. नंतर मातर समद्यांनी आपली कागदं, पासबुकं हजर करा. तुमच्या साठणं न्हव. आबाच्या पीरमापोटी आमी बोलतोया, याचं भान ठिवा. गावा म्होरं हुशारी दाखवू नगा. आन वकील सायेब तुमी यात भाग घेऊ नगा.' श्रीधर पंतांनी ठामपणे सांगितले आणि तो निर्णय सर्व मान्य झाला.

दिनेश, त्याची पत्नी प्रभा, आणि सासरे अण्णासाहेब आपल्या गाडीने निघून गेले. आत्तापर्यंत भिंतीला कान लावून, ऐकत असलेले, आबांचे लहान भाऊ अशोकराव मोठ्या अजिजीने गल्लीत आले आणि त्यांनी रमेशला हाक मारली,

'आरं रमेश, अनु , वाईच या की रं हतं.'

अशोक रावांचा आग्रह पाहून अनुजाला आश्चर्य वाटले, कारण आजवर तिच्या चुलत्यांनी तिला कधीच बोलावणं केले नव्हते किंवा कधी साधी विचारपूसही केली नव्हती. आजच तिच्या चुलत्यांनी बोलावलं का केलं? हा प्रश्न तिच्या मनात घोळत असताना सर्व अशोकरावांच्या घरी गेले .आगत स्वागत झाल्यावर अशोकराव म्हणाले,

'तुम्हास्नी काय सांगावं? अगं त्या दिन्याने तुझ्या आय, बा चा समदा सवसार वाहून नेला की, त्वा पर आमचीच लेक हाय. मग आबांनी भेदभाव का केलाय? ह्याचं कारण समजत नाय. त्वा बी बराबरचा हिस्सा घे. म्या मदत करेल, कोर्टात जाऊ आपून.'

'होय काका, तुम्ही म्हणता तसेच होईल .फक्त वर्ष श्राद्ध होऊ द्यात. पण काका, दिनू आला नाही तर काय करायचे ?'अनुजाने शंका व्यक्त केली.

'सोप्प.. हाय बाय . त्येला घर द्यायाचं नाय. काय बी झालं तरी चालंल, दोन एकर शेती ईकाया लागली तरी चालंल, पर सोडायचा नाय त्येला. आन पुढे जवा याल ना? तवा हतं येयाचं .. तुमचंच घर आहे की. पर ध्येनात ठिवा, आपली गाय कसायाला द्यायची नाय. आर त्यो दिनूचा सासरा म्हनजी वकील नाय, त्यो कसाई हाय. त्येला बी आपण चितपट करू की', अशोक रावांनी सल्ला दिला.

या जगात सल्ला देणाऱ्यांची कमी नाही. सल्ला सहज उपलब्ध होतो. प्रत्येकाच्या सल्ल्यानुसार जीवन जगायचे ठरले तर, ऐकणाऱ्याचा सर्वनाश झालाच म्हणून समजा. फुकट सल्ला देण्यामागे त्यांचा स्वार्थ, द्वेष, अहंकार इत्यादी लपलेले असतात. एखाद्याचे चांगले झालेले दुसऱ्याला सहन होत नाही, म्हणूनच तो स्वार्थाची किंवा द्वेषाची किनार लावून सल्ला देतो. सल्लाकारांच्या दुकानातील सल्ला फुकट मिळाला, तरी त्यातील सत्य पारखून, स्वतःच्या विवेकाचा जो उपयोग करतो, त्याचेच भले होते. अशोकरावांनी असा सल्ला देण्यामागे वेगळेच रहस्य होते. दिनेशच्या सासऱ्यांनी, अशोक रावांच्या बांधा लगत दहा एकर शेत विकत घेतलेले होते. आगीत तेल ओतण्याचे हेच मुख्य कारण हे होते. सावज जाळ्यात कसे येईल?याची जणू तो वाट पाहत होता. रमेश, अनुजा यांना पुढे करून ,वकिलावर शरसंधान करणे सुलभ होईल, ही त्याची धारणा होती. अशोकरावांचा निरोप घेऊन मंडळी निघाली. अशोक रावांचा डाव त्यांनी ओळखला, परंतु स्पष्टपणे बोलता येत नव्हते. वकील, अशोकराव, प्रभा आणि काही गावकरी मंडळींनी हस्तक्षेप केल्याने 'तिढा' वाढत चालला होता. खोटेपणा, स्वार्थ, फसवणूक यांचा वापर करून, माणूस, माणसांचा वापर

करून घेतो आणि वापर झाल्यावर निकामी वस्तू सारखे फेकून देतो. परंतु एक दिवस आपलाही असाच निकामी कचरा होईल, याचे त्याला भान असत नाही. आनंद.. फक्त क्षणिक आनंद... ! तोडा, फोडा तंत्र वापरून मजा पाहण्यातच त्याला आनंद वाटतो. एखाद्या कामात अनेक नातेवाईक व हितचिंतकांनी (?)भाग घेतला, तर त्या कामाचा खेळखंडोबा होतो हे नक्की.

वर्ष श्राद्धाच्या चार दिवस आधी अनुजा, किरण राव, रमेश आणि दिपाली गावी आले. भग्न वाड्याची साफसफाई केली. कार्यक्रमाचे नियोजन केले.

कार्यक्रमाच्या वेळी विधी चालू झाला, तरी दिनेश आणि प्रभा आले नव्हते. त्यांच्या मनात द्वेष विषवल्ली सारखा फोफावला होता. जनलज्जेस्तव थोड्या वेळाने तेही हजर झाले. मात्र दिनेश आणि प्रभा जणू सर्व आयुधांसह युद्धासाठी सज्ज व्हावेत, अशा अविर्भावात वावरत होते. फक्त ठिणगी पडायचा अवकाश होता. त्यातच अशोकरावांनी दिनेशला विचारले,

'दिनू, लई उशीर केलास बग. आता पूजेला बसायचं हाय न्हव?'

हे ऐकून दिनेशचे पित्त खवळले. त्याने गर्जना करीत विचारले,

'तुम्ही कोण मला विचारणारे? मी कधी यावे? हा माझा प्रश्न आहे. तुम्ही इथे वकिली करू नका. मी तुम्हाला बोलावलेलं नाही.'

रमेशने विधी अर्ध्यातच थांबवला. अनुजाच्या आसवांना खंड नव्हता. प्रभा आणि दिपाली या दोघी जावांच वागयुद्ध सुरू झाले. शिव्यांचा भडिमार, शापांचा वर्षाव.. अभद्रभाषा आणि नाते तोडणाऱ्या, शब्दबाणांचा उपयोग सुरू झाला. दिनेशने रमेशच्या डोक्यात काठीने मारल्याने तो रक्तबंबाळ झाला. अशोक रावांची दोघे मुलेही यात सहभागी झाले.

दिनेशने, त्यांच्या वडिलांच्या केलेल्या अपमानाचा सूड घेण्यासाठी, तेही सरसावले. दिनेश आणि प्रभा दोघेही जखमी झाले. दिनेशच्या सासऱ्यांनी लेक जावायला गाडीत बसवले आणि ते सर्व पोलीस स्टेशन कडे निघून गेले. स्थानिक डॉक्टरांकडून प्रथमोपचार करून, रमेश व दिपालीही पोलीस स्टेशनकडे गेले .

आबा, सोनाईचा फोटो मूकपणे हे सर्व आक्रित पाहत होता. पूजेचा ताट दूर कोपऱ्यात उलटा पडला होता.. सर्व पूजा साहित्य इतस्तत: विखुरले होते. वर्ष श्राद्ध निमित्ताने स्वयंपाक करणारी आचारी मंडळीही अर्धवट स्वयंपाक सोडून, या भांडणात साक्ष द्यायला लागू नये म्हणून निघून गेली. जड अंत:करणाने अनुजाने विधी उरकला आणि किरण रावांसह तीही निघून गेली. भग्न वाड्याचा दरवाजा सताड उघडा होता... पण त्यात ऐक्याचा उजेड नव्हता.. फक्त उरला होता 'तिढा...'

दिवस भराभर उलटत गेले. दरम्यान दिनेशचे सासरे, अण्णासाहेब, हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने इहलोक सोडून गेले. दिनेश आणि प्रभाचा आधार हरवला. एका किल्ल्याचा बुरुज कासळला होता. त्यांच्या दुर्दैवाची मालिका सुरू झाली. एके दिवशी शॉर्ट सर्किटने दिनेशचा बंगला आगीत खाक झाला.तो खचून गेला. आबा आणि सोनाईच्या संसारातले तांब्या, पितळाचे भांडी आगीने काळे कुट्ट होऊन उघड्यावर आले. जवळपास दहा वर्षे कोर्टात पायपीट केल्याने, दिनेश आणि प्रभाचा अहंकार थंडावला होता. कोर्टाने अनुजाच्या बाजूने न्याय देऊन तिला हक्क मिळवून दिला. दाग, दागिने मुदत ठेवी हवेत विरल्या. अनुजाने माणुसकी जपली. तिला लाभलेल्या चार एकर जमिनीचे आणि घराचे दोन समान भाग करून, दिनेश आणि रमेशला समान वाटून दिले.सर्व गाव अवाक झाले .अनुजाने माहेर सोडले....ते कायमचे... पण दिनेश आणि रमेश यांनीअसे वागून काय साध्य झाले? मग हा 'तिढा 'कोणी सोडवला? की कायमस्वरूपी राहिला? याचे उत्तर संग्रामपूरचे ग्रामस्थ अद्यापही शोधत आहेत.



कौतुकाचे मोल

लेखन – डॉ. दत्ता कोहिनकर
माईंड पॉवर ट्रेनर
मो.: ९८२२६३२६३०

उच्चशिक्षित सुनीताला लग्नानंतर रमेशने त्वरित अधिकारपदाची नोकरी सोडावयास लावली. शेवटच्या दिवशी निरोप समारंभाला सर्व कर्मचारी व अधिकारी वर्गाने सुनीताचे खूप कौतुक केले. सुनीताला स्वकर्तृत्वाचा अभिमान वाटत होता. नोकरी सोडल्यानंतर काही महिन्यातच सुनीताला स्वतःच्या जीवनात एक पोकळी जाणवू लागली. दीड वर्षानंतर सुनीता मधून–मधून वेड्यासारखी वागतेय – नैराश्याकडे झुकतेय हे रमेशला लक्षात आले, तासनतास सुनीता गप्प बसून राही. तिची झोप उडाली होती.

रमेशला मी सुनीताला मानसोपचार तज्ज्ञांकडे घेऊन जाण्याचा सल्ला दिला. दोघा नवराबायकोची डॉक्टरबरोबर प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर मानसोपचार तज्ज्ञाने या नैराश्याचे मूळ कारण शोधून काढले.

अलीकडे सुनीताला सुरक्षितता, आपुलकी, प्रेम, मैत्री, संतती आणि मानसन्मान (कौतुकाचे बोल) या गोष्टींचा जीवनात वारंवार अभाव जाणवत होता. कौतुकाचे दोन शब्द व प्रेमाचा आधार न मिळाल्यामुळे सुनीताच्या मनावर याचा गंभीर परिणाम झालेला जाणवत होता, त्यातून तिला नैराश्य आले होते.

ज्या लोकांना आपल्याला लोकांनी मान द्यावा किंवा कौतुक करावे असे वाटत असते त्यांच्या बाबतीत तसे झाले नाही तर त्यांना नैराश्य येते. सिगमंड फ्राईड म्हणतो 'स्वतःचे महत्वपूर्ण स्थान, स्वतःचे कौतुक' ही माणसाची आंतरिक इच्छा असते. लिंकन म्हणाले होते, ''मनुष्यप्राण्याला कौतुकाची भूक असते. जी व्यक्ती ही भूक भागवते ती व्यक्ती लोकप्रिय होते. आपले कौतुक व्हावे, आपल्याला मोठेपणा मिळावा ही इच्छा मनात बाळगणे हाच मानव व प्राणी यांच्यात मोठा फरक आहे. आतापर्यंत ज्या ज्या थोर व्यक्तींशी माझा संबंध आला आहे त्या व्यक्तीच्या पाठीवर कोणीतरी शाबासकीची थाप टाकून कौतुकाचे दोन शब्द त्यांना प्रदान केल्याचे दिसून आले.

अनेक घटस्फोटांच्या मुळाशी गेले असता एक सत्य प्रखरतेचे दिसून येते. दोघांनीही एकमेकांच्या गुणांचे कौतुक केलेले नसते, कष्टाची पावती दिलेली नसती, प्रेम व्यक्त केलेल नसते, जोडीदाराचा आपल्याला अभिमान वाटतो असा संदेश एकमेकांना पोहचवण्यात ते कमी पडलेले असतात.

प्रसिध्द लोकांनी समाजात महत्त्वाचे स्थान मिळवण्यासाठी केलेल्या संघर्षाच्या अनेक कथांनी आपला इतिहास झळाळून निघाला आहे. जॉर्ज वॉशिंग्टन सारख्या माणसाला देखील वाटायचे लोकांनी त्याला कौतुकाने 'हिज माइटीनेस, प्रेसिडेंट ऑफ युनायटेड स्टेटस्' असे संबोधावे.

शालांत परीक्षेत उच्चश्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास केला असता त्यांच्या शिक्षकांनी,

पान ७९ वर पुढे

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

नविन कार्यालय नोंदणी **वर सूची** ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
				वैद्यकिय क्षेत्र (डॉक्टर, फार्मसी) वर		
२६/९०१	डॉ. विवेक शेंडे, फलटण	२४.०६.१९९२	५'.७"	एमबीबीएस + एमडी (मायक्रोबायोलॉजी),	नोकरी बारामती,	१ ला.मा., एमबीबीएस, एमडी, बीडीएस, एमडीएस, सीए, एमबीए, एमएड, अनुरुप
२६/९०२	प्रणव शेवकर, पुणे	२३.११.१९९९	५'.९"	एम फार्मसी,	नोकरी नाशिक,	७.१० ला.वा. उच्चशिक्षित, सुसंस्कृत, सायन्स बॅकग्राऊंड
२६/९०३	सुयश फुलसुंदर, पुणे	१६.०९.१९९८	५'.१०"	बीई सिव्हील + डीसीई,	नोकरी + फ्रीलान्सर,	वर्क फ्रॉम होम, १८ ला.वा., ग्रॅज्युएट, नोकरी असेल किंवा नसे ल तरी चालेल, सुसंस्कृत, अनुरुप
२६/९०४	आकाश गोरे, माढा	१४.०४.१९९९	१७० सेंमी	बीई + एमबीए,	नोकरी ३२ ला.वा.,	उच्चशिक्षित, नोकरीस प्राधान्य, कोणतेही क्षेत्र चालेल, व्यावसायिक
२६/९०५	सुदर्शन तुपे, छ. संभाजीनगर	१५.१२.२०००	६'.१"	बीकॉम + सीए,	नोकरी मुंबई,	१८ ला.वा., सीए, डॉक्टर, अनुरुप, कंपनी सेक्रटरी

नविन कार्यालय नोंदणी **वधू सूची** ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
				वैद्यकिय क्षेत्र (डॉक्टर, फार्मसी) वर		
२६/९०१	ऐश्वर्या शेवकर, पुणे	०६.११.१९९८	५'.५"	बीई कॉम्प्यु. + एमएस (युएस),	नोकरी बारामती,	१ ला.मा., एमडी, एमबीबीएस, बीडीएस, एमडीएस, सीए, एमबीए, एमएड, अनुरुप
२६/९०२	पूर्वा सातपूते, मुंबई	२६.०९.१९९५	५'.२"	बीई इलेक्ट्रॉनिक्स + भरतनाट्यम डान्स,	नोकरी गोरेगाव,	१५ ला.वा., किमान बॅचलर डिग्री
२६/९०३	साक्षी खेडकर, पुणे	२१.०७.२०००	५'.१"	बीई मेकॅनिकल,	नोकरी खराडी, पुणे,	५ ला.वा., उच्चशिक्षित, वेलसेटल नोकरी
२६/९०४	प्रिती ताम्हाणे, पुणे	३१.१२.२००१	५'.५"	एमकॉम,	नोकरी पुणे,	२१ ह.मा., उच्चशिक्षित, नोकरी, व्यवसाय, पुणे प्राधान्य
२६/९०५	आरती वर्णेकर, पुणे	०४.११.२००१	५'.७"	बीई आयटी,	नोकरी आयटी,	५८ ह.मा., फक्त इंजि., पुणे शहर नोकरी आयटी क्षेत्रात असावा, मुलाचा ९७ नंतर जन्म असावा

मयुरेश प्युअर व्हेज अँन्ड डायनिंग हॉल

❖ चुलीवरची भाकरी ❖ शेंगोळी रस्सा ❖ तंदूर रोटी
❖ पिठलं, भरले वांगे, मासवडी ❖ मराठी आस्वादाचा खजिना
❖ पंजाबी डिश. ❖ साउथ इंडियन नाष्टा

दहीचाट, दोन फरसाण, दोन स्वीट, पुरी, फुलका, चार भाज्या, दोन राईस, पापड, चटणी, ताक, लोणचे अनलिमिटेड
मयुरेश स्पेशल थाळी
299/- फक्त



शुभ दीपावली



वडगाव फाटा ते चाकण मार्गावरील पैसा फंड काच-कारखान्यासमोर,
प्रो. सौ. सुजाता गिरीष खेर - मो.: 9096969793, 9423080743

रेग्युलर कार्यालय नोंदणी **वधू सूची** ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा

वैद्यकिय क्षेत्र (डॉक्टर, फार्मसी) वधू

२५/१२०१ डॉ. सायली शेंडे, इंदापूर १०.०८.२००० ५'.४" बीएएमएस पीजीडीसीसी, नोकरी फेलोशीप पुणे, शिक्षण चालू, डॉक्टर(एमडी, एमबीबीएस, एमएस फिजिओथेरपीस्ट), शासकीय अधिकारी वर्ग १ व २, इंजि., (प्राधान्य एमटेक), समजदार, निर्व्यसनी

इंजि. एमबीए, डिग्री, डिप्लोमा, वकील, सीए

२५/९०२ रश्मी मस्के, नांदेड १०.०७.१९९६ ५'.२" बीटेक (मेकॅनिकल) डिप्लोमा इन डाटा सायन्स, अनुरुप

२६/२०७ नेहा जमदाडे, पुणे १८.०५.१९९७ ५'.५" बीई (कॉम्प्युटर), नोकरी हैद्राबाद, ११ ला.वा., आयटी क्षेत्रात नोकरी, अनुरुप, बीई असलेला असावा.

२५/११०५ मोनिका शिंदे, पुणे ०४.११.१९९७ ५'.४" बीई आयटी, नोकरी, ५ ला.वा., इंजिनिअर, डॉक्टर, नोकरी, व्यावसायिक नको

२६/१०४ अश्लेशा शेंबेकर, नागपूर १५.१०.१९९८ ५' बीटेक (इलेक्ट्रॉनिक्स), नोकरी पुणे, ५ ला.वा., उच्चशिक्षित, सर्व क्षेत्र चालेल

२५/११०३ सदिच्छा खेडकर, पुणे २८.११.१९९८ १५२ सेंमी बीई कॉम्प्युटर इंजि., नोकरी, जास्तीत जास्त ३ वर्षे अंतर, बीई किंवा तत्सम पदवीधार, व्यवसाय, नोकरी, निर्व्यसनी, शेती, स्वतःचे घर

२५/१२०२ प्राजक्ता शिंदे, अ.नगर ०४.०६.१९९९ ५'.३" बीई आयटी, नोकरी पुणे, ९ ला.वा., इंजिनिअर, शेती आवश्यक, पुणे येथे नोकरी असावी, घर

२६/३०५ गितांजली राऊत, डहाणु १०.०९.१९९९ १६३ सेंमी बीई (ई अँड टीसी), नोकरी भोईसर, १६ ह.मा., मनमिळावू, समजूतदार, सपोर्टिव, अनुरुप

२६/५०२ प्रणाली ननावरे, सातारा ०८.१०.१९९९ ५'.३" बीई (ई अँड टीसी), नोकरी पुणे, ६५ ते ७० ह.मा., सम क्षेत्रातील, सॉफ्टवेअर इंजिनिअर किंवा इतर इंजिनिअर क्षेत्रातील, शेती असेल तर चालेल नसेल तरी चालेल

२६/७०४ श्रध्दा जाधव, पुणे ०९.०२.२००० ५'.३" बीई मेकॅ. इंजि., नोकरी पुणे, ६५ ह.मा., उच्चशिक्षित, इंजिनिअर, वेलसेटल व्यवसाय

२६/२०५ मयुरी लोणकर, पुणे १८.०६.२००० ५'.४" बीई कॉम्प्यु. इंजि., नोकरी पुणे, ५ ला.वा. उच्चशिक्षित, नोकरी आयटी क्षेत्र

२६/२०४ सुप्रिया गायकवाड, अ.नगर २१.०४.२००१ ५'.४" बीसीएस+एमबीए, आयटी, अनुरुप, इंजिनिअर, शासकीय अधिकारी

२६/३०४ इशिता शिरसाठ, अ.नगर २४.०९.२००१ ५'.३" बीई आयटी, नोकरी पुणे, ५ ला.वा., अनुरुप, पुण्यात स्थायिक

२५/११०२ नेहा घाडगे, माढा ०८.१२.२००१ ५'.१" बी.टेक कॉम्प्युटर सायन्स, नोकरी पुणे, ४.८ ला.वा., उच्चशिक्षित, व्यवसाय, सीए, बँकींग, आयटी, फॅमिली ओरिएंटेड, समजूतदार

२५/११०६ वैष्णवी देडगे, पुणे २७.१२.२००२ ५'.५" बीबीए (आयबी), उच्चशिक्षित, पदवीधर, नोकरी, शेती

रेग्युलर कार्यालय नोंदणी **वधू सूची** ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
				शैक्षणिक वधू		
२५/१२०६	तन्वी जगताप, पुणे	१४.०२.२००१	५'.३"	एमएससी, डिप्लोमा इन क्लिनिकल रिसर्च पीव्ही अँड सीडीएम,	१४ ह.मा.,	नोकरी पुणे, उच्चशिक्षित, नोकरी पुणे परिसर, सुसंस्कृत
२५/९०४	अश्लेषा तोडकर, पुणे	२०.०४.२०००	५'.३"	एमएससी (आयबी), नोकरी पुणे,	३० ह.मा.,	नोकरी, उच्चशिक्षित, शेती आवश्यक पुणे परिसर प्राधान्य
२५/५०७	सायली मोटकरी, नाशिक	१९.०६.१९९५	५'.४"	एमकॉम, नोकरी नाशिक महानगरपालिका,		उच्चशिक्षित
२५/११०७	ऋतुजा शिंदे, पुणे	१९.०४.१९९९	५'.५"	बीए, व्यवसाय - ४५ ते ५० ह.मा.,		निर्व्यसनी, फॅमिली ओरिएन्टेड, पुणे सेटल, शाकाहारी प्राधान्य



रेग्युलर कार्यालय नोंदणी **वर सूची** ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा

वैद्यकिय क्षेत्र (डॉक्टर, फार्मसी) वर

२६/५०१	डॉ. अमेय माळी, न. मुंबई	२६.०३.१९९३	५'.६"	एमबीबीएस+एमडी जनरल मेडिसीन,	व्यवसाय-स्वतःचा दवाखाना, नेरुळ	२.५ ला.मा., एमबीबीएस, एमडी, एमएस, एमडीएस

इंजि. एमबीए, डिग्री, डिप्लोमा, वकील, सीए

२६/७०७	विशाल दगडे, मुंबई	०४.०४.१९८७	५'.८"	डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स अँड व्हिडीओ इंजिनिअरींग,	व्यवसाय - फिल्म मेकर लिखाण, रिअल इस्टेट,	६० ह.मा., अनुरुप
२६/२०८	विशाल नरके, पुणे	२८.०८.१९८८	५'.११'	डीएमई,	नोकरी+व्यवसाय,	४५ ह.मा., अनुरुप
२६/७०६	प्रविण शेंडे, पुणे	१०.०६.१९९०	५'.७"	बीई कॉम्प्युटर,	नोकरी,	८.५ ला.वा., अनुरुप, नोकरी
२६/७०८	निखिल शेंडे, पुणे	१४.०९.१९९२	५'.८"	डिप्लोमा इन मेकॅनिकल,	नोकरी पुणे, ७.३ ला.वा.,	समजूतदार, अनुरुप, पदवीधर, डी. फार्म
२६/२०२	कुणाल जाधव (भोंगळे)	०६.०९.१९९३	५'.५"	एमएस (कॉम्प्युटर नेटवर्कींग)+बीई इलेक्ट्रॉनिक्स,	नोकरी, १ ला.मा.,	उच्चशिक्षित, सुसंस्कृत, अनुरूप व समंजस
२५/१२०२	शंकर घोडेकर, पुणे	१२.०३.१९९५	५'.६"	बीए + डिप्लोमा फायर अँड सेफ्टी मॅनेजमेंट,	नोकरी,	५५ ह.मा., शाकाहारी, सुसंस्कृत घराणे, अनुरुप
२६/५०३	अक्षय रायकर, पुणे	१८.०८.१९९५	५'.११"	बीई सिव्हील+ एमबीए,	नोकरी पुणे,	२५ ला.वा., समजूतदार, शाकाहारी, उच्चशिक्षित, अनूरुप
२६/२०९	विपुल भुजबळ, पुणे	१४.०९.१९९५	६'	बीकॉम + हॉटेल मॅनेजमेंट,	व्यवसाय,	९० ह.मा., उंच, गोरी, अनुरुप
२६/४०३	आदित्य लोणकर, पुणे	२४.०३.१९९६	५'.८"	बीई मेकॅनिकल इंजिनिअर + डेटा सायन्स कोर्स,	नोकरी पुणे,	१७ ला.वा., इंजिनिअर, उच्चशिक्षित, नोकरी/व्यवसाय, पुणे जवळपास राहणारी
२६/३०५	श्रेयस भुजबळ, पुणे	१७.०४.१९९६	५'.८"	एमएस (युके) प्रोजेक्ट मॅनेजर,	व्यवसाय पुणे,	२० ला.वा., सुशिक्षित, इंजिनिअर, सीए, डॉक्टर, एमडी
२५/९०१	निखिल नवले, पुणे	२९.०६.१९९६	५'.४"	बीई (ईलेक्ट्रिकल),	नोकरी पुणे,	३० ह.मा., अनुरुप
२५/११०९	प्रसाद पुसावळे, पु. मुंबई	२६.०७.१९९६	५'.९"	बीई (आयटी)	नोकरी मुंबई,	१३ ला. वा., उच्चशिक्षित, मुंबई प्राधान्य नोकरी असेल/नसेल तरी चालेल, बॅचलर डिग्री असावी
२६/५०६	रोहन डोके, ठाणे	२०.०८.१९९६	५'.६"	बीबीए, पीजीडीएम	नोकरी,	२० ला.वा., उच्चशिक्षित, सुस्वभावी, सुंदर, करियर ओरिएन्टेड
२५/११०१	ऋषिकेश बागुल, ठाणे	१७.०९.१९९६	५'.६"	बीई सिव्हील, एमएस,	नोकरी ऑस्ट्रेलिया, सिडनी,	६० ला.वा., बीई, कॉम्प्यु./आयटी, एमबीए, हॉटेल मॅनेजमेंट, परदेशात नोकरी करणारी, काही वर्षांनी भारतात व्यवसाय करण्यासाठी परत येणार

रेग्युलर कार्यालय नोंदणी **वर सूची** ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२६

क्र.	नाव व स्थळ	जन्मतारीख	उंची	शिक्षण इतर माहिती	मा.प्राप्ती रु.	अपेक्षा
२६/५०७	प्रतिक वाघमारे, पुणे १.२० कोटी वा.	१४.०६.१९९७	५'.९"	बीई मेकॅनिकल, एमएस एआय अँड रोबोटीक्स, एमएस, डॉक्टर, इंजिनिअर, कोणत्याही क्षेत्रात नोकरी, समजूतदार, उची ५.४ ते ५.६ पर्यंत असावी	नोकरी युएसए,	
२६/३०४	सुरज बोराटे, न. मुंबई	२८.१०.१९९७	५'.१०"	बीई (आयटी),	नोकरी नवी मुंबई,	१४ ला.वा., अनुरुप, नोकरी, सम क्षेत्रास प्राधान्य
२६/३०७	कुणाल अडसूळ, पुणे	२६.०२.१९९८	५'.१०"	बीकॉम + एमबीए फायनान्स,	नोकरी १५ ला.वा.,	उच्चशिक्षित, फॅमिली ओरिएन्टेड, समजूतदार

पदवीधर वर

२५/१२०५	विकास गोरे, पुणे	१६.१२.१९९४	५'.६"	१२वी,	नोकरी पुणे,	३० ह.मा.	अनुरुप
२६/३१०	अजय शिंदे, ठाणे	१२.०४.१९९७	५'.४"	बीए,	नोकरी मुंबई,	२२ ह.मा.,	अनुरुप
२६/२११	मृणाल भोसले, करमाळा	०१.०७.१९९८	५'.९"	बीए,	नोकरी पुणे,	५० ह.मा.,	पदवीधर, कोणत्याही शाखेची पदवी
२६/२१०	चैतन्य केदारी, मुंबई	०९.०६.१९९९	५'.८"	बीए,	व्यवसाय,	७० ह.मा.,	अनुरुप, पदवीधर, नोकरी

पान ७४ वरुन पुढे


आई–वडिलांनी संधी मिळेल तेव्हा त्यांच्या पाठीवर शाबासकीची मारलेली थाप – कौतुकाचे शब्द यांची सकारात्मक उर्जा त्यांना प्रदान केल्याचे दिसून येते. आपण आपल्या मुलांचे, मित्रमैत्रिणींचे, कामगारांचे शारीरिक चोचले पुरवण्यावर भर देतो पण त्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास जपण्यासाठी काय करतो? त्यांना शारीरिक उर्जेचा सतत पुरवठा व्हावा म्हणून अंडी, मटण, दूध, चिकन वगैरे देतो. पण ज्याने त्यांच्या मनाची उर्जा वाढेल व मनाचा आत्मविश्वास वाढेल असे चार कौतुकाचे गोड शब्द बोलतो का? याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. आपल्या व्यक्तिगत नातेसंबंधात असणाऱ्या कौतुकाची भूक असते. त्याकडे विशेष लक्ष द्या. ही भूक भागवताना असल्याचा आधार घेऊ नका म्हणजेच खोटी स्तुती करु नका. त्याऐवजी प्रत्येकातील चांगले गुण शोधा व प्रामाणिकपणे मोकळ्या मनाने त्याचे कौतुक करा. तुमच्या या वागण्यामुळे तुम्ही लोकप्रिय व्हाल. लोक एखाद्या खजिन्याप्रमाणे तुमचे बोल जपून ठेवतील. तुम्ही जरी त्यांना विसरला तरी ते कायमचे तुम्हाला लक्षात ठेवतील. चला तर मग आजपासून चालू करुया – कौतुकाचे दोन शब्द बोलण्याचा सराव.

सभासदांसाठी सूचना

मासिक माळी आवाज हा अंक ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२६ हा जोड अंक
दिवाळी अंकाच्या स्वरुपात प्रकाशित करण्यात येत आहे. पुढील अंक हा डिसेंबर २०२६
ई–अंक स्वरुपात सर्व सभासदांना पाठविण्यात येईल, याची सभासदांनी नोंद घ्यावी.

Wish you all a very Happy Diwali !!

Girme Farm®
GARDEN SHOPEE



The Complete Garden Shoppee

- Soil
- Plants
- Seeds
- Garden Pots
- Garden Tools
- Vertical Garden
- Lawn Mower
- Pebbles
- Organics
- Fertilizers
- Insecticides
- Sprinklers
- Shade Net
- Stone Lamps
- Decor


Near Wadeshwar Hotel,
Baner Road, Baner,
Pune - 411 045.
M.: 7507909595
Email : girmefarm@yahoo.com
www.girmefarm.com


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
Balasaheb Bhong
AMS
ADVANCE MEASURING SOLUTIONS
Sales, Service, Repairing &
Calibration of Measuring Instruments
M.: +91 8275344854
Email : punesales.ams@gmail.com
S. No. 135/34, Shreepark Soc., Lane No. 3,
Near Chate School, Kharadi Bypass,
Pune-Nagar Road, Pune 411014.
Contact No.: 9970958379
Works Address
SR. NO. 11/4, SHOP NO. 02,
BESIDE SAI TOOLS,
INDRAYANI CORNER,
BHOSARI, PUNE - 411026


CA INDIA
!! Happy Diwali !!
D C B & ASSOCIATES
Chartered Accountants
CA Dattu Borate
FCA, M.Com



9168660103
dcbandassociates24@gmail.com
Office No. 2, Sai Niketan Apartment,
Ground Floor, Next to Reliance Mall,
Erandwane, Pune - 411 004


श्री. दिलीपशेठ कृष्णाजी राऊत
अध्यक्ष
अखिल भारतीय माळी
समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, पुणे
अध्यक्ष : हिराबाग गणेशोत्सव मंडळ, पुणे
मा. अध्यक्ष : खडकमाळआळी नागरी सह. पतसंस्था, पुणे
मा. अध्यक्ष : महात्मा फुले वसतिगृह कार्यकारी मंडळ, पुणे
मो.: ९३२५५५५४४५
शुभ दिपावली


श्री. मधुकर कृष्णाजी राऊत
(फ्लॉवर मर्चंट)
मा. अध्यक्ष – महात्मा फुले मंडळ, पुणे
श्री. अक्षय मधुकरराव राऊत
मो.: ९८२२८४४२२३
५४३, सेंटर स्ट्रीट, शिवाजी मार्केट, कॅम्प, पुणे १.
फोन : ०२० – २६३४००४२
शुभ दिपावली


श्री. सुधाकर कृष्णाजी राऊत
(संचालक)
अप्पू गप्पू नर्सरी
आमच्या येथे फुले, फळे, खते, माती
इत्यादी बाग बगीच्यासाठी रोपे
सवलतीच्या दरात व खात्रीशीर मिळतील.
राऊत बाग, धनकवडी, पुणे
शुभ दीपावली

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

● स्थळांच्या माहितीसाठी खालील ठिकाणी संपर्क साधावा ●

माळी आवाज वधू-वर सूचक केंद्र

ऑफिस नं. १, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर नं.२ शेजारी, बिबवेवाडी मेन रोड, पुणे – ३७. फोन : ०२०-२४२८१११०
वेळ : मंगळ ते शनि. सायं ४ ते ७ रविवारी सकाळी ११ ते २

अवंती शेरताटे
यशोधन बंगला, प्लॉट नं. १०६,
सर्वे नं. ९०२, एनएमसी वॉटर टँक,
चेतना नगर, राणे नगर, नाशिक ४२२००९.
मो.: ४२८००७४९८८

श्री. वसंतराव नेवसे
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे,
मु. पो. वाई, जि. सातारा,
मो. ८१४९०१३८६५

सौ. शीला गिते
उमेश, कोटेशवर कॉलनी,
अर्क शाळेजवळ, सातारा,
मो. ९६२३६९२०४४

सौ. शुभांगी शिंदे
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट-४००६०५, मो.: ८७७९५३८८२६

सौ. रंजना जाधव
आर. एम/९५, शिशिर सुदामा,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, डोंबीवली, (पू), जि. ठाणे
मो ९१६७७७३५६६

अंजली भुजबळ
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर – ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

श्री. प्रसन्नकुमार शिंदे
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर – ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

प्रा. आदेश बनकर
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

सौ. उज्वला तुषार कमोद
आदर्श सोसायटी, डी-९,/२०५,
सेक्टर-९, घरोंदा, घणसोली,
नवी मुंबई – ४००७०१

सभासदांसाठी महत्वाची सूचना

१) मासिक माळी आवाजमधून नोंदणी केल्यानंतर त्याची १ वर्ष मुदत असते. आपला विवाह १ वर्षामध्ये जमला नाही तर आपल्याला नोंदणीचे नूतनीकरण पुन्हा करावे लागते. अन्यथा नोंद रद्द होते.

२) आपला विवाह आमच्यामार्फत अथवा आपल्या स्वप्रयत्नाने ठरल्यास आपण आम्हांस ताबडतोब कळवावे म्हणजे आपली नोंद रद्द करुन आपल्याला स्थळे पाठविली जाणार नाहीत.

३) आपले नाव माळी आवाज क्लासिफाइड जाहिरात सदरात रु. ३००/- भरुन आपण फोटोसहित माहिती देऊ शकता. सदर माहिती फक्त एकदाच प्रसिध्द होईल.

४) वधू-वरांना नाव नोंदणी करताना आपला फोटो देणे आवश्यक आहे.

५) आपला विवाह जमल्यास अथवा आपली नोंदणी रदद झाल्यास आपला फोटो कार्यालयातून १ महिन्याच्या आत घेऊन जावे. अन्यथा त्याची जबाबदारी आमच्यावर राहणार नाही.

Our Web : www.maliawaj.in

Email : maliawaj17@gmail.com

'माळी आवाज' हे मासिक मालक, मुद्रक आणि प्रकाशक रागिणी विजयकुमार लडकत यांनी शिवानी प्रिंटर्स शॉप नं. ७८९, १३११ कसबा पेठ, पुणे ४११०११ येथे छापून सर्वे नं. १४, फ्लॅट नं. २३, गौरव अपार्टमेंट आनंदनगर, सनसिटी रोड, वडगाव बु., पुणे ४११०५१ येथून प्रसिध्द केले. संपादक रागिणी विजयकुमार लडकत

"Mali Aawaj" Monthly Periodical is Owned, Printed & Published by Ragini Vijaykumar Ladkat, Printed at Shivani Printers, Shop No. 789, 1311 Kasba Peth, Pune 411011. Published at S. No. 14, Flat No. 23, Gaurav Apartment, Anand Nagar, Suncity Road, Vadgaon Bk., Pune 411051. Editor : Ragini Vijaykumar Ladkat



DR. MAHESH BHAUSAHEB SINNARKAR

MBBS MS FICS FIAGES
(General Surgeon and Laparoscopy Surgeon)

May the festival of lights bring
health, happiness and prosperity
to you and your family.

Happy Diwali

Working since 1999 Attachment to

- Rubyhall
- Poona Hospital
- Sahyadri Group Hospital
- Jupiter Hospital

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!

STAR Health Insurance
Personal & Caring
The Health Insurance Specialist

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

Manankit 'PUNE GAURAV' Agent 2008

SATISH A. JADHAV **MANISHA S. JADHAV**

LIC of India, Edelweiss Tokio & Star Health Mediclaim Advisor
M.: 9850848616, 9765081850 | Email : msjadhav.lic@gmail.com

LIC का हो साथ तो फिक्र की छोडो बात ।
Health Insurance is a necessity not choice

Branch Off.: 953, LIC Camp, Aditi Commercial Centre, Gen. Thimayya Road, Pune 411001.

४ मे २०२५ वधू-वर पालक परिचय मेळाव्याची क्षणचित्रे







वधू–वर परिचय करुन देताना.



मा. अध्यक्ष श्री. किशोर काळोखे
यांचे वधू–वर मेळाव्यास मार्गदर्शन.



मा. अध्यक्ष श्री. किशोर काळोखे, शिवसेना गटाचे युवा नेते
व महात्मा फुले वाडा स्मारक समितीचे अध्यक्ष
श्री. निलेश गिरमे यांचा सत्कार करताना.

२२ मार्च २०२६ वधू-वर पालक परिचय मेळाव्याची क्षणचित्रे





वधू-वर परिचय करुन देताना.





वधू-वर मेळाव्यास पालक आणि वधू-वर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वधू-वर मेळाव्यास उपस्थित मान्यवर.

Wish You all a very Happy Diwali







मासिक माळी आवाज २०२५ दिवाळी अंकाचे प्रकाशन श्री. निलेश दशरथ गिरमे आणि महात्मा फुले मंडळाचे अध्यक्ष मा. मधुकरराव राऊत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



१. नांव : **डॉ. अविनाश अशोक कचरे, आष्टी**
जन्म ता.: १७/०३/१९९२ जन्मवेळ : स. ९.५५ मि.
उंची : ५'.६'' देवक : आव्याचा ढगळा रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : आर्थोपेडिक कन्सलटंट, मुंबई
इतर माहिती : वडील, आई, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : एमबीबीएस, एमडी, एमएम, एमटेक
शिक्षण : एमबीबीएस+एमएस+ एफआयजेआर (हाँगकाँग) + एफआयएएस (युरोप)
जन्म ठिकाण : आष्टी
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ४० ला.वा.,



२. नांव : **डॉ. विवेक तुकाराम शेंडे, विडणी (फलटण)** शिक्षण : एमबीबीएस, एमडी मायक्रोबायोलॉजी
जन्म ता.: २४/०६/१९९२ जन्मवेळ : दु. १२.४८ मि. जन्म ठिकाण : फलटण
उंची : ५'.७'' देवक : पाचपालवी रक्त गट : A +ve वर्ण : निमगोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी गर्व्हमेंट मेडिकल कॉलेज, बारामती मासिक प्राप्ती : १ ला.मा.,
इतर माहिती : आई, वडील १ बहिण विवाहीत
अपेक्षा : एमबीबीएस, एमडी, बीडीएस, एमडीएस, सीए, एमबीए, एमएड, अनुरुप



३. नांव : **मंदार संजय दुर्गुडे, सासवड**
जन्म ता.: ०६/०९/१९९५ जन्मवेळ : प. ४.२६ मि.
उंची : ५'.३'' देवक : पाचपालवी रक्त गट :
नोकरी/व्यवसाय : व्यवसाय – स्वतःचे मेडिकल
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : डी. फार्मसी, बीएससी, पदवीधर
शिक्षण : एम फार्मसी
जन्म ठिकाण : सासवड
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ५० ह.मा.,



४. नांव : **प्रणव देविदास शेवकर, इंदोरी**
जन्म ता.: २३/११/१९९९ जन्मवेळ : दु. १२.४४ मि.
उंची : ५'.९'' देवक : सौंदड, पंचपल्लव रक्त गट : A+ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी, मुंबई
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, सुसंस्कृत, सायन्स बॅकग्राऊंड
शिक्षण : एम फार्मसी
जन्म ठिकाण : तळेगाव दाभाडे
वर्ण : बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७.१० ला.वा.,



५. नांव : **प्रसन्न नितीन वेल्हेकर, पुणे**
जन्म ता.: ०४/०१/१९९९ जन्मवेळ : दु. १२.३५ मि.
उंची : ६'.२'' देवक : सालींदरचा काटा रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी – अहमदाबाद
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : पदवीधर,, कॉन्वेंट शाळेतूल शिक्षण अपेक्षित, उंची ५.४च्या पुढे
शिक्षण : बीई इंजि.
जन्म ठिकाण : शिरपूर
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १५ ला.वा.,



६. नांव : **सुयश अशोक फुलसुंदर, पुणे**
जन्म ता.: १६/०९/..... जन्मवेळ : सं. ६.४५ मि.
उंची : ५'.१०'' देवक : रक्त गट : A +ve
नोकरी/व्यवसाय : ड्रिम होम डिझा. आर्च विझ स्टुडिओ, फ्रीलान्सर
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : ग्रॅज्युएट, नोकरी असेल किंवा नसेल तरी चालेल, सुसंस्कृत, अनुरुप
शिक्षण : बीई सिव्हील+डी. सीई
जन्म ठिकाण : नारायणगाव
वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १८ ला.वा.,



७. नांव : **रोहित सुतोष फुलारी, पुणे**
जन्म ता.: १४/१०/२००० जन्मवेळ : दु. ३.४५ मि.
उंची : ५'.११'' देवक : पाचपाली रक्त गट : O -ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी + व्यवसाय
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : इंटेरिअर डिझाइनर फक्त
शिक्षण : बी. आर्च., मास्टर इन अर्बन अँड रिजनल टाऊन प्लॅनिंग
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ५,००,०००/–



८. नांव : **सुयोग संपत दरवडे, कोंढापूरी** शिक्षण : बीई मेकॅनिकल इंजिनिअर
जन्म ता.: २३/०८/१९९८ जन्मवेळ : रा. १०.४५ मि. जन्म ठिकाण : शिरुर
उंची : ५'.८'' देवक : पाचपालवी, निरगुडी रक्त गट : O +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, कोंढापूर मासिक प्राप्ती : ९.२५ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, ४ बहिणी विवाहीत
अपेक्षा : नोकरी करणारी, पदवीधर



९. नांव : **सुदर्शन राजेंद्र तुपे, छ. संभाजीनगर** शिक्षण : बीकॉम+सीए
जन्म ता.: १५/१२/२००० जन्मवेळ : प. ५.०० वा. जन्म ठिकाण : शेवगाव
उंची : ६'.१'' देवक : सौंदड रक्त गट : A +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी, मुंबई मासिक प्राप्ती : १८ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : सीए, डॉक्टर, अनुरुप



१०. नांव : **अजिंक्य शंकर जाधव, पुणे** शिक्षण : डिप्लोमा ई ॲड टीसी, बीसीए चालू
जन्म ता.: ०५/०६/१९९३ जन्मवेळ : रा. ८.३० मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.६'' देवक : पाणकणिस रक्त गट : B +ve वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी – चाकण, पुणे मासिक प्राप्ती : १५ ला.वा.,
इतर माहिती : आई, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : अनुरुप



११. नांव : **आकाश हंबीरराव गोरे, सोलापूर** शिक्षण : बीई मेकॅनिकल, एमबीए (ऑपरेशन्स मॅनेजमेंट)
जन्म ता.: १४/०४/१९९८ जन्मवेळ : स. ८.१५ मि. जन्म ठिकाण : कुर्डुवाडी
उंची : १७९ सेंमी देवक : आंब्याचे पान रक्त गट : O +ve वर्ण : सावळा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी – हैद्राबाद मासिक प्राप्ती : ४० ह.मा.,
इतर माहिती : आई, वडील १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरीस प्राधान्य, कोणतेही क्षेत्र चालेल



१२. नांव : **विनायक बाळासाहेब साबळे, पुणे** शिक्षण : डिप्लोमा इन मेकॅ. इंजि.
जन्म ता.: ०८/०१/२००० जन्मवेळ : दु. २.१० मि. जन्म ठिकाण : औंध, पुणे
उंची : ५'.१०'' देवक : सुर्यकिरण रक्त गट : A +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : रेल्वे कॉन्ट्रॅक्टर, इव्हेंट मॅनेजमेंट मासिक प्राप्ती : १५ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, ३ बहिणी विवाहीत,
अपेक्षा : अनुरुप, सुशिक्षित, सुस्वरुप



१३. नांव : **अखिलेश नंदकुमार नगरे, नाशिक** शिक्षण : बीकॉम
जन्म ता.: २१/०९/१९९८ जन्मवेळ : स. ७.१४ मि. जन्म ठिकाण : अ.नगर
उंची : ५'.८'' देवक : पाचपालवी रक्त गट : B +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ प्रशिक्षक, स्वतःची प्रशिक्षण संस्था मासिक प्राप्ती : १८ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप



१४. नांव : **मृणाल सुनिल भोसले** शिक्षण : बीए
जन्म ता.: ०१/०७/१९९८ जन्मवेळ : प. २.३९ मि. जन्म ठिकाण : मेढा
उंची : ५'.९'' देवक : पाचपालवी,आंब्याचा डहाळा रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : हॉटेल व्यवसाय, पुणे येथे अकौंटंट मासिक प्राप्ती : ५० ह.मा.,
इतर माहिती : आई, वडील, एकूलता एक
अपेक्षा : कोणत्याही शाखेची पदवी



१. नांव : **धनश्री भिमराव जाधव, पुणे** शिक्षण : बीएएमएस चालू एमडी मेडिसीन (प्रथम वर्ष)
जन्म ता.: २०/०५/२००० जन्मवेळ : सं. ५.४० मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.४'' देवक : पाणकणिस रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : शिक्षण चालू मासिक प्राप्ती :
इतर माहिती : वडील, आई, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, सपोर्टिव दिसायला सुंदर, निर्व्यसनी, अनुरुप



२. नांव : **जान्हवी अनिल नरके, पुणे** शिक्षण : एमएस (बायोमेडिकल इंजि.) युके
जन्म ता.: १४/०५/१९९९ जन्मवेळ : स. ६ वा. जन्म ठिकाण : पिंपरी
उंची : ५'.४'' देवक : रक्त गट : वर्ण : निमगोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : ६ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, पुणे प्राधान्य



३. नांव : **पूर्वा संजय सातपूते, मुंबई** शिक्षण : बीई इलेक्ट्रॉनिक्स, भरतनाट्यम डान्स
जन्म ता.: २६/०९/१९९५ जन्मवेळ : स. ७.१२ मि. जन्म ठिकाण : भुसावळ
उंची : ५'.२'' देवक : रक्त गट : O +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी, गोरेगाव मासिक प्राप्ती : १५ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : किमान बॅचलर डिग्री असावी, पुणे मुंबई प्राधान्य, व्यावसायिक नको, १५ लाखाच्या पुढे पॅकेज असावे



४. नांव : **साक्षी संतोष खेडकर, शिरुर, पुणे** शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ता.: २१/०७/२००० जन्मवेळ : रा. ११.५५ मि. जन्म ठिकाण : केंदूर
उंची : ५'.१'' देवक : मोराचा पीस रक्त गट : O+ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : बी पी खराडी पुणे मासिक प्राप्ती : ५ ला. वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, वेलसेटल, नोकरी



५. नांव : **श्रेया सुनिल बुलबुले, जालना** शिक्षण : एमटेक इंजि. (ई अँड टीसी)
जन्म ता.: २२/०२/१९९७ जन्मवेळ : स. ६.३७ मि. जन्म ठिकाण : जालना
उंची : ५'.३'' देवक : सौंदड रक्त गट : A +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : मासिक प्राप्ती :
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत,
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरी, सेटल व्यवसाय, स्वस्वरुप



६. नांव : **ऐश्वर्या नितीन शेवकर, हडपसर** शिक्षण : बी. ई. कॉम्प्यु., एमएस (युएस)
जन्म ता.: ०६/११/१९९८ जन्मवेळ : स. ७.२८ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.५'' देवक : पाचपालवी रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : सर्च करत आहे मासिक प्राप्ती :
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, युएस नोकरी असावी, एच१बी१ व्हिसा असावा



७. नांव : **निशा प्रदिप गोरे, सातारा** शिक्षण : एमई सिव्हील इंजिनिअर
जन्म ता.: १२/०३/१९९८ जन्मवेळ : रा. ००.०५ मि. जन्म ठिकाण : किन्हई, कोरेगाव
उंची : ५'.४'' देवक : पाचपालवी रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी पुणे मासिक प्राप्ती : ६ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, पुणे येथे नोकरी, शेती असावी



८. नांव : **अश्लेषा गणेश शेंबेकर, नागपूर** शिक्षण : बीटेक, इलेक्ट्रॉनिक्स इंजि.,
जन्म ता.: १५/१०/१९९८ जन्मवेळ : स. ००.१५ मि. जन्म ठिकाण : काटोल, नागपूर
उंची : ५' देवक : रक्त गट : O +ve वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी पुणे मासिक प्राप्ती : ५ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, सर्व क्षेत्र चालेल



९. नांव : **शुभांगी बाळासाहेब गिते, राहता** शिक्षण : बीई कॉम्प्युटर, सीडॅक (ॲक्टस)
जन्म ता.: २९/०३/१९९७ जन्मवेळ : स. १०.०२ मि. जन्म ठिकाण : बाभळेश्वर, राहता
उंची : ५'.४'' देवक : कुरड, सौंदड रक्त गट : AB +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी बँक ऑफ अमेरिका मासिक प्राप्ती : ८ ला.वा.
इतर माहिती : आई, १ भाऊ
अपेक्षा : सुस्वरुप, सुसंस्कृत, कर्तबगार, निर्व्यसनी, मुलीच्या अंगभूत गुणांना वाव देणारा, शासकीय नोकरी, व्यवसाय, इंजिअिनर



१०. नांव : **इशीता मोहित शिरसाठ, अ.नगर** शिक्षण : बीई (आयटी)
जन्म ता.: २४/०९/२००१ जन्मवेळ : दु. १२.४७ मि. जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.३'' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट : B +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : इन्फोटेक, पुणे मासिक प्राप्ती : ५ ला.वा.,
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, पुण्यात स्थायिक



११. नांव : **शितल विश्वनाथ हत्तरगे (माळी), पुणे** शिक्षण : बीकॉम+एमसीएस
जन्म ता.: १७/०१/१९९४ जन्मवेळ : रा. ७.२१ जन्म ठिकाण : पुणे
उंची : ५'.२'' देवक : रक्त गट : O +ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : ५.७० ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरी, पुणे परिसर प्राधान्य



१२. नांव : **राशी राजेश फरांदे, ठाणे (वे)** शिक्षण : एमएससी (इनवॉयरमेंटल साय.)
जन्म ता.: ०७/०२/२००० जन्मवेळ : स. ९.४७ मि. पीएचडी ३ वर्ष
उंची : ५'.४'' देवक : पाचपालवी रक्त गट : जन्म ठिकाण : ठाणे
नोकरी/व्यवसाय : नोकरी, मुंबई वर्ण : गोरा बांधा : सडपताळ
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत मासिक प्राप्ती : ९ ला.वा.,
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरी, डॉक्टर, इंजि., एमबीए, एमटेक, पुणे मुंबई परदेशीपण चालेल



१३. नांव : **प्रिति नामदेव ताम्हाणे, पुणे** शिक्षण : एमकॉम
जन्म ता.: ३१/१२/२००१ जन्मवेळ : दु. १२.१८ मि. जन्म ठिकाण : सांगवी, पुणे
उंची : ५'.५'' देवक : सौंदड रक्त गट : A -ve वर्ण : गोरा बांधा :
नोकरी/व्यवसाय : बाणेर, पुणे मासिक प्राप्ती : २१ ह.मा.,
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : उच्चशिक्षित, नोकरी किंवा व्यावसायिक, पुणे प्राधान्य



१४. नांव : **पुजा समीर भडके, अकलूज (घट)** शिक्षण : जीडी आर्ट (कमर्शिअल आर्टिस्ट)
जन्म ता.: १५/११/१९८९ जन्मवेळ : प. २.१७ मि. डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन
उंची : ५'.६'' देवक : पाचपावली रक्त गट : O +ve जन्म ठिकाण : अकलूज
नोकरी/व्यवसाय : नोकरी वर्ण : गोरा बांधा : मध्यम
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत मासिक प्राप्ती : २५ ह.मा.,
अपेक्षा : अनुरुप, नोकरी, व्यवसाय, वेल सेटल, घटस्फोटीत

स्वर्गीय विजयकुमार नारायण लडकत यांनी स्थापन केलेल्या

मासिक माळी आवाज आयोजित

माळी समाजाचा ६२ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी, सकाळी १० ते ३ वा.

स्थळ : जांभुळकर गार्डन, वानवडी गाव, पुणे ४११०४०.

या मेळाव्यामध्ये उच्चशिक्षित, इंजिनिअर, डॉक्टर, पदवीधर
तसेच घटस्फोटित, विधवा, विधूर अशा
सर्व वधू-वरांना सहभागी होता येईल.*





* फक्त मेळावा नाव नोंदणी फी : रु. १०००/- (प्रवेश फक्त ३ व्यक्तिंकरिता जेवणासहित)



❖ संपर्क ❖



मासिक माळी आवाज

संपादिका – रागिणी विजयकुमार लडकत

स. नं. ६४५/१/२, रासकर पॅलेस, बिबवेवाडी, पुणे-४११०३७.

फोन : ०२०-२४२८११९०. मो. : ९१५८३३३७५८, ८७६७५८१९०६ | Email : maliawaj17@gmail.com

माळी आवाजच्या पुढील संचालकांकडेही आपल्याला नोंदणीसाठी संपर्क साधता येईल.

आदेश बनकर, पुणे	– मो. ९६६५२५३४४८	शिला गिते, सातारा	– मो. ९६२३६९२०४४
कल्पना करपे, पुणे	– मो. ९९६०४९८८४९	वसंतराव नेवसे, वाई	– मो. ८१४९०१३८६५
अंजली भुजबळ, धायरी, पुणे	– मो. ९७६३६५५६२७	अवंती शेरताटे, नाशिक	– मो. ७४९८८४२८००
चंद्रकला पाथरे, औरंगाबाद	– मो. ९४२०२४२१६५	दिलीप धामणे, हिंगोली	– मो. ८२०८४५६७९३
शुभांगी शिंदे, ठाणे, कल्याण	– मो. ८७७९५३८८२६	लक्ष्मण बादाडे, लातूर	– मो. ९४२३४९७०८०
रंजना जाधव, ठाणे, कल्याण	– मो. ९१६७७७३५६६	प्रसन्नकुमार शिंदे, सोलापूर	– मो. ७८७५४४४७५५
उज्वला कमोद, नवी मुंबई	– मो. ९८६७५१९४९४		

प्रेषक :

मासिक माळी आवाज
स. नं. ६४५/१/२
रासकर पॅलेस, बिबवेवाडी, पुणे – ४११०३७.
फोन : ०२०-२४२८११९०.
मोब.: ८७६७५८१९०६
Email : maliawaj17@gmail.com

प्रति,